CMYK


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १७ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक १०१ । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विनम्र अभिवादन



क्रांतिगुरू लहुजी साळवे यांची आज पुण्यतिथी.



क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचा आज पुण्यदिन

# हिंदू समुदायाला एकत्र आणणे हेच संघाचे उद्दिष्ट

● सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन ● हिंदू समुदाय सर्वाधिक जबाबदार असल्याचे गौरवोद्गार



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी रविवारी पश्चिम बंगालच्या वर्धमान येथे आयोजित एका कार्यक्रमाला संबोधित केले. यावेळी मोठ्या संख्येत स्वयंसेवक उपस्थित होते

**वर्धमान, १६ फेब्रुवारी**

हिंदू समुदायाला एकत्र आणणे हेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उद्दिष्ट आणि कार्य आहे. कारण हिंदू हा देशातील सर्वाधिक जबाबदार समाज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

वर्धमान येथे आयोजित कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. सरसंघचालक म्हणाले, लोक बहुतांश वेळा विचारतात की, आम्ही केवळ हिंदू समाजावरच का लक्ष केंद्रित करतो आणि त्यावर माझे उत्तर हेच आहे की, हिंदू समाज हा देशातील सर्वाधिक जबाबदार समुदाय आहे, जो विविधतेतील एकतेवर विश्वास ठेवून आहे. आज कोणताही विशेष दिवस नाही. मात्र, जे संघविषयी अनभिज्ञ आहेत, त्यांना कायम प्रश्न पडतो की, संघाला नेमके हवे काय आहे? मला याचे उत्तर द्यायचे असेल, तर मी म्हणेन की, संघाला हिंदू समाजाला एकत्र करायचे आहे.

भारत म्हणजे केवळ भूगोल नाही. भारत एक प्रकृती आहे, स्वभाव आहे. काही लोक या मूल्यानुसार राहू शकले नाहीत आणि त्यांनी वेगळा देश निर्माण केला. पण जे राहिले त्यांनी स्वाभाविकपणे हे सार स्वीकारले आणि हे सार काय आहे, तर हा हिंदू समाज, जो जगातील विविधतेचा स्वीकार करून भारताला भरभराटीला आणतो. आपण विविधतेत एकता म्हणतो, पण हिंदू समाज मानतो की, ही विविधता स्वतःच एकता आहे.

डॉ. भागवत म्हणाले, भारतात कोणीही सम्राट किंवा महाराजांचे स्मरण करीत नाही तर त्याऐवजी एका राजाचे स्मरण करते, जो वडिलांच्या वचनासाठी १४ वर्षे वनवासात गेला. हा स्पष्ट संदर्भ भगवान श्रीराम यांचा आहे. आणि दुसरे त्याचे स्मरण ज्याने १४ वर्षे भावाच्या खडावा सिंहासनावर ठेवून राज्य केले आणि परतल्यावर त्याला सिंहासन दिले.

ही वैशिष्ट्ये भारताची व्याख्या करतात. या मूल्याचे पालन करणारे हिंदू आहेत आणि ते संपूर्ण देशाची विविधता एकसंध ठेवतात. आम्ही इतरांना दुखावणाऱ्या कृतींमध्ये सहभागी होणार नाही. शासक, प्रशासक आणि महापुरुष त्यांचे काम करतात, परंतु समाजाने राष्ट्राची सेवा करण्यासाठी पुढे आले पाहिजे, असेही सरसंघचालक म्हणाले. (वृत्तसंस्था)

### हिंदू एकतेच्या गरजेचा पुनरुच्चार

हिंदू एकतेच्या गरजेचा पुनरुच्चार करताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, चांगल्या काळातही आव्हाने नेहमीच उद्‌भवतात. समस्येचे स्वरूप अप्रासंगिक असते, त्यांना तोंड देण्यासाठी आपण किती तयार आहोत हे महत्त्वाचे असते. सद्गुणांमध्ये श्रेष्ठ नसलेल्या मूठभर रानटी लोकांनी भारतावर राज्य केले आणि समाजात विश्वासघाताचे चक्र सुरूच आहे. मुळात, भारताची निर्मिती ब्रिटिशांनी केली नाही मात्र, भारताचे विभाजन करण्याची कल्पना त्यांनीच रुजवली होती.

# सांगोल्यात सापडला 'जीबीएसचा' रुग्ण

### वैद्यकीय व विस्तार अधिकाऱ्यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१६ फेब्रुवारी-**

सांगोला तालुक्यातील महुद गावामध्ये जीबीएस (गुलियन बॅरी सिंड्रोम्स) बाधित रुग्ण आढळून आल्याने तो पंढरपूर येथील काणेज हॉस्पिटल, नवीन कराड नाका येथे उपचार घेत आहे. सदर रुग्णाची विचारपूस करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, महुद येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याण ढाळे, विस्तार अधिकारी मिलिंद सावंत, आरोग्य सहाय्यक नंदकुमार पोतदार, आरोग्य सेवक विजय दंदाडे, आबासाहेब गुरव यांनी भेट दिली.


न्युरोफिजिशियन डॉ.राहुल नागणे यांनी त्याची सीएसएफ व ईएमजी तपासणी केली असता जीबीएसची प्राथमिक लक्षणे आढळून आल्याचे सांगितले. तो रुग्ण जेबीएस पॉझिटिव्ह आहे व अर्ली डिसेक्शन आहे. त्यांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्याची सोय केली आहे. पुढील उपचार हॉस्पिटलमध्ये थांबून घ्यावे लागणार आहेत. सध्या पेशंटची तब्येत उत्तम व स्थिर असून याबाबत कोणताही धोका नाही, असे डॉ. सुरेंद्र काणे यांनी सांगितले अशी माहिती विस्तार अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली. तालुक्यात जीबीएसचा पहिला रुग्ण सापडल्यामुळे आरोग्य विभागाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून गावांमध्ये सर्वे क्षण मोहीम सुरू केली आहे. घरोघरी जाऊन तपासणी मोहीम हाती घेतली आहे.

जीबीएस आजाराबाबतचे वेळेत गांभीर्य ओळखून न्यूरोलॉजिकल सोसायटी ऑफ, पुणे यांचे मार्गदर्शक सूचनेनुसार कारवाई व प्रतिबंधात्मक उपाय योजनासाठी अंमलबजावणी सुरू केली आहे. याबाबत कोणी घाबरून न जाता नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. वैयक्तिक स्वच्छतेवर अधिक भर द्यावा. दूषित पाणी पिऊ नये, तसेच बाहेरील उघड्यावरील पदार्थ खाणे टाळावे. अचानक हाताला व पायाला अशक्तपणा येणे, मुंग्या येणे, कमजोर वाटणे इत्यादी लक्षणे आढळून आल्यास आल्यास तातडीने नजीकच्या सरकारी दवाखान्याची संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. कल्याण ढाळे यांनी केले आहे.

### महत्त्वाचे

## शेअर बाजाराचे मूल्य चार ट्रिलियन डॉलर्सने घसरले

**नवी दिल्ली** : भारतीय शेअर बाजाराचे मूल्यांकन चार ट्रिलियन डॉलर्स म्हणजे सुमारे ३४७.४७ ट्रिलियन रुपयांनी कमी झाले आहे. व्यापारादरम्यान ते ३.९८ ट्रिलियनपर्यंत खाली आले आहे.



नंतर ते सावरले आणि पुन्हा चार ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे गेले. याचे कारण रुपयातील घसरण आणि शेअर बाजारातील घसरण असल्याचे सांगितले जात आहे. ४ डिसेंबर २०२३ नंतर पहिल्यांदाच बाजार भांडवल या बेंचमार्कपेक्षा खाली आला आहे. जागतिक बाजारपेठेच्या तुलनेत यावर्षीची ही सर्वांत मोठी घसरण आहे.

## महिलांसाठी विशेष सेवा सुरू करणार रॅपिडो

**नवी दिल्ली** : देशातील नामांकित कॅब ॲग्रीगेटर कंपनी रॅपिडो लवकरच महिलांसाठी एक विशेष सेवा सुरू करणार आहे. या सेवेद्वारे कंपनी जवळपास २५ हजार महिलांना रोजगारसुद्धा देणार आहे. रॅपिडो ही देशातील तीन प्रमुख कॅब सर्व्हिस देणारी कंपनी आहे, जी देशभरात टॅक्सी, ऑटो आणि बाईकने प्रवास करण्याची सुविधा पुरवते. आतापर्यंत रॅपिडोमध्ये फक्त पुरुषच कॅब, ऑटो आणि बाईक चालवू शकत होते. मात्र, आता रॅपिडो बाईक चालवणारी महिला दिसणार आहे. ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे कॅब बुकिंग सुविधा देणारी कंपनी रॅपिडो कर्नाटकात 'पिंक रॅपिडो बाईकचा नवीन ताफा आणणार आहे. ही सेवा विशेषतः महिलांसाठी असणार आहे. हा उपक्रम या वर्षाच्या अखेरीस सुरू केला जाईल. ही सर्व्हिस आधी कर्नाटकातील बंगळुरू शहरात सुरू केली जाऊ शकते.

## सांगोला उपसा सिंचन योजनेचे आज भुमिपूजन

**सोलापूर दि.१६ फेब्रुवारी-**

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना सांगोला या योजनेच्या कामास शासनाने फेब्रुवारीमध्ये सुधारीत प्रशासकीय मंजुरी दिली असून, या काम ाचे भूमिपूजन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते १७ फेब्रुवारी रोजी जाधववाडी, (ता. सांगोला) येथे दुपारी दोन वाजता होणार आहे, अशी माहिती भीमा कालवा मंडळाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे यांनी दिली आहे. या योजनेकरिता उजनी धरणामधून २.०० अ.घ.फू. पाण्याची तरतूद असून या पाण्याद्वारे सांगोला तालुक्यातील दुष्काळी लक्ष्मीनगर, अचकदाणी, बागलवाडी, सोनलवाडी, अजनाळे, मंगेवाडी, बंडगरवाडी, चिकम हुद, कटफळ, खवासपूर लोटेवाडी व इटकी या १२ गावातील सुमारे १३ हजार ५५ हेक्टर क्षेत्रास व सांगोला शाखा कालवा क्र. ५ अंतर्गत २ हजार ३४५ हे. असे एकूण १५ हजार ४०० हे. क्षेत्राचा सिंचनाचा लाभ मिळणार आहे. ब-याच वर्षापासून शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होत आहे.

# दिल्लीतील चेंगराचेंगरीची बळीसंख्या १८

**नवी दिल्ली, १६ फेब्रुवारी**

दिल्लीतील रेल्वेस्थानकावर शनिवारी रात्री उशिरा झालेल्या चेंगराचेंगरीतील बळीसंख्या १८ झाली आहे. फुटओव्हर ब्रिजवरून येताना काही प्रवासी घसरून इतरांवर पडल्याने ही चेंगराचेंगरी झाल्याची माहिती रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

मोठ्या प्रमाणात गर्दी असलेल्या रेल्वेस्थानकावर शनिवारी रात्री झालेल्या चेंगराचेंगरीत १२ पेक्षा जास्त प्रवासी जखमी झाले आहेत. प्रवासी प्रयागराजला जाणाऱ्या रेल्वेगाडीची प्रतीक्षा करीत असताना फलाट क्रमांक १४ आणि १५ वर ही चेंगराचेंगरी झाली. चेंगराचेंगरी झाली त्यावेळी पाटणा येथे जाणारी मगध एक्सप्रेस फलाट क्रमांक १४ आणि नवी दिल्ली-जम्मू उत्तर संपर्क क्रांती एक्सप्रेस फलाट क्रमांक १५ वर उभी होती. अशी माहिती उत्तर रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी हिमांशू उपाध्याय यांनी

**नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर प्रवाशांची उडालेली झुंबड सांगितले**

फलाट क्रमांक १४ आणि १५ वर फुटओव्हर ब्रिजवरून येणारे काही प्रवासी घसरून इतरांवर पडले. त्यामुळे ही चेंगराचेंगरी झाली, असे उपाध्याय यांनी सांगितले. गाड्यांना होणारा विलंब आणि दर तासाला १,५०० सामान्य तिकिटांची विक्री यामुळे स्थानकावर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली असावी. या उलट फलाट बदलण्याच्या चुकीच्या घोषणेमुळे गोंधळ होऊन ही चेंगराचेंगरी झाली, असे सूत्रांनी सांगितले. चेंगराचेंगरीनंतर फलाटावर चप्पल व जोड्यांचा खच पडला होता.

### चौकशी समिती गठित

चेंगराचेंगरीच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या चौकशी समितीचा भाग म्हणून रेल्वेने दोन उच्च प्रशासकीय गट अधिकाऱ्यांची नावे जाहीर केली आहेत. उत्तर रेल्वेचे प्रधान मुख्य व्यावसायिक व्यवस्थापक नरसिंह देव आणि उत्तर रेल्वेचे प्रधान मुख्य सचिव पंकज गंगवार हे समितीचे सदस्य असल्याची माहिती रेल्वेने दिली.

# अनेक कंत्राटदार काम न करता सादर करतात बिले

### अजित पवार यांचा इशारा

**जालना, १६ फेब्रुवारी**

प्रत्यक्षात काम न करताही अनेक कंत्राटदार विकासकामांची बिले सादर करून त्याचे पैसे मिळवत आहेत. असा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला.

परतूर येथे शनिवारी झालेल्या एका कार्यक्रमात काँग्रेसचे नेते अशोक जेठलिया यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात अजित पवार बोलत होते. मोठ्या प्रमाणात खर्च करूनही विकासकामांचा दर्जा निकृष्ट राहतो, यावर अजित पवार यांनी चिंता व्यक्त करताना कंत्राटदारांना कधीच आपल्या पक्षात येऊ देणार नाही, अशी प्रतिज्ञा केली. कोणतेही काम न करता बिले सादर केली जातात. आपले काम प्रामाणिकपणे करा, असे आवाहन त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना केले. सरकार वेतन आणि पेन्शनवर कोट्यवधी रुपये खर्च करते, तरीही दर्जेदार कामे केली जात नाही. आम्ही सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी केली असतानाही सरकारी अधिकारी जबाबदारी का घेत नाहीत, असा प्रश्न अजित पवार यांनी उपस्थित केला. (वृत्तसंस्था)

## बुधवारी लाँच होणार ॲपलचा स्वस्त मोबाईल

**नवी दिल्ली** : टेक कंपनी ॲपल येत्या बुधवारी १९ फेब्रुवारी रोजी एक नवीन स्मार्टफोन लाँच करण्याच्या तयारीत आहे. हा आयफोन एसई ४ असू शकतो. कंपनीचे संस्थापक आणि सीईओ टीम कुक यांनी ही माहिती दिली. सोबतच त्यांनी याविषयीचा एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये सिल्व्हर रंगाचा ॲपल लोगो आहे.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि त्यांच्या पत्नी कांचन गडकरी यांनी रविवारी उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभात सहभागी होत, त्रिवेणी संगमात पवित्र स्नान करून गंगेची पूजा केली


# संयुक्त राष्ट्रांसाठी हिंदी भाषा महत्त्वाची

## जागतिक संवाद विभागाच्या उपमहासचिव मेलिसा फ्लेमिंग यांचे प्रतिपादन

**न्यू यॉर्क, १६ फेबुवारी**

जगात ६० कोटी भाषिक असलेली हिंदी भाषा संयुक्त राष्ट्रांसाठी महत्त्वाची आहे. हिंदीला लोकप्रिय भाषा बनविण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेण्यात आले, त्यामुळे हिंदी लवकरच जागतिक भाषा होणार असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक संवाद विभागाच्या उपमहासचिव मेलिसा फ्लेमिंग यांनी नमूद केले.

संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या स्थायी मिशनने जागतिक हिंदी दिन कार्यक्रमाचे आयोजन केले, यावेळी



बहुभाषिकता आणि परदेशात हिंदीचा प्रचार या विषयावर बोलताना मेलिसा फ्लेमिंग म्हणाल्या, भारतासह जगात ६० कोटी नागरिकांची भाषा हिंदी आहे. हिंदी भाषा आमच्यासाठी अतिशय महत्त्वाची असून संयुक्त राष्ट्रांच्या विविध समाज माध्यमावर हिंदी भाषेतून माहिती प्रसारित करण्यात येते. संयुक्त राष्ट्राने हिंदीला मान्यता दिल्याने आणि या भाषेच्या प्रसारासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येत असल्याने हिंदी लवकरच जागतिक भाषा होईल यात दुमत नाही. (वृत्तसंस्था)

### भारताने दिला ७० लाख डॉलर्सचा निधी

संयुक्त राष्ट्रातील भारताचे स्थायी प्रतिनिधी राजदूत पी. हरीश म्हणाले, संयुक्त राष्ट्रांकडून प्रसारित होणारी माहिती हिंदी भाषेतून देण्यासाठी भारताने ७० लाख डॉलर्सचा निधी दिला आहे. यावेळी कार्यक्रमाला उपस्थित महिला आणि बाल विकास राज्यमंत्री सावित्री ठाकूर यांनी भारतातील बहुभाषिक, बहुसंस्कृती आणि सामाजिक रचनेवर प्रकाश टाकला. या कार्यक्रमात संयुक्त राष्ट्रांतील इतर देशांचे राजदूत, प्रतिनिधी आणि भाषा विषयाचे तज्ज्ञ उपस्थित होते.

# रेल्वे प्रवासातही माय मराठीचा जागर!

## रेल्वेत प्रथमच रंगणार मराठी साहित्ययात्री संमेलन

**पुणे, १६ फेब्रुवारी**

देशाची राजधानी दिल्लीत यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून सारस्वत व मराठीप्रेमी रसिक या संमेलनासाठी विशेष रेल्वेने दिल्लीकडे कूच करणार आहेत. बुधवारी दुपारी पुण्यातून निघणाऱ्या रेल्वेत यंदा प्रथमच मराठी साहित्ययात्री संमेलन आहे. ही विशेष रेल्वे गुरुवारी रात्री दिल्लीत पोहचणार आहे.

साहित्यरसिकांना पुण्यातून दिल्लीला घेऊन जाणाऱ्या रेल्वेला महान सेनानी महादजी शिंदे यांचे नाव देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, रेल्वेतील प्रत्येक बोगीला छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांची नावे दिली जाणार आहेत. मराठी भाषामंत्री उदय सामंत हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष, शरद तांदळे हे संमेलनाध्यक्ष, तर वैभव वाघ संमेलनाचे कार्यकारी अध्यक्ष असणार आहेत.

मुख्य संमेलनानिमित्त रेल्वेत होणारे हे मराठीतील पहिलेच संमेलन असणार आहे. प्रवासी साहित्य संमेलन भरवावे, या संकल्पनेतून हे संमेलन आयोजिले आहे. या संमेलनानिमित्त उदय सामंत हेही रेल्वेतून प्रवास करीत साहित्यिक, साहित्यप्रेमींशी संवाद साधणार आहेत. ज्येष्ठ लेखिका डॉ. संगीता बर्वे याही रेल्वेतील या संमेलनात सहभागी होणार आहेत, अशी माहिती सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार यांनी पत्रपरिषदेत दिली. (वृत्तसंस्था)

# १०० अमृत भारत, ५० नमो भारत, २०० वंदे भारत

### भारतीय रेल्वेची गेम चेंजर योजना

**नवी दिल्ली, १६ फेब्रुवारी**

अर्थसंकल्पात भारतीय रेल्वेसाठी २.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची घोषणा केली. यात १७,५०० जनरल कोच, १०० अमृत भारत, ५० नमो भारत आणि २०० वंदे भारत ट्रेनचा समावेश आहे. येत्या २ ते ३ वर्षांत गाड्या तयार होणार आहेत.



रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरांमधील कमी अंतराचा प्रवास सुधारणे हा त्यामागचा उद्देश आहे. याशिवाय ४.६ लाख कोटी रुपयांच्या नवीन प्रकल्पांचे काम चार ते पाच वर्षांत पूर्ण केले जाईल. यात नवीन रेल्वे लाईन बांधणे आणि स्थानकांची पुनर्रचना करणे यांचा समावेश आहे. १७,५०० जनरल डब्यांपैकी १४०० डबे मार्चपर्यंत तयार होतील. पुढील आर्थिक वर्षात २ हजार डबे तयार केले जातील. याशिवाय एक हजार नवीन उड्डाणपूल बांधण्यासही मंजुरी देण्यात आली आहे.

**जगातील दुसऱ्या क्रमांकाची मालवाहतूक बनवणार**

१.६ अब्ज टन मालवाहतूक क्षमता गाठण्याचे रेल्वेचे लक्ष्य आहे. यामुळे भारत चीननंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वांत मोठी मालवाहतूक करणारी रेल्वे बनवणार आहे. सुरक्षेसाठीची गुंतवणूकही १.०८लाख कोटी रुपयांवरून १.१४ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. पुढील वर्षी ते १.१६ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. नवीन रेल्वे लाईन बांधणे आणि स्थानकांचे रीमॉडेलिंग यांचा समावेश आहे. १७,५०० जनरल डब्यांपैकी १४०० मार्चपर्यंत तयार होतील, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली. (वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त



### खासदार शिंदेंच्या हस्ते एमपीएससी परीक्षेत यश मिळवणाऱ्या भोजने भगिनींचा सत्कार

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

येथील गवळी वस्तीमधील अतिशय गरीब परिस्थितीत जिद्दीने एमपीएससी पास झालेल्या संजीवनी ज्योतीराम भोजने आणि सरोजिनी ज्योतीराम भोजने या दोन सख्ख्या बहिणींची खासदार प्रणिती शिंदे यांनी भेट घेवून त्यांचा सत्कारही केला. घरचे अठराविश्व दारिद्र्य, आर्थिक परिस्थितीमुळे पाचवी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या वडिलांचा गॅरेजचा तोडका- मोडका व्यवसाय, सहा माणसांचं कुटुंब चालविण्यासाठी सुरू असलेली वडिलांची धडपड, जिथे घर चालवण्याची चिंता तिथे मुला-मुलींच्या शिक्षणाचा तर विचारच न केलेला बरा. परंतु वडिलांच्या जिद्दीमुळे मुलींनी केलेला दृढनिश्चय कामाला आला आणि कामगार वस्ती परिसरात गवळी वस्तीमधील आठ पत्र्याच्या घरातील गॅरेज चालक ज्योतीराम भोजने यांच्या दोन्ही मुलींनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशाचा झेंडा रोवला. याबद्दल खासदार प्रणिती शिंदे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन या दोघी बहिणींचा सत्कार केला. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी नगरसेवक म नोज यलगुलवार, माजी नगरसेवक गणेश वानकर, तिरुपती परकीपंडला आदी उपस्थित होते.



### कर्तव्यनिष्ठ महिला अधिकाऱ्यांच्या कलाकारीने दिला 'मैफिलीचा नजराना'

**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

दुआ तू है, ममता की माँ तू, बडी खूबसुरत है मेरी माँ अशा शब्दांनी आईच्या प्रेमाची आणि सौंदर्याची नजाकत आपल्या शब्दांनी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग यांनी तर उन्हासोबत तुलना करणाऱ्या सोलापूरच्या उन्हावर आईची उपमा स्पष्ट करणारी कविता मनीषा कुंभार यांनी सादर केली. अन् सभागृहात उपस्थित असलेल्या दर्दीनी टाळ्या वाजवून दाद दिली. शुक्रवारी सायंकाळी दखनी अदाब फाउंडेशनच्या वतीने छत्रपती रंगभवन सभागृहात सादर केलेल्या 'एक मै और एक तू' या मैफिलीच्या कार्यक्रमात या दोन अधिकाऱ्यांनी सोलापूरकरांना दिलखुलास आनंद दिला. नाते संबंध, आईचे प्रेम, प्रियकर प्रेयसीचे हळुवार गोड भांडण आणि अबोल्यातले नाते, पाऊस आणि जगरहाटीवर, ऋतुंवर मनमुराद गप्पा मारत यावेळी या दोन्ही कवियित्रींनी आपल्या अनोख्या शब्दांनी मैफिल सजविली. यावेळी सोलापूरच्या उन्हाचे कौतुक करताना कुंभार यांनी आईचा पदर ही कविता तर गुलाबी इश्क या सिंग यांच्या रचनेवर अनेकांनी टाळ्यांची बरसात केली. गुलजारांच्या निवडक गजलांची आठवण, माधव दातार यांच्या बहावा कविता, बे ख्याली ही रचना, उस रोज तू आया नही, तुझं तक पहुचने के लिये, कृष्ण आणि विठ्ठलावर साकारलेल्या शेवटच्या कलाकृतीनेही रसिकाना घायाळ केले. दत्तप्रसाद रानडे यांच्या गजलांही यावेळी सादर केल्या.



### चाँद-तारा प्राथमिक शाळेत उर्दू दिवस साजरा

**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

फिरदोस महिला शिक्षण व समाजसेवा संस्था संचलित चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळा येथे उर्दूचे प्रसिद्ध कवी मिर्झा गालिब यांच्या पुण्यतिथीनिमित्त उर्दू दिवस साजरा करण्यात आल. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हाजी बशीर अहमद बागवान होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक मन्नान शेख, संस्थेचे अध्यक्ष डॉ. जे. बी. बागवान उपस्थित होते. प्रारंभी संस्थेची व शाळेची माहिती मुख्याध्यापिका सौदागर गजाला यांनी दिली. यावेळी मन्नान शेख यांनी उर्दू भोषच्या महत्व सांगितले तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी मिर्झा गालीब यांचे गजल सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खतिब उम्मे हबीबा यांनी केले तर आभार चौधरी यास्मीन यांनी व्यक्त केले. यावेळी सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# सामान्य व्यक्तीच्या अर्थव्यवस्थेतील योगदानानेच विकसित भारत शक्य

## डॉ. उपेंद्र कुलकर्णी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य व्यक्तीला कारागीर म्हणुन उत्पादन व्यवस्थते सहभागी करुन घ्यावेच लागणार आहे. या सर्वसामान्य व्यक्तीच्या अर्थव्यवस्थेतील योगदान वाढीमुळेच विकसित भारत शक्य असल्याचे प्रतिपादन दिनदयाळ संशोधन संस्थचे प्रकल्प संचालक डॉ. उपेंन्द्र कुलकर्णी यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि पीएम उषा अंतर्गत विकसित भारत २०४७ शाश्वत विकासाचे मार्ग या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या समारोप प्रसंगी डॉ. उपेंन्द्र कुलकर्णी बोलत होते. यावेळी व्यापसपीठावर कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगीनी घारे, सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, प्राचिन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, उपस्थित होते.




यावेळी डॉ. उपेंन्द्र कुलकर्णी म्हणाले सध्या प्रचलीत असलेल्या व्यवस्थेचा अभ्यास करुन सामान्य व्यक्तीचे विकासात उद्योग धंद्याच्या माध्यमातुन योगदान वाढवावे लागणार आहे. शेती उत्पादनावर प्रक्रिया करुन शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवता येते. त्यासाठी विद्यापीठे समाजासाठी खुली करावी लागणार आहेत. तेव्हाच विकसित भारत शक्य आहे. असेही डॉ. उपेंन्द्र कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. यावेळी कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर म्हणाले, विकसित भारत निर्मित करण्यामध्ये सर्वसामान्य व्यक्तीचे उत्पन्न वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. अशा परिषदामधुन विकसित भारताच्या विविध विषयावर चर्चा होऊन दिशा ठरणार आहे.

यावेळी प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा म्हणाले, भारत देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विविध क्षेत्रामध्ये झपाट्याने विकास करत आहे. त्यामध्ये कृषी, आय टी, अंतराळ संशोधन क्षेत्राचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. असे स्पष्ट केले. यावेळी डॉ. गौतम कांबळे म्हणाले, विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातुन विविध विषयावर मांडणी आणि संशोधन पेपर सादर करण्यात आले आहेत. या सर्वाचा आढावा घेवून धोरण निर्मिती अहवाल तयार करण्यात येणार आहे. आणि तो शासनाला सादर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. यावेळी दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात गोखले इंस्ट्युट ऑफ इकॉनॉमिक अ‍ॅण्ड पॉलिटक्सचे डॉ. प्रकाश व्हनकडे, डॉ. रविंद्र गवळी, स्वंयम शिक्षण प्रयोग संस्थेच्या नसीम शेख यांनी विकसित भारत २०४७ या विषयावर मांडणी केली. तर सत्राचे अध्यक्षपद डॉ. बी.जे. लोखंडे यांनी भूषविले.

कार्यक्रमाला राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, मानव्यशास्त्र विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत कोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य पद्मजादेवी मोहिते-पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड, प्राचार्य सी.बी. कोळेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. अंबादास भास्के यांनी केले तर आभार प्रा. अश्विनी पांढरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी इम्रान शेख, बसवकुमार लंगोटे, राजेश पाटील यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय लोक अदालतीचे २२ मार्चला आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

राज्य विधी सेवा प्राधिकरण, यांचे निर्देशानुसार सन २०२५ सालातील पहिले राष्ट्रीय लोकअदालत २२ मार्च रोजी जिल्हयातील सर्व न्यायालयात आयोजित केले आहे.

या लोक अदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बॅक वसुली प्रकरणे, कलम ३८ एन. आय. अ‍ॅक्ट, अपघात न्यायाधिकरणाबाबत, कामगार वाद, वीज व पाणी यांच्या देयकाबाबत, वैवाहिक वादाबाबत, भुसंपादन बाबत तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, नॅक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थित राहणेकरीता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे. धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेशाची थोडी रक्कम भरुन प्रकरण निकाली काढता येणे शक्य आहे. धनादेशाची रक्कम एक रकमी देता येणे शक्य नसल्यास ठरलेल्या रक्कमेचे हप्ते बांधून घेणे शक्य होणार आहे. काही रक्कम लोकअदालती दिवशी देवून उर्वरीत रक्कमेबाबत तडजोड हुकुमनामा करणे व संपूर्ण फौजदारी प्रकरण निकाली निघणे शक्य होणार आहे. राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये पक्षकारांनी आपाली प्रकरणे तडजोडीने मिटवून लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा यांनी केले आहे.

# 'जवाहर'च्या माजी विद्यार्थ्यांकडून माणुसकीचे दर्शन

## 31 वर्षांपूर्वीच्या मित्राच्या कुटुंबाला केली मदत

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि.१६ फेब्रुवारी-**

कोण म्हणतं माणुसकी संपली, ती आजून जिवंत असल्याचे उदाहरण, दाखवून दिले जवाहर विद्यालय अणदूरच्या १९९४ दहावी बॅचच्या ६० वर्ग मित्र मैत्रिणींनी,आपला एक वर्गमित्र अचानक देवाघरी गेला, त्याच्या कुटुंबाची अवस्था वाईट असल्याने ३१ वर्षांपूर्वी चे हे साठ मित्र मैत्रिणींनी वर्गणी जमा करून तब्बल १ लाखांची मदत त्या कुटुंबाला केली त्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. शिक्षण महर्षी स्व.सि.ना.आलूरे गुरुजी यांच्या संस्कारातून निर्माण झालेल्या जवाहर विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनींसाठी पुढाकार घेतला.



त्याचे असे झाले बसवराज मेंगशेट्टी हे १९९४ ला दहावी या वर्गात जवाहर विद्यालय अणदूर येथे होते त्या नंतर ते लातूर येथे सेटल झाले नुकतेच त्यांचे वयाच्या ४६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांची परिस्थिती जेमतेम होते घरातील कर्ता पुरुष निघून गेल्याने त्या कुटुंबावर फार मोठे संकट आले. यावेळी त्यांचे दहावीतील वर्गमित्र मदतीला धावून आले, त्यांच्या क्लासमेंट ग्रुपवर, विनायक अहंकारी यांनी स्व. बसवराज मेंगशेट्टी या मित्राच्या कुटुंबाला,आर्थिक मदत करण्याचा मेसेज टाकला, अन त्याला भरभरून प्रतिसाद मिळाला तब्बल ६० मित्र मैत्रिणींनी कोणी हजार, दोन हजार रुपये ऑनलाइन जमा केले ते एक लाख रुपये जमा झाले, प्रतिनिधीक स्वरूपात विनायक अहंकारी, राम हाण्डगे, अमोल नरवडे यांनी ती सर्व रक्कम बसवराज यांच्या पत्नी व मातोश्री व मेंगशेट्टी कुटुंबाला लातूर येथील घरी नेऊन देण्यात आली,स्व. बसवराज यांना ३ मुलीच आहेत. या पुढेही त्यांना वेळोवेळी वेगवेगळी मदत करणार असल्याचे या ग्रुप ने सांगितले. ही आर्थिक मदत सोलापूर, गुजरात, पुणे, मुंबई, संभाजीनगर, राजेश्वर, कर्नाटक आदी भागातील ६० वर्गमित्रांनी जमा केली अगदी अमेरिकेत असलेल्या त्याच्या एका मित्रानेही घसघशीत मदत केली. यासाठी स्व. बसवराज यांचे वर्गमित्र निजगुण हिरेमठ, केदार खोबरे, नागेश धुमाळ, सुजाता पाटील, शिल्पा कुलकर्णी, आदी मित्र,मैत्रिणीनी प्रयत्न केले, असाच आदर्श इतर ग्रुप ने पण घेऊन आपल्या संकटातील वर्ग मित्रांना मदत करावी एवढी भावना मकरंद पाटील यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

# विश्वासपूर्ण पारदर्शक, सुलभ सेवेमुळे नीलकंठ बँकेचा नावलौकिक : डी. राम रेड्डी



## नीलकंठ बँकेच्या अक्कलकोट रोड एमआयडीसी शाखेचा नूतन वास्तुत स्थलांतर समारंभ थाटात

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

पारदर्शक आणि अथक प्रयत्नातून यश मिळते. नीलकंठ बँकच्या एमआयडीसी शाखेचे स्वमालकीच्या वास्तुत स्थलांतर ही बाब समाधानकारक आहे. दूरदृष्टी ठेवून भविष्याचा वेध घेऊन बँकेने रचनात्मक कार्य केले आहे. उत्तुंग भरारी घेतली आहे. विश्वासपूर्ण पारदर्शक, सुलभ सेवेमुळे नीलकंठ बँकेचा नावलौकिक आहे, असे गौरवोद्गार बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांनी काढले. नीलकंठ को-ऑपरेटीव्ह बँकेच्या अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. शाखेचा स्वमालकीच्या नूतन वास्तुत स्थलांतर समारंभ रविवारी सकाळी श्री वसुंधरा हाईट्स, सादूल पेट्रोल पंपालगत, अक्कलकोट रोड, सोलापूर येथे बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांच्या हस्ते पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून वर्ग एक लेखापरीक्षक विष्णू डोके, उद्योगपती लक्ष्मीनारायण सोमाणी, मार्कंडेय सहकारी रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मंचावर नीलकंठ को- ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन विजयकुमार उपाध्ये, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन कौस्तुभ करवा, संचालक जमनादास भुतडा, चंद्रकांत तापडीया, शरद कालाणी, अभिजीत चिल्लाळ, संचालिका पद्मा भुतडा, नंदा भट्टड, तज्ञ संचालक आनंद झंवर, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य अमित मर्दा, राजगोपाल सोमाणी आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

चेअरमन विजयकुमार उपाध्ये यांनी स्वागतपर भाषणात २६ वर्षांपूर्वी नीलकंठ को ऑपरेटीव्ह बँक लिमिटेडची स्थापना झाली. आज तीन शाखांसह यशस्वीरित्या कार्यरत आहे. आर्थिक विकासाचा संकल्प करून पारदर्शक, सुलभ सेवेच्या माध्यमातून आपल्या बँकेचा लौकिक आहे, असे सांगितले.

प्रास्ताविक व्हाईस चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी केले. सुत्रसंचालन मंजूषा गाडगीळ यांनी केले तर आभार कौस्तुभ करवा यांनी मानले. याप्रसंगी नंदा करवा, निकिता करवा, निलाशा नोगजा, तुळसीदास भुतडा, राजकुमार राठी, काशिनाथ गड्डम, मनीष बलदवा, गिरीष बलदवा, किसन श्रीराम, पशुपती माशाळ, जयनारायण भुतडा, ज्ञानेश्वर दिवटे, असिम सिंदगी, जवाहर जाजू, पेटप्पा गड्डम, सीए चंद्रकांत गालपल्ली यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# तळे हिप्परगा येथे स्फूर्ती दिनानिमित्त कार्यक्रम उत्साहात

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

तळे हिप्परगा मंठाळकर वस्ती येथील जिल्हा परिषद शाळेत शिवाजी जाधव स्फूर्ती दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन शाळा मंडळ वस्तीच्या वतीने केले होते. मुख्याध्यापक लिंबराज जाधव यांचे वडील, स्वर्गीय शिवाजी जाधव यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त हा कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून ह. भ. प. राजू महाराज बोराटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकुसर शेख होत्या. सुरेखा कोरे यांनी विद्यार्थ्यांकडून प्रार्थना करून घेतली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

### स्व. शिवाजी जाधव यांचे जीवन आणि कार्य

ह.भ.प. राजू महाराज बोराटे यांनी स्वर्गीय शिवाजी जाधव यांचे स्मरण करताना सांगितले की, ते वारकरी संप्रदायाचे तालुका संस्थापक होते. उत्कृष्ट पेटी वादक म्हणून पंचक्रोशीत त्यांची ख्याती होती. ते दर पंधरवड्याला पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराची वारी करत आणि पांडुरंगाचे निस्सीम भक्त होते. सत्ययुगातील सत्यमेव जयते या तत्त्वाचा अंगीकार करून त्यांनी वारकरी संप्रदायातील पारंपारिकता व प्रयोगशीलता यांचे उत्तम मिश्रण घडवले.

# रोटरी क्लब व शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या चित्रकला स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## ४० शाळांमधील १७०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

रस्ते अपघातांमध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन हे प्रमुख कारण आहे. एक अपघात पूर्ण परिवाराचे आयुष्य उध्वस्त करतो यामुळे रस्ता सुरक्षा आणि वाहतुकिचे नियम या बद्दल जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे आणि विशेषतः मुलामध्ये कमी वयात याची जागृती करणे आवश्यक आहे

हाच धागा पकडून रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांनी शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या मदतीने रस्ता सुरक्षा व वाहतूक नियम यावर प्रभावी सामाजिक संदेश देणारी भव्य चित्रकला स्पर्धा ५वी ते ९वी च्या शालेय विद्यार्थ्यांसाठी रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी नागेश करजगी ऑर्किड स्कूल, जुनी मिल कंपाऊंड येथे आयोजित केली. ह्या स्पर्धेचे प्रायोजक इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड सर्वो लुब्रिकेंट्स हे होते. ४० शाळांमधील १७०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने या स्पर्धेत सहभाग घेतला व आपल्या कल्पक रेखाटनांमधून समाजप्रबोधन केले. विद्यार्थ्यांनी केवळ सुंदर चित्रे काढली नाहीत, तर आपल्या सुट्टीचा आनंद घेत अविस्मरणीय आठवणीही घरी घेऊन गेले.अशा प्रयत्नाने ''रस्ता सुरक्षा'' या महत्त्वाच्या सामाजिक विषयावर व्यापक जनजागृती होईल अशी आशा रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष रोटे सिए सुनील माहेश्वरी यांनी व्यक्त केली. हि स्पर्धा भरविण्यास शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर पीएसआय प्रवीण पारडे, कर्मचारी विजय पोळ यांचे विशेष सहकार्य लाभले असे प्रकल्प प्रमुख रोटे सलाम शेख यांनी नमूद केले. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन या भारतातील सर्वात मोठ्या कंपनीने या प्रकल्पास आर्थिक मदद दिली याबद्दल सचिव रोटे ब्रिजकुमार गोयदानी यांनी आभार मानले



विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे योग्य मूल्यांकन करून याचे निकाल मार्च२५ च्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्यात येतील आणि तत्पश्चात बक्षीस समारंभ आयोजित केला जाईल असे संयोजकाने जाहीर केले आहे.

# ठोकळ प्रशालेतील 10वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

इंदिरा ज्ञानवर्धिनी संचलित श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेत इ.१०वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष सचिन ठोकळ, प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त तैमूर मुलाणी, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष सुनिल माहेश्वरी, माजी नगरसेविका पूनम बनसोडे, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पाताई ठोकळ, प्राचार्य डी डी गाजरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थिनींनी सुमधुर गीत गायनाने मान्यवरांचे शब्दसुमनांनी स्वागत झाले. मान्यवरांच्या सत्कारानंतर तामिळनाडूतील त्रिची येथे झालेल्या स्काऊट गाईड राष्ट्रीय जांबोरीमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व ठोकळ प्रशालेतील स्काऊट व गाईड यांनी केले त्याबद्दल स्काऊटर सुरवसे ए. पी. गाईडर चव्हाण पी. एच. तसेच सर्व सहभागी स्काऊट व गाईड यांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



त्यानंतर इ.१० वी तील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शाळेस दिलेल्या स्मार्ट ड्झिटल पॅनल बोर्डचे (टी.व्ही.) सर्व मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. इ. १०वी तील नमीरा शेख, प्रियांका शिंदे, तनिष्का वाघमारे, समर्थ माने यांनी विविध भाषेत शाळेविषयी व शिक्षकांविषयीची भावना यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. श्री.विपीन ठोकळ, उपाध्यक्ष श्री सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पाताई ठोकळ यांनी शाळेचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना सहशिक्षिका पूनम चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन नारायणी शेंडगे हिने केले. प्रज्वल टिंगरे याने आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# झंकारती सतार आणि व्यंकटेशकुमार यांच्या सात्विक सूरांनी भारावले रसिकगण

## प्रिसिजनच्या दशकपूर्ती संगीत महोत्सवाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी -**

प्रिसिजन संगीत महोत्सवाच्या दशकपूर्तीचा दुसरा दिवस आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलाकार सतारवादक असद खान यांच्या सतारवादनाने व गायक पद्मश्री पं. एम व्यंकटेशकुमार यांच्या भावगहिऱ्या गायनाने गाजला.

सतारवादक आणि बहुआयामी संगीतकार असद खान यांनी राग पुरिया कल्याण सादर केला. आलापीच्या सुरूवातीलाच सारेनिसा, निधनि ही सुरावट घेऊन केलेला मंद्र निषादावरचा न्यास रसिकमनास सुखावून गेला. मोजक्या मनमोहक आलापीतून पुरिया कल्याणला आवाहन करून त्यांनी विलंबित व द्रूत त्रिताल मधील दोन स्वररचना सादर केल्या. गायकी अंगाने त्यांनी आपले सतारवादन सादर केले. त्यांची गमकयुक्तशैली, आक्रमक व लडिवाळ अशा दोन्ही शैलीच्या बहारदार अदाकारीला उस्ताद अक्रम खान यांची दमदार साथसंगत लाभली. तबलावादनातील 'अजराडा बाजाचे' बोल, क्वचित अनाघाती तर क्वचित घणाघाती सम कधी अतिगतीमान तर कधी संयमित अशा तबलावादन व सतारीचे झंकार यांचा सुरलयताल असा संगम रसिकांनी अनुभवला.

जुगलबंदी संवादात अक्रमखान यांनी केवळ डग्ग्यावर वाजवलेले सतारीचे सूर ऐकून रसिक मंत्रमुग्ध झाले.

त्यानंतर त्यांनी राग शंकरातील द्रुत एक तालातील रचना सादर केली. त्यांच्या वादनातून रसिकांना ऋतू वसंताची अनुभूती मिळाली. सेहरा प्रकार सादर करताना शंकरामध्ये बिहागचे स्वरांचे बेमालूम मिश्रण करून त्यांनी रसिकांना सुखद धक्का दिला. या संगीत महोत्सवात येण्यास उत्सुक होतो असे असद खान यांनी सांगितले. संध्याकालीन पूरिया कल्याण रागातील सौंदर्यस्थळे सतारवादनातून टिपली.सभागृहात संध्याकाळचे रम्य वातावरण निर्माण झाले. आपल्या आजीची एक हृद्य आठवण सांगत बिहाग रागातील एक विवाह गीत गाऊनही दाखवले. त्यांना हार्मोनियमची सुंदर साथसंगत- नागनाथ नागेशी तबला - केशव जोशी यांनी रंगतदार साथसंगत केली तानपुरा व स्वरसाथ- शिवराज पाटील, अर्जून वठार यांची होती. प्रारंभी डॉ. सुहासिनी शहा, करण शहा, मयुरा दावडा शहा. डॉ. सुधांशु चितळे आणि डॉ. किरण चितळे यांनी कलाकारांचे स्नागत केले.



### 'राजन के राजा शिरीरामचंद्र'


कान्हडा व मालकंस या दोन्ही रागांचे मिश्रण असणारा राग कौशीकान्हडा सादर केला. 'का हे करत मोसे बरजोरी' ही द्रूत त्रितालीत बंदिश सादर केली. कैलाशनाथा गौरी ईशा हे भजन व अक्क केळवा हे कन्नड भजन तर रसिकांच्या आग्रहास्तव ये गं ये गं विठाबाई हा अभंग सादर केला. शामसुंदर मदनमोहन या भैरवीने त्यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

### दुसरे सत्र - पद्मश्री पं. एम. व्यंकटेशकुमार

दुसऱ्या सत्राचा प्रारंभ पं. एम् व्यंकटेशकुमार यांनी राग दुर्गा सादर करून केला. 'तू जी न बोलो' ही विलंबित एकतालातील बंदिश सादर केली. सावकाश बढत करत केलेल्या आलापीने दुर्गाचे स्वरांनी रसिकांच्या मनावर मोहिनी घातली. त्यानंतर त्यांनी द्रुत त्रिताल मध्ये 'माता भवानी काली द्रुर्गा गौरी, विघनहारिणी तारिणी' ही बंदिश सादर केली. यानंतर द्रुत त्रितालातील 'नादिर दिम दिम तदारे दानी' हा तराना विलक्षण लयकारीने सादर केला.

# अमेरिकेने स्थलांतरितांना पुन्हा बेड्या घालून पाठविले

## शिखांच्या पगड्या उतरविल्या; ११६ जणांना घेऊन लष्करी विमान उतरले



अमेरिकेने शनिवारी रात्री आणखी काही भारतीय स्थलांतरितांना भारतात परत पाठविले. पंजाबच्या अमृतसरमध्ये हे विमान आल्यानंतर त्यांना कडेकोट सुरक्षेत वाहनांमधून नेण्यात आले

**नवी दिल्ली, १६ फेब्रुवारी**

काही दिवसांपूर्वी अमेरिकेने १०४ अवैध भारतीय स्थलांतरितांना हातात हातकड्या आणि पायात साखळदंड घालून परत पाठवले होते. यावरून भारतात खळबळ उडाली होती, केंद्र सरकारवर टीकाही झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिका दौऱ्यावेळी हे लोक फसविले गेलेले आहेत, असे ट्रम्पना म्हटले होते. यानंतरही ११६ जणांना पुन्हा तसेच हात,पाय बांधून भारतात पाठविण्यात आले.

अमेरिकन सैन्याचे सी-१७ विमान शनिवारी रात्री साडे अकरा वाजता अमृतसर विमानतळावर उतरले. या विमानात पंजाबचे ६५, हरयाणाचे ३३, गुजरातचे ८, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र व राजस्थानचे प्रत्येकी दोन, हिमाचल, गोवा, जम्मू-काश्मीरचा प्रत्येकी एक व्यक्ती आहे. शनिवारी रात्री आलेल्या या प्रवाशांना गेल्यावेळसारखीच वागणूक देण्यात आली आहे.

विमानातून उतरण्यापूर्वी या बेड्या काढण्यात आल्या. महिला आणि मुलांना मोकळे ठेवण्यात आले होते. यात शीख लोकही होते; पण शीख नागरिकांच्या डोक्यावर पगड्या नव्हत्या. यापैकी काही जण मोठमोठ्याने ओरडून रडत होते.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी मोदींची चर्चा झाल्याने यावेळी भारतीयांना अशी वागणूक मिळणार नाही, अशी अपेक्षा केली जात होती. परंतू, अमेरिकेने पुन्हा एकदा भारतीयांना एलियनसारखी वागणूक दिली तसेच कोणत्याही देशाचा नागरिक अमेरिकेत घुसला, तर त्याला हीच वागणूक मिळणार असल्याचे भारतासह इतर देशांना सांगितले. अमृतसरला आलेले हे दुसरे विमान होते. तिसरे विमान लवकरण येणार असून, त्यात १५७ प्रवासी असण्याची शक्यता आहे.

शनिवारी रात्री ज्या लोकांना अमेरिकेतून विमानात पाठविण्यात आले त्यात देशात मोठ्या गुन्हेगारी कारवाया करून विदेशात पळ काढणाऱ्या काही कुख्यात गुंडांचा समावेश आहे. या गुंडांना लगेच अटक करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

(वृत्तसंस्था)

# कतारचे अमीर आज भारत दौऱ्यावर

## परराष्ट्र मंत्रालयाची माहिती, पंतप्रधान मोदींशी द्विपक्षीय चर्चा

**नवी दिल्ली, १६ फेब्रुवारी**

कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल-थानी सोमवारी दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. या काळात त्यांच्यासोबत एक उच्चस्तरीय शिष्टमंडळही असेल. यावेळी ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करणार आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने समाजमाध्यम मंचावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, कतारचे अमीर भारत भेटीदरम्यान पंतप्रधान मोदींसोबत द्विपक्षीय चर्चा करणार असून, ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील. शेख तमीम बिन हमद अल थानी यांचे १८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात औपचारिक स्वागत केले जाईल. राष्ट्रपती मुर्मू यांच्या सन्मानार्थ रात्रीचे जेवण आयोजित करतील. त्यांच्या भेटीचा उद्देश द्विपक्षीय संबंध मजबूत करणे आहे. या वर्षाच्या अखेरीस परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी कतारला भेट दिली. यावेळी त्यांनी कतारचे पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री मोहम्मद बिन अब्दुल रहमान अल थानी यांची भेट घेतली. त्यावेळी कतारच्या अमीरांचा दौरा निश्चित करण्यात आला.

**कतार खास का आहे?**

भारत आपल्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कतारकडे एक सुरक्षित पर्याय म्हणून पाहत आहे. कतार हा भारताचा सर्वांत मोठा एलएनजी पुरवठादार आहे. भारताच्या एलएनजी गरजेपैकी ५० टक्के कतारमधून येते. याशिवाय, कतार भारताच्या एलपीजी गरजेच्या ३० टक्केपुरवठा करतो, तर कतार भारताकडून १.७० अब्ज डॉलर्सच्या वस्तू खरेदी करतो. त्याचवेळी भारत कतारकडून १२.३४ डॉलर्सच्या वस्तू खरेदी करतो. (वृत्तसंस्था)




## कुंभमेळ्यात हरवली आई

माझी मुले नालायक नाहीत. ते असहाय्य आहेत. त्यांना आता आपण कुठे आहोत हेही माहिती नाही आणि ते माझ्यावर एवढेही प्रेम करीत नाहीत की ते मला शोधतील. हे शब्द ८० वर्षांच्या रेखा द्विवेदी यांचे आहेत. रेखा गेल्या ३ दिवसांपासून कुंभमेळ्यात भटकत आहे. त्या आजारी असून ,त्यांना श्वास घेण्यास त्रास होत आहे. त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. पण त्यांच्या प्रकृतीबद्दल कोणालाही माहिती मिळाली नाही. त्यांना कोणीच नाही असे नाही. संपूर्ण कुटुंब आहे. रेखाला चार मुले आहेत. एक मुलगा अलाहाबाद उच्च न्यायालयात वरिष्ठ वकील आहे. दुसरा एका कॉलेजमध्ये व्याख्याता आहे. उर्वरित दोघेही आर्थिकदृष्ट्या चांगल्या स्थितीत आहेत. आम्ही सर्वांना बोलावले. दोन स्विच ऑफ आढळले. एकाने फोन घेतला नाही. चौथ्याने फोन उचलला आणि म्हणाला, आम्हाला काही फरक पडत नाही. नमस्कार.. ८० वर्षीय रेखा द्विवेदी यांना आता एकही दात उरलेला नाही. शरीर पाठीच्या कण्याजवळ वाकलेले आहे. ती १०० मीटर चालली, तर ती धापा टाकू लागते. १२ फेब्रुवारी रोजी ती महाकुंभ मेळ्याला आली आणि बेपत्ता झाली. इकडे तिकडे भटकत ती सेक्टर-९ ला पोहोचली.

### चार मुलांपैकी एकही घ्यायला आला नाही

आजूबाजूच्या लोकांनी तिला अस्वस्थ पाहून तिच्याबद्दल विचारले, तेव्हा त्यांना कळले की ,ती जत्रेत हरवली आहे. लोक त्यांना डिजिटल लॉस्ट ॲण्ड फाऊंड सेंटरमध्ये घेऊन गेले. ती तिथे दोन दिवस राहिली. लॉस्ट ॲण्ड फाऊंड सेंटरने रेखा आणि तिच्या कुटुंबाची सर्व माहिती गोळा केली. पण त्यांना न्यायला कोणीही आले नाही.




# बोटीने ५५० किमी महाकुंभ जलयात्रा

## सात जणांनी बनवली होडी; ८४ तास लागले

बिहार आणि उत्तरप्रदेशातील सात जणांनी मोटरबोटद्वारे ५५० किलोमीटर जलप्रवास करून महाकुंभात पोहोचले. संगमात स्नान केले आणि त्याच मार्गाने बिहारमधील त्यांच्या गावी परतले.

८ आणि ९ फेब्रुवारी रोजी प्रयागराजकडे जाणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. गाड्यांमधील जागा भरल्या होत्या. दोन दिवस प्रवास करूनही लोक महाकुंभात पोहोचू शकले नाहीत. प्रचंड वाहतूक कोंडीत भाविकांना त्यांच्या वाहनांमध्ये ५ ते ६ तास 'रोड अरेस्ट' ठेवण्यात आले. हे टाळण्यासाठी जलमार्गाने संगमला पोहोचण्याची योजना आखण्यात आली. मोटरबोटवर गॅस सिलेंडर आणि स्टोव्हसह खाण्यापिण्याची संपूर्ण व्यवस्था होती. दोन लोक होडी चालवायचे आणि उर्वरित पाच जण विश्रांती घ्यायचे. बक्सर ते प्रयागराज हा सुमारे ५५० किमीचा आणि ८४ तासांचा प्रवास पूर्णपणे अनोखा आणि रोमांचक होता.



हे सर्व जण व्यावसायिक नाविक आहेत आणि आपापल्या जिल्ह्यात होड्या चालवून कुटुंबाचे पालनपोषण करतात. त्यातील मुन्नू नामक नावाडी म्हणतो, ९ फेब्रुवारीच्या सुमारास मीडियामध्ये सतत जामच्या बातम्या येत होत्या. असे अनेक व्हिडीओ व्हायरल झाले होते, ज्यात मध्यप्रदेश ते प्रयागराजपर्यंत रस्ता जाम असल्याचे वृत्त होते. त्यावेळी आम्ही सर्व जण महाकुंभाला जाण्याचा विचार करीत होतो. अचानक माझ्या मनात एक विचार आला की ,प्रयागराजला बोटीने का पोहोचू नये?

आम्ही बोटीत दोन इंजिन बसवले, जेणेकरून एका इंजिनमध्ये समस्या आल्यास, बोट दुसऱ्या इंजिनसह चालू शकेल. बोटीतच ५ किलोचा गॅस सिलेंडर, स्टोव्ह, २० लिटर पेट्रोल, भाज्या, तांदूळ, पीठ,रजाई आणि गाद्या ठेवण्यात आल्या होत्या.

# महाकुंभात 'बैल वाचवा'चा नारा



रासायनिक शेतीमुळे उत्पादन निश्चितच वाढत आहे; परंतु जमीन आपली ताकद गमावत आहे. माझ्यासोबतही असेच काहीसे घडले, ३ वर्षे शेती केल्यानंतर मला ४० लाख रुपयांचे नुकसान झाले. मला वाटले की , या मातीत अजून काय उरले आहे... हे बोलून मी आत्महत्या करण्याचा विचार केला.

जयपूरहून महाकुंभाच्या सेक्टर-८ मध्ये आलेल्या शेतकरी राहुल शर्मा यांनी त्यांच्या जीवनातील अनुभव सांगताना हे शब्द उच्चारले. त्यांनी दिव्य मराठीकडे शेतकऱ्यांच्या स्थितीचे वर्णन केले. शेतकऱ्यांना त्रास होऊ नये म्हणून प्रयागराज येथून एक मोहीम सुरू करण्यात आली. ज्याला त्यांनी नाव दिले-बैल वाचवा मोहीम.

५० वर्षीय राहुल शर्मा लोकांना बैलांना वाचवण्यासाठी प्रेरित करीत आहेत. ते नैसर्गिक शेती आणि शेणखताचे फायदे देखील सांगत आहेत. मळणी, दळण आणि गाळणीच्या कामासाठी बैलांचा वापर कसा करता येईल याबद्दल ते लोकांमध्ये जागरूकता निर्माण करत आहेत.

**बैल वाचवा मोहीम म्हणजे काय?**

शेतकरी राहुल शर्मा म्हणाले, बैलांबद्दल बोलण्यापूर्वी आपल्याला गायींबद्दल बोलले पाहिजे. कारण ज्याप्रमाणे स्त्रीशिवाय पुरूष अपूर्ण आहे, त्याचप्रमाणे बैलाशिवाय गाय अपूर्ण आहे. देशात आढळणाऱ्या ६४ गायींच्या जातींपैकी आता फक्त ४० गायी शिल्लक आहेत. २४ जाती नामशेष झाल्या. याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे गायींची चिंता करणारे लोक बैलाबद्दल बोलत नाहीत. जर आपण शेतीच्या दृष्टिकोनातून गोठ्याची उपयुक्तता समजून घेतली, तर १००० गायींमध्ये २०० वासरेदेखील असतात. त्यांचे जतन आणि संवर्धन का केले जात नाही? शेतात बैलांची गरज समजून घेऊन त्यांनी जयपूरमध्ये बुल पॉवर क्लबची स्थापना केली, ज्यात शेतकरी, तरुण आणि निसर्गप्रेमींनी 'बुल पॉवर' बद्दल चर्चा केली आणि नैसर्गिक शेतीमध्ये शेतकऱ्यांना आरोग्य आणि संपत्तीचा अर्थ समजावून सांगितला.

## महाकुंभात महात्यागी नगरातील कल्पवास पूर्ण, संत निघाले

प्रयागराज महाकुंभात महात्यागी नगर बिकानेर खालसाच्या ४० दिवसांच्या कल्पवासाची पवित्र साधना पूर्ण झाली. कल्पवास पूर्ण झाल्यावर श्री राम झरोखा कैलास धाम बिकानेर येथील महामंडलेश्वर राष्ट्रीय युवा संत स्वामी सरयूदास महाराज यांच्या नेतृत्वाखाली सर्व भाविकांनी माता गंगा, माता यमुना आणि अदृश्य माता सरस्वती यांची प्रार्थना केली आणि त्यांचे आशीर्वाद घेतले.

महामंडलेश्वर स्वामी सरयूदास महाराज म्हणाले की, महाकुंभस्नानाच्या समाप्तीसह मी सर्वांच्या कल्याणासाठी आणि प्रगतीसाठी कामना करतो. सियारामजी महाराजांच्या आशीर्वादाने आणि महाराज श्री रामदासजी महात्यागी यांच्या उपस्थितीत महात्यागीनगरमध्ये गंगा पूजा, संगम स्नान आणि हनुमान ध्वज समारंभ संपन्न झाला. गेल्या ४० दिवसांचे अखंड कीर्तनही पूर्ण झाले. समारोप समारंभात महात्यागी नगर बिकानेर खालसा कुटुंबाने प्रयागराजच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे, पोलिस प्रशासनाचे आणि उत्तरप्रदेश सरकारचे आभार मानले.

## चित्रपट वार्ता

### एल्विश यादववर गुन्हा दाखल

**मुंबई** : युट्यूबर एल्विश यादववर 'बिग बॉस'मधील स्पर्धक चुम दरांग हिच्यावर केलेल्या आक्षेपार्ह टिप्पणी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



एल्विशचे तसे वादाशी जुनेच नाते आहे. त्याने रजत दलालसोबत पॉडकास्टमध्ये 'बिग बॉस'मधील स्पर्धकांना बोलावले होते. त्यात त्याने म्हटले की, करणवीरला नक्कीच कोरोना झाला असावा, नाही तर चुम कोणाला आवडू शकते? तिच्या नावातही अश्लीलता आहे आणि तिने 'गंगुबाई काठियावाडी'मध्ये काम केले आहे, अशा शब्दांत एल्विशने चुमविषयी टिप्पणी केल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

# आरसीएफ जवान, शोरूमच्या मॅनेजरकडून मराठीची अहवेलना

## उल्हासनगर, मुंबईतील घटना

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१६ फेब्रुवारी -**

महाराष्ट्रात मराठी बोलणे गरजेचे असताना अमराठी अधिकारी, व्यक्तिकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या या भाषेची अवहेलना, गळचेपी करण्याचे प्रकार सातत्याने सुरूच आहेत.मराठीत बोलणाऱ्या युवकाला गुजराती किंवा हिंदीमध्ये बोलण्याची सक्ती करण्याचा प्रकार उल्हासनगर व मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट परिसरात घडला आहे. त्याबाबत व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी संबंधितांना जाब विचारला. त्यानंतर त्यांनी माफी मागितली.

उल्हासनगरात रेल्वे सुरक्षा दलाचा जवान एका मराठी युवकाला अटकताना हिंदीत बोल मला मराठी समजत नाही माझ्याबद्दल कोणाकडे काय तक्रार करायचे आहे ती खुशाल कर ,असा दम दिला. त्याबाबतचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी त्यांना विचारल्यानंतर त्याने दिलगिरी व्यक्त केली. तर मुंबईतील क्रोफर्ड मार्केटमधील रुपम शोरूमच्या मॅनेजरने एका मराठी तरुणाला गुजराती किंवा हिंदीमध्ये बोलण्याची जबरदस्ती केली. तसेच मी मराठीत बोलणार नाही, असा दम दिला. या प्रकरणानंतर संबंधित तरुणाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडे तक्रार केली. त्यांनी पदाधिकाऱ्यांनी शोरुम गाठत मॅनेजरला धडा शिकवला. त्याला मराठीतून माफी मागायला लावली. या प्रकरणाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यापूर्वी कल्याणमध्ये डिसेंबर महिन्यात मराठी-अमराठी वाद झाला होता. योगीधाम परिसरातील अजमेरा हाईट्स या उच्चभ्रू सोसायटीत अखिलेश शुक्ला याने मराठी माणसांचा अपमान करणारे शब्द वापरले होते. त्यानंतर धीरज देशमुख यांच्यावर जीवघेणा हल्ला केला होता. तसेच एका अमराठी महिलेने 'तुम्ही मराठी लोक भिकारडे आहात. चिकन मटन खावून घाण करणारे आहात,' अशी शेरेबाजी केली होती. त्या प्रकरणानंतर डोंबिवलीत एका ८२ वर्षांच्या मराठी व्यक्तिला हिंदीत बोलण्यास भाग पाडण्यात आले होते. मुंबईतील महापेक्स प्रदर्शनात हा प्रकार घडला होता.

## अग्रलेख...

# अर्थसंकल्पोत्तर अर्थचित्र

संपूर्ण देशाचे आर्थिक गणित, आवक-जावक आणि अर्थभार सादर करणारा केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर होऊन काही दिवस उलटले असले, तरी त्याचे कवित्व आणखी काही दिवस सुरू राहील. याचे कारण केंद्रीय अर्थमंत्र्यांनी जाहीर केलेल्या आकड्यांचे, विविध योजनांसाठी देऊ केलेल्या रकमेचे त्या त्या क्षेत्रावर नेमके कसे आणि कोणते परिणाम दिसतील, याचे अवलोकन नंतरच्या दिवसांमध्येच होते. तज्ज्ञ आपल्या चिकित्सक नजरेने त्याचे अर्थ लावून निष्कर्ष नोंदवतात आणि खरे अर्थचित्र सर्वसामान्य जनतेसमोर मांडतात. त्यातून आर्थिक तरतुदींचे नेमके स्वरूप समोर येते. अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सादर केलेल्या २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात भारताच्या उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी अनेक तरतुदी असल्याचे एव्हाना स्पष्टपणे समोर आले आहे. हे उपाय येत्या काळात औद्योगिक क्षमता वाढविण्यासाठी, गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी पूरक ठरणार असून भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनविण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहेत. नवोपक्रमाला चालना देण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात काही विशेष तरतुदींचा समावेश आहे. त्यातील एक म्हणजे संशोधन आणि विकास अनुदान. यांअंतर्गत उदयोन्मुख संशोधन उपक्रमांना समर्थन देण्यासाठी निधीची स्थापना करण्यात आल्याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळेच येत्या काळात असे उपक्रम गतिमान झालेले दिसू शकतात. दुसरे म्हणजे शैक्षणिक संस्थांशी सहकार्यांतर्गत नवोपक्रमांना चालना देण्यासाठी आणि अत्याधुनिक उत्पादन उपाय विकसित करण्यासाठी उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील भागीदारीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. खेरीज, राबविले जाणारे निर्यात प्रोत्साहन उपाय भारतीय उत्पादकांची जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी उपयुक्त सिद्ध होणार आहे. त्यामुळेच अर्थसंकल्पात समाविष्ट असणारा हा भागही विशेष महत्त्वाचा म्हणायला हवा. व्यापार सुविधेचा मुद्दाही लक्षणीय म्हणावा लागेल. कारण व्यवहार खर्च आणि वेळ कमी करण्यासाठी निर्यात प्रक्रियांचे सरलीकरण झाल्यास भारतीय उत्पादने जागतिक बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक बनतील. शिवाय, डिजिटलायझेशन आणि ऑटोमेशनला समर्थन देण्याच्या उद्देशाने तसेच आधुनिक उत्पादनात तंत्रज्ञानाचे महत्त्व ओळखून ताज्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेले मुद्देही महत्त्वाचे आहेत. जसे की, उत्पादन प्रक्रियेत कार्यक्षमता आणि उत्पादकता सुधारण्यासाठी ऑटोमेशन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्याची भूमिका येत्या काळात वेगळे चित्र समोर आणू शकते. त्याचप्रमाणे स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि इंडस्ट्री ४.० उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्याची मनीषा लक्षणीय ठरू शकते. अर्थसंकल्पात सरकारने काही उत्पादनांना विशेष प्रोत्साहन देणाऱ्या (पीएलआय) योजनांचा विस्तार केला आहे. उदाहरणार्थ, मागील पीएलआय योजनांच्या यशावर आधारित यंदाही कापड, पादत्राणे आणि शाश्वत वस्तू यासारख्या अतिरिक्त क्षेत्रांच्या विस्ताराची घोषणा झालीच आहे. या निर्णयामुळे स्वाभाविकच या उद्योगांमध्ये गुंतवणूक तसेच उत्पादन क्षमता वाढेल. परिणामी आपण भारताची निर्यात स्पर्धात्मकता वाढण्याची अपेक्षा बाळगू शकतो. उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात परिवर्तनात्मक कर सुधारणा सादर केल्या गेल्या. लवकरच त्याचे परिणाम दिसू लागतील. त्यामुळेच नवीन उद्योगांच्या स्थापनेला प्रोत्साहन देण्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या उत्पादन युनिट्ससाठी सवलतीचा १५ टक्के हा कर दर पुन्हा सुरू करणे; उत्पादन क्षेत्रातील नवोपक्रमांना उत्तेजन देण्यासाठी संशोधन आणि विकास उपक्रमांवर केंद्रित कर प्रोत्साहन यासारखी धोरणे भारताला जागतिक उत्पादन नवोपक्रम केंद्र म्हणून स्थान देणारी ठरतील. घरगुती वापर वाढविण्यासाठी आणि स्थानिक उत्पादकांना पाठिंबा देण्यासाठी ग्राहकोपयोगी वस्तूंवरील जीएसटी दरांमध्ये कपात करण्याचा प्रयत्नही अनुकूल परिणाम दाखवून जाईल. उत्पादनात पायाभूत सुविधांची महत्त्वाची भूमिका ओळखून केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली आहे. याचाही येत्या काळात सकारात्मक प्रभाव पडताना दिसेल. जसे की, लॉजिस्टिक्स आणि वाहतूक सुकर, वेगवान करण्यासाठी समर्पित फ्रेट कॉरिडॉरचा विकास आणि लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी आणि पुरवठा साखळी सुधारण्यासाठी प्रादेशिक हवाई कनेक्टिव्हिटी वाढविली जाणार असल्याने या क्षेत्राची कार्यक्षमता वाढल्याचे चित्र समोर येऊ शकते. तसेच देशांतर्गत आणि परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज नवीन औद्योगिक कॉरिडॉरची स्थापना करणार असल्याचे जाहीर झाल्यामुळे विकासाचा नवा वेग बघायला मिळू शकतो. अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना पाठिंबा देणाऱ्या योजना जाहीर केल्या. हे सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योग भारताच्या उत्पादन क्षेत्राचा कणा म्हणता येतील. तेव्हा या उद्योगांना पाठिंबा देण्यासाठी अर्थसंकल्पात सादर केलेल्या उपाययोजना जाणीवपूर्वक नोंद घेण्याजोग्या आहेत. त्यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांनी प्रक्रियेचे सरलीकरण करणार असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार एमएसएमईसाठी नियामक भार कमी झाला आणि अनुपालन प्रक्रिया सुलभ झाली तर व्यवसाय करणे सोपे होईल. त्याचप्रमाणे एमएसएमईएस क्षेत्राला उत्पादन प्रक्रिया सक्षम करण्यासाठी आणि वाढविण्यासाठी, खेरीज जागतिक मूल्य साखळीत समाकलित होण्यास मदत करण्यासाठी कमी व्याजदराने कर्जे आणि वाढीव निधी संधींची केलेली तरतूदही बळ देणारी ठरू शकते. जागतिक पर्यावरणीय वचनबद्धतेनुसार यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारने शाश्वत उत्पादनावर भर दिल्याचे स्पष्ट दिसून येते. त्याचाच एक भाग म्हणजे जाहीर झालेले हरित अनुदान. या अंतर्गत उद्योगांना पर्यावरणपूरक पद्धती आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्याच्या हेतूने हरित अनुदाने आणि कर सवलतींचा परिचय करून देण्यात आला आहे. शिवाय, २०७० पर्यंत कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी आणि निव्वळ शून्य उत्सर्जन साध्य करण्याच्या उद्देशाने प्रकल्पांना समर्थन देण्यासाठी कमी व्याजदराचे कर्जही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ढासळत्या पर्यावरणाच्या पृष्ठभूमीवर सरकारचा हा पुढाकारही महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. या सगळ्याच्या बरोबरीने केंद्रीय अर्थमंत्र्यांनी उत्पादन क्षेत्रात अधिकाधिक परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अर्थसंकल्पात काही बाबी प्रस्तावित केल्या आहेत. त्यात विमासारख्या क्षेत्रात परकीय गुंतवणुकीची अर्थात एफडीआयची मर्यादा १०० टक्क्यांपर्यंत वाढविणे, बाजारपेठेत प्रवेश वाढविणे आणि आंतरराष्ट्रीय कौशल्य आणणे याचा समावेश होतो. त्याचप्रमाणे गुंतवणूक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी भारतात उत्पादन युनिट स्थापन करू पाहणाऱ्या परदेशी गुंतवणूकदारांना मंजुरी प्रक्रिया आता सुलभ झाली आहे. स्वाभाविकच येत्या काळात त्याचे सकारात्मक परिणाम बघायला मिळतील. सरकारने नेहमीच कौशल्य विकासावर भर दिला आहे. गेल्या काही वर्षांचा आढावा घेता यासाठी भरीव निधी दिल्याचे स्पष्ट होते. यातून सरकारचा मोठी रोजगार निर्मिती करण्याचा मानस आहे. हाच धागा पकडून यंदाही सरकारने कुशल कामगारांच्या गरजेनुसार अर्थसंकल्पात काही गोष्टींसाठी संसाधने वाढविणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यात व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमाचा समावेश होतो. अशा प्रकारे रोजगार क्षमता वाढविण्यासाठी उत्पादन क्षेत्राच्या गरजांनुसार कौशल्य विकास कार्यक्रमांचा विस्तार झाला तर अधिक लोक या योजनेमध्ये सामावले जातील आणि रोजगारवाढीला चालना मिळालेली दिसेल. गरजेनुसार कंपन्यांना अप्रेंटिसशिप कार्यक्रम ऑफर करण्यास प्रोत्साहन दिले गेल्यास नोकरीच्या नवनवीन संधी निर्माण होतील आणि यातून पुढे येणारा कुशल कामगारांचा समूह अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकेल. एकंदर अर्थसंकल्पामध्ये दिसणारी संशोधन आणि विकासाला समर्थन देण्याची, शैक्षणिक संस्थांबरोबर सहकार्य करून नवोपक्रमांना चालना देण्याची, निर्यातीला प्रोत्साहन देण्याची, व्यापार सुविधा वाढविण्याची केंद्र सरकारची भूमिका देशाचे अर्थचित्र सुंदर रंगात रंगवू शकेल, अशी आशा करायला हरकत नाही.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# आप पंजाबही गमावणार!

राजधानी दिल्लीची सत्ता गमावल्यानंतर आम आदमी पक्ष पंजाबमधील पुढील निवडणुकीत राज्याची सत्ता गमावणार आहे. दिल्लीत आम आदमी पक्षाने काही क्षेत्रांत म्हणजे शिक्षण, आरोग्य यावर काही काम तरी केले होते, पंजाबमध्ये मात्र साराच दुष्काळ आहे. आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल हे स्वतः सनदी अधिकारी असल्याने सरकारचे कामकाज कसे चालते, याचा त्यांना पुरेपूर अनुभव होता. त्याचा फायदा त्यांनी दिल्लीत करून घेतला. पण दिल्ली सरकारच्या अपुऱ्या अधिकारांमुळे त्यांना फार कामगिरी करता आली नाही, असे त्यांच्या समर्थकांना वाटते. पंजाबमधील स्थिती वेगळी आहे.

**मद्यपी मुख्यमंत्री** : दिल्लीत आम आदमी पक्षाची वाताहत दिल्ली सरकारच्या मद्य धोरणामुळे झाली, असे मानले जाते तर पंजाबमध्ये आम आदमी पक्षाची वाताहत मद्यपी मुख्यमंत्र्यामुळे होणार आहे. आम आदमी पक्षात तरी हे बोलले जाते. मुख्यमंत्री भगवंत मान यांनी सत्तेवर येताच पहिले काम केले ते स्वतःचा दुसरा विवाह करण्याचे. मग त्यांनी एका अपत्यास जन्म दिला आणि मग आपल्या नव्या पत्नीस कडेकोट सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला. भगवंत मान आपल्या सरकारकडे-पक्षाकडे लक्ष देण्याऐवजी नव्या संसारातच रममाण झाले आणि आपला याचा पहिला फटका बसला तो लोकसभा निवडणुकीत.

**पहिला फटका** : विधानसभा निवडणुकीत राज्यात विक्रमी बहुमत मिळविणाऱ्या आम आदमी पक्षाला लोकसभा निवडणुकीत १३ पैकी फक्त ४ जागा जिंकता आल्या तर विधानसभा निवडणुकीत सफाया झालेल्या काँग्रेसने ७ जागा जिंकून राज्यात पुनरागमन केले. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला चांगले यश मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अर्थात राज्य विधानसभा निवडणुकीस अद्याप वेळ असल्याने त्याबाबत आताच अंदाज वर्तविणे योग्य ठरणार नाही.

**केजरीवाल राज्यसभेत?** : आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल हे स्वतः नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून पराभूत झाले आहेत. त्यांना विजय मिळाला असता तर त्यांना किमान विधानसभेत विरोधी पक्षनेता तरी होता आले असते. आपजवळ विरोधी नेता होण्यासाठी आवश्यक असलेले संख्याबळ असले तरी केजरीवाल यांना ती संधी मिळणार नाही. बहुधा ते मावळत्या मुख्यमंत्री आतिशी सिंग यांना विरोधी पक्ष नेत्या करतील, असे मानले जाते. मग स्वतः केजरीवाल काय करतील?

**महत्त्व संपले** : दिल्लीतील निकालांनी राष्ट्रीय राजकारणातील केजरीवाल यांचे महत्त्व संपुष्टात आले. दोन राज्यांत सरकार असणारा आप हा एकमेव प्रादेशिक पक्ष होता. आता केजरीवाल यांना राष्ट्रीय राजकारणात आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर त्यांना राज्यसभेत जाण्याशिवाय पर्याय नाही, असे मानले जाते. दिल्लीतून ते राज्यसभेवर जाऊ शकत नाहीत यासाठी त्यांना पंजाबचा रस्ता निवडावा लागेल. पंजाबमधील राज्यसभा निवडणुकीची प्रतीक्षा करणे वा मग आपच्या एखाद्या खासदारास राजीनामा देण्यास सांगून राज्यसभेवर निवडून जाणे अशा पर्यायावर ते विचार करू शकतात. राष्ट्रीय राजकारणात आपले अस्तित्व टिकविणे, पंजाब, दिल्ली या दोन्ही ठिकाणी आपची संघटना बळकट करणे, हेही त्यांच्यासमोरील एक मोठे आव्हान राहणार आहे. केजरीवाल हे हुकूमशाही शैलीत काम करणारे नेते आहेत. सत्ता असताना त्यांनी आपल्या काही प्रमुख नेत्यांना बाजूला सारले तरी त्यांच्या कार्यशैलीच्या विरोधात कुणीही आवाज उठविला नाही. कारण केजरीवाल यांच्याजवळ सत्ता होती. एक राष्ट्रीय वलय होते. आता ती स्थिती राहिलेली नाही. केवळ दिल्लीतील सत्ताच गेली असे नाही तर केजरीवाल व मनीष सिसोदिया हे दोघेही पराभूत झाले आहेत. आता अगदी विपरीत स्थितीत त्यांना काम करावे लागणार आहे. असलेला पक्ष शाबूत ठेवण्याचे आव्हान त्यांना हाताळावयाचे आहे. दिल्लीत केजरीवाल यांच्याजवळ आज २२ आमदार असले, तरी प्रत्यक्षात किती आमदार त्यांच्यासोबत राहतील, हा एक लाखमोलाचा प्रश्न राहणार आहे. एकदा का आमदारांनी पक्ष सोडणे सुरू केले तर मग कार्यकर्ते किती काळ या पक्षाला धरून राहतील, हा नंतरचा प्रश्न त्यांना भेडसावणार आहे.



**अनेक नेते कुंपणावर** : दिल्ली निकालानंतर आपचे अनेक नेते कुंपणावर आहेत. यात राघव चड्डांसारखे काही राज्यसभा खासदारही आहेत. राघव चड्डा तर कधी तळ्यात तर कधी मळ्यात याप्रमाणे कधी नवी दिल्लीत तर कधी लंडनमध्ये असतात. सर्वप्रथम तेच आप सोडण्याची शक्यता वर्तविली जाते. येणाऱ्या काळात केजरीवाल यांच्या कायदेशीर अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. त्या अडचणी सांभाळीत वरिष्ठ नेत्यांना सांभाळणे हे अवघड काम केजरीवाल यांना करावयाचे आहे आणि त्यांनी पंजाब गमावल्यास त्यांना आपला पक्ष सावरणे जवळपास अशक्य होऊन बसेल, असे मानले जाते.

**चळवळीचे भवितव्य** : आम आदमी पक्ष हा काही राजकीय पक्ष नाही. एक आंदोलन व चळवळ म्हणून आपचा जन्म झाला. भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा देत आप अस्तित्वात आला आणि आता त्याच भ्रष्टाचारात बदनाम झाला. कधी काळी साधी राहणी ही आपची शिकवण होती. आता या पक्षालाही पंचतारांकित संस्कृतीने ग्रासले असल्याचे दिसते. प्रवचन आणि आचरण यातील हे अंतर आपला महागात पडले. ही सारी आव्हाने केजरीवाल कशी हाताळतात, यावर त्यांचे व त्यांच्या पक्षाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

**संघर्ष अटळ** : दिल्लीत आम आदमी पक्षाचा पराभव मुख्यपणे काँग्रेसमुळे झाल्याचे मानले जाते. दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची दोन टक्के मते वाढली आणि ही वाढलेली मतेच आपच्या पराभवास कारणीभूत ठरली असे आता दिसते. कारण आपची व्होट बँक हीच मुळी काँग्रेसची होती. काँगेसची व्होट बँक मोठ्या प्रमाणावर आपकडे गेली. काँग्रेस कमजोर झाली व आपचा जन्म झाला. काँग्रेसची ही व्होट बँक पुन्हा काँग्रेसकडे सरकल्याने आपच्या पायाखालील माती सरकली आणि दिल्लीत आप धराशायी झाली.

**पंजाबमध्ये पुनरावृत्ती** : पंजाबमध्ये हीच स्थिती राहणार आहे. पंजाबमध्ये आप नावाचा पक्षच नव्हता. राज्यात आम आदमी पक्षाने सत्ता मिळविली ती काँग्रेसची व्होट बँक आपल्याकडे खेचीत. विधानसभेनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने आपली व्होट बँक बऱ्याच प्रमाणात परत मिळविली. याचाच परिणाम म्हणजे काँग्रेसने लोकसभेच्या सात जागा जिंकल्या. असेच विधानसभा निवडणुकीत घडणार आहे. राज्यात काँग्रेसचा विजय म्हणजे आम आदमी पक्षाचा पराजय हे समीकरण ठरलेले आहे. केजरीवाल यांना बहुधा पंजाबमध्ये आपचे राजकीय भवितव्य स्पष्ट दिसत असावे. त्यांच्यासाठी आता दिल्लीपेक्षा मोठी काळजी पंजाब असावी.

**मर्यादित पर्याय** : केजरीवाल यांच्या मनात तर पंजाबचा मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न होते. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यास कोणतेही अधिकार नव्हते. त्या तुलनेत पंजाबचा मुख्यमंत्री शक्तिशाली मानला जातो. पण, काही कारणांमुळे केजरीवाल पंजाबचे मुख्यमंत्री होऊ शकले नाहीत. आता भगवंत मान यांना हटवून स्वतः मुख्यमंत्री होणे केजरीवाल यांना जड जाईल. आता त्यांना ते करता येणार नाही. अशा स्थितीत केजरीवाल यांच्यासमोर पंजाबमधून राज्यसभेवर निवडून जाणे व दिल्लीच्या आणि देशाच्या राजकारणात सक्रिय राहणे हाच एक पर्याय शिल्लक राहणार आहे. हॅट्ट्रिक करण्याच्या प्रयत्नात असलेल्या गोलंदाजाचा तिसरा चेंडू थेट मैदानाबाहेर मारला जावा, अशी स्थिती केजरीवाल यांची झाली आहे. ते सध्या तरी दिल्लीच्या मैदानाबाहेर फेकले गेले आहेत.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# आधुनिक भारताचे संरक्षण सामर्थ्य

'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून शस्त्रास्त्र निर्मितीत भारतीय तंत्रज्ञानाचा डंका वाजत आहे. अमेरिका, रशिया आणि चीनच्या तुलनेत भारत पिछाडीवर असला, तरी भारतीय तंत्रज्ञानाकडे जगाचा कल वाढत आहे. युक्रेनशी युद्ध सुरू असल्याने रशियावर अवलंबून असलेला आर्मेनिया भारताच्या आश्रयाला आला आणि अझरबैझानला भारतीय अस्त्रांच्या जोरावर गुडघे टेकण्यास भाग पाडले. आजपर्यंत भारत शस्त्रास्त्रांसाठी इतरांवर अवलंबून होता. परंतु, भाजपा सरकारने या क्षेत्रातही भारताला आत्मनिर्भर करण्याचा संकल्प केला आणि भारतीय संरक्षण प्रणालीने कात टाकली. भविष्यात युद्ध केवळ आकाश, जमीन अथवा समुद्रातच नाही, तर अवकाशातसुद्धा लढले जाणार आहे. त्यामुळे भारताने स्वतःच्या ताकदीवर परिणामकारक प्रणाली विकसित करून संपूर्ण जगाला आश्चर्याचा धक्का दिला. यंदा सरकारने संरक्षण क्षेत्रासाठी ६.८१ लाख कोटींची तरतूद केली. अमेरिका, चीन आणि रशियाच्या तुलनेत भारताचे बजेट कमी असले, तरी कमी खर्चात उच्च दर्जाची संरक्षण क्षमता विकसित करण्यात भारताचा हातखंडा आहे.

रशिया हा भारताचा मित्र देश आहे. त्यामुळेच अमेरिकेचा दबाव झुगारून भारताने रशियाकडून सर्वाधिक कच्चे तेल खरेदी केले. रशियाने भारताची सदैव पाठराखण केली आहे. चीनचे तगडे आव्हान निर्माण झाल्यानेच अमेरिकेने अलिकडे भारताशी जवळीक साधली आहे. कधीकाळी नरेंद्र मोदी यांना व्हिसा नाकारणारा अमेरिका आज त्यांचे गोडवे गात आहे! आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा शत्रू अथवा मित्र नसतो, हे खरे असले तरी भारत मैत्रीभाव जपणारा देश आहे. पाकिस्तानशी झालेल्या युद्धावेळी बहुतांश जग जेव्हा भारताच्या विरोधात होते तेव्हा रशिया आणि इस्रायल हे दोनच देश भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले होते. राफेल ही लढाऊ विमाने भारताने फ्रान्सकडून खरेदी केलीत. परंतु, हे तंत्रज्ञान देण्यास फ्रान्स तयार नसल्याने भारताने स्वबळावर तेजस या जगातील सर्वाधिक हलक्या लढाऊ विमानाची निर्मिती करून इतिहास रचला.

२००९ ते २०१३ या चार वर्षांच्या काळात भारतातील तब्बल ११ शास्त्रज्ञांचा संशयास्पद मृत्यू झाला. यातील बहुतांश मृत्यूमागील कारणांचा उलगडा झालेला नाही. ऊर्जा क्षेत्रात भारताला स्वयंपूर्ण करण्याच्या प्रकल्पावर हे शास्त्रज्ञ काम करीत होते. हा एक गोपनीय प्रकल्प असताना इतक्या शास्त्रज्ञांचा मृत्यू कसा काय होऊ शकतो, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडणे स्वाभाविक आहे. भारत आणि रशियाने मिळून तयार केलेल्या ब्रह्मोस या क्षेपणास्त्राचा वापर अद्याप रशियाने युक्रेन युद्धात केलेला नाही. यावरून या क्षेपणास्त्राची मारक क्षमता ध्यानात घ्यावी. अणुबॉम्बमुळे रासायनिक अस्त्रांची गरज संपुष्टात आल्याने भारताने १९९२ मध्ये रासायनिक शस्त्रास्त्र करारावर स्वाक्षरी केली. भारताकडे सध्या २०० च्या जवळपास अणुबॉम्ब असल्याचे सांगण्यात येते. जगात सर्वाधिक अणुबॉम्बचा साठा रशियाकडे आहे. आधुनिक अणुबॉम्बची क्षमता जपानवर टाकलेल्या अणुबॉम्बच्या तुलनेत हजारोपट आहे. त्यामुळे कोणताही देश अणुबॉम्बचा वापर करण्याची शक्यता वाटत नाही. परंतु, कारगिल युद्धात पाकिस्तानने भारतावर अणुहल्ला करण्याची तयारी केली होती. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना अमेरिकन राष्ट्रपतींनी पाकिस्तान भारतावर अणुहल्ला करणार असल्याची माहिती फोनवरून दिली. अटलजी डगमगले नाहीत आणि 'पाकिस्तानने अणुहल्ला केलाच तर भारताचा एखादा भाग नष्ट होईल. परंतु, भारताच्या प्रत्युत्तरात पाकिस्तान उद्याचा सूर्य पाहू शकणार नाही, इतकी हमी मी आपणास देतो!' अशी गर्जना अटलजींनी केली आणि मग पाकिस्तानने मैदान सोडून पळ काढला. रशिया-युक्रेन युद्धात छोटे छोटे आत्मघाती ड्रोन्स खूपच प्रभावी ठरले आहेत. असे आत्मघाती ड्रोन्स निकामी करणारी यंत्रणा भारताने झटपट विकसित करून संपूर्ण जगात खळबळ उडवून दिली आहे. सध्या हे तंत्राज्ञान फक्त भारताकडे उपलब्ध आहे. ज्या छोट्या देशांना पुढारलेले देश शस्त्रास्त्र पुरविण्यास तयार नाही, असे सर्व देश आज भारताकडे आशेने पाहात आहे. भारतानेही अशा देशांना शस्त्रसज्ज करण्यास पुढाकार घेतला आहे. भारत हा जगातील सर्वाधिक शस्त्रास्त्र खरेदी करणारा देश आहे. परंतु, मेक इन इंडियाच्या माध्यमातून हे अवलंबित्व आता जवळपास १५ टक्क्यांनी कमी झाले आहे. भविष्यात शस्त्रास्त्र निर्मिती आणि निर्यातीत भारत एक प्रमुख देश म्हणून पुढे येऊ शकतो आणि त्या दिशेने युद्धपातळीवर काम सुरू आहे. भारताची शस्त्रास्त्र निर्मिती स्वसंरक्षणासाठी आहे आणि या क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध करणे, हीच देशाच्या संरक्षणाची हमी आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# कसे कुणाचे सांगा चुकले?

तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज शिरीष महाराज मोरे यांचे जाणे अतिशय धक्कादायक आणि वेदनादायक होते. त्यांचे निधन झाले ही बातमी जेवढी धक्कादायक आणि वेदनादायक होती, त्याहीपेक्षा शेकडोपटीने वेदना त्यांच्या आत्महत्येने झाल्या. काही वर्षांपूर्वी भय्यूजी महाराजांनी आत्महत्या करून हे जग सोडण्याचा निर्णय घेतला, त्याही वेळेला अशाच वेदना झाल्या होत्या. अशा मोठ्या, जाणत्या, समजूतदार लोकांना आत्महत्येचा मार्ग पत्करावा लागतो, हे दुर्दैवच म्हणावे लागेल. सामान्य रोगाने झालेले निधन वा मृत्यू हा अनेक प्रश्नांचे उत्तर देऊन जातो, परंतु आत्महत्यांनी ओढवलेला मृत्यू हा अनेक प्रश्न निर्माण करून जातो.

शिरीष महाराजांचे वय अवघे ३० वर्षे होते. नुकतेच त्यांचे लग्न जमलेले होते. तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज हा बहुमान त्यांना मिळालेला होता. शिवशंभू विचार मंचाचे ते पश्चिम महाराष्ट्राचे संयोजक होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी शेकडो भाषणे केलेली होती. 'शिवराज्याभिषेक' हे त्यांचे अलिकडेच प्रकाशित झालेले पुस्तक. प्रत्येकाला हवाहवासा वाटणारा त्यांचा सहवास होता. महाराष्ट्रामध्ये चालणारे ब्रिगेडी राजकारण, त्यातून संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्यामध्ये निर्माण केलेली जातीयवादी दरी या सर्व पृष्ठभूमीवर शिरीष महाराज हे अशा कुठल्याही विषयावर बोलायला अधिकारी पुरुष होते.

एखाद्या समाजामध्ये एखादा हिंदुत्ववादी कार्यकर्ता तयार होणे ही एक मोठीच उपलब्ध असते. असे व्हायला अनेक वर्षे आणि अनेकांचे परिश्रम लागतात. शिरीष महाराजांसारखा एक समजूतदार कार्यकर्ता या निमित्ताने हिंदुत्ववादी चळवळीला मिळालेला होता. त्याचबरोबर त्याला जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा वारसाही होता. ११ वे वंशज असण्याचा बहुमानही होता. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राकरिता व जातीयवादी शक्तींच्या विरोधात हिंदुत्ववादी चळवळीला गवसलेला हा एक हिराच होता. त्यांच्या हातून देश-धर्म-संस्कृतीची अजून खूप मोठी सेवा होणे बाकी होते. त्यांनी घेतलेला आत्मघातकी निर्णय हा सर्वांसाठीच नुकसानदायक झाला.

आत्महत्येच्या मार्गाला आपल्या शास्त्र पुराणात योग्य मानलेले नाही. 'ठेविले अनंते तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधान।' एखाद्याची परिस्थिती गरिबीची असेल किंवा श्रीमंतीची असेल, तो रोगाने ग्रस्त असेल किंवा परिस्थितीने ग्रस्त असेल, तरी या जन्मातील सर्व कष्ट, दुःख याच जन्मात भोगून संपविली पाहिजेत. प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांना १४ वर्षांचा वनवास भोगावा लागला. पांडवांना राज्याचे उत्तराधिकारी असताना वनामध्ये जावे लागले. द्रौपदीसारख्या मानी स्त्रीला वस्त्रहरणासारखा अपमान सहन करावा लागला. हे सर्व प्रसंग नैराश्याने भरलेलेच होते. द्रौपदी आत्महत्येचा विचार करू शकली असती, इतका तिचा अपमान झाला होता. परंतु तिने आपल्या अपमानाचे स्मरण ठेवण्यासाठी आपले केस मोकळे ठेवले. पांडवांना अपमानाचा प्रतिशोध घेण्याची प्रेरणा दिली. एका स्त्रीच्या वस्त्रांना हात घालणारे कौरवांचे हात तिने निष्प्राण केले.

महाराणा प्रताप हळदी घाटीचे युद्ध हरला, त्याचे सैन्य मारले गेले. अकबराच्या सैन्यांनी त्याच्या प्रमुख किल्ल्यांवर ताबा मिळविलेला होता. सैन्य जमवायला व चालवायलाही पैसा उरलेला नव्हता. अशा परिस्थितीमध्ये त्याला त्याच्या परिवाराला घेऊन अरावली पर्वताच्या जंगलांचा आश्रय घ्यावा लागला. सैन्य नाही, राज्य नाही, राहायला घर नाही. याच्यापेक्षा वाईट परिस्थिती कुठल्याही राजावर का यावी? अशा परिस्थितीत महाराणा प्रतापांनी अरावली पर्वताच्या जंगलांमध्ये राहणाऱ्या भिल्लांना एकत्र केलं. त्यांचे सैन्य उभे केले व पुन्हा एकदा अकबराशी लढाई मांडली. पुरंदरच्या तहानंतर शिवाजी महाराजांना आपले अनेक किल्ले औरंगजेबाला द्यावे लागले. संभाजी राजांना त्याची मनसबदारी स्वीकारावी लागली. परिस्थिती प्रतिकूल होती. सेनापती नेताजी पालकर औरंगजेबाला जाऊन मिळालेला होता. अनेक नात्यागोत्यातले मराठे कोणी आदिलशहाकडे होते तर कोणी औरंगजेबाकडे होते. अशाही परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी हार मानली नाही व त्यांनी आपला स्वातंत्र्याचा यज्ञ सुरूच ठेवला. त्यातूनच पुढे मराठ्यांचे साम्राज्य उभे झाले. आजही छत्रपती शिवाजी महाराज आमच्यासमोर प्रेरणापुरुष आहेत.

शिरीष महाराजांच्या आत्महत्येमागे कदाचित काही कारणे असतीलही. त्यातील एक कारण त्यांनी चिठ्ठीमध्ये लिहिलेले आहे. ते म्हणजे त्यांच्यावर असलेलं कर्ज. वास्तविक पाहता कर्जबाजारी कोण नाही? आमचा देशसुद्धा कर्जबाजारी आहे. जगाचा दादा म्हणणारा अमेरिका कर्जबाजारी आहे. भारतामध्ये जन्माला येणाऱ्या प्रत्येक बाळावर काही हजार रुपयांचे कर्ज आहे. मला काही तरुण माहीत आहेत, ज्यांनी काही काम करण्याचा प्रयत्न केला, त्यात ते अपयशी ठरले आणि त्यांच्यावर एक कोटी रुपयांपेक्षा अधिकचे कर्ज झाले. वास्तविक पाहता या सर्व तरुणांनी आत्महत्या करायला हवी होती. परंतु जेव्हा जेव्हा त्यांच्याशी संवाद होतो त्या प्रत्येक वेळेस मी त्यांना म्हणतो, मार्ग निघेल. हे दिवस संपतील आणि कर्जही संपेल. आज-काल सर्वत्र संवादहीनता निर्माण झालेली आहे. घरामध्ये, समाजामध्ये, सामाजिक संस्थांमध्ये ती दिसून येते. शिरीष महाराजांसारखा इतका लाखमोलाचा कार्यकर्ता त्याला जर काही वेदना होत्या, त्याला जर कशाची चिंता होती तर ही चिंता वरिष्ठ लोकांनी ओळखायला पाहिजे होती. पूर्वीच्या काळी ज्येष्ठ लोक काम करणाऱ्या कार्यकर्त्याचा संपूर्ण विचार करायचे. त्याच्या घरी कोण आहे, त्याच्या घरची परिस्थिती कशी आहे, हा किती वेळ देऊ शकेल, याने अधिक वेळ दिला पाहिजे यासाठी याच्या जीवनाची रचना कशी करावी लागेल, असा सर्व विचार करून ते त्याला मार्गदर्शन करीत जायचे. परंतु आता असे ज्येष्ठ-श्रेष्ठ लोक समाजात कमी आणि सामाजिक संघटनांमध्येसुद्धा कमी झालेले आहेत. त्यामुळे 'जब तक बल्ला चलता है...' तोपर्यंत तुमची आठवण केली जाते आणि त्यानंतर असे मोठमोठे कार्यकर्ते विस्मृतीत जातात. वास्तविक पाहता त्यांच्याकडून देशाची, समाजाची अजून खूप मोठी सेवा बाकी असते. परंतु तरीही असे अनेक लोक विस्मृतीत जातात, कामाच्या बाहेर जातात. यांना धरून ठेवणाऱ्या माणसांची कमतरता आहे. पूर्वी संघटन मोठे झाले ते एकेक माणूस जोडून ठेवल्यानेच झाले. शिरीष महाराजांना थांबवता आले असते. पण दुर्दैवाने थांबविणारा नव्हता म्हणून ते गेले. असे पुन्हा होऊ नये यासाठी विविध संघटनांच्या ज्येष्ठ-श्रेष्ठ लोकांनी विचार करण्याची आवश्यकता आहे व कार्यकर्त्यांना 'ध्येय मार्ग पर चले वीर तो, पीछे अब न निहारोफ्ल, हिम्मत कभी न हारो' असा मंत्र देण्याची आवश्यकता आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### छत्रपती शिवरायांची वाघनखे

छत्रपती शिवरायांच्या जीवनातील अनेक धाडसी व स्फूर्तिदायक प्रसंग आपल्या राष्ट्रजीवनात परिवर्तन घडवून समाजातील सज्जनशक्तीचा प्रभाव निर्माण करतात. आपला भारतीय समाज विजयाचा पूजक आहे. छत्रपती शिवरायांच्या प्रत्येक शस्त्राला शौर्याचा इतिहास आहे. शिवकालीन अनेक शस्त्रांपैकी वाघनखं हे आकाराने लहान व हाताच्या मुठीत लपविलेल्या शस्त्राची नोंद सुवर्ण अक्षराने अंकित झाली.

१० नोव्हेंबर १६५९, गुरुवार या दिवशीचा प्रसंग हा अधर्माच्या दुष्टशक्तीला केवळ नाश करणाराच नव्हे तर धर्माचे संरक्षण करण्यासाठी प्रेरणादायी ठरला. प्रतापगडावर महाराज अफजलखानाच्या भेटीसाठी निघाले. जिवा महाला, सकपाळ, संभाजी कावजी कोंढाळकर, संभाजी करवर, सिद्धी इब्राहिम, येसाजी कंक वगैरे दहा जिवलग सोबत होते. भव्य शामियान्याच्या दाराशी महाराज पोहोचले. धिप्पाड अफजलखान अहंकाराने ओतप्रोत भरला होता. त्याने महाराजांना मिठी मारली. अन् क्षणातच त्याने महाराजांचे मस्तक आपल्या डाव्या बगलेत जोरात डाव्या हाताने



करकचले. अन्? आपली कट्यार काढून महाराजांच्या कुशीवर तडाखून घाव घातला. तो घाव नुसताच खरखरला. कारण महाराजांच्या अंगात पोलादी चिलखत होते. त्याच्या हे लक्षात आले असावे. कारण त्याने लगेच दुसरा घाव घालण्याकरिता कट्यार उगारली अन् तो घाव घालणार, एवढ्यात महाराजांनी आपल्या डाव्या हाताच्या बोटात घातलेली वाघनखं खानाच्या पोटात खुपसली. किंकाळी फुटली. अफजल्या शरीराने बलदंड होता तो काही एका वाराने मरणार नव्हता. महाराजांनी वाघनखाचे दोन-तीन वार घातल्याने खानाची आतडी बाहेर आली. खान कोसळला. प्रतापगडावर वाघनखं या गप्त शस्त्राने महाराजांनी विजयाचं शौर्य गाजविले. महाराजांच्या या तेजस्वी शौर्यासोबत वाघनखं सुद्धा अजरामर झालीत. त्यामुळे वाघनखं मस्तकी धरली पाहिजेत. शिवरायांनी वापरलेली वाघनखे शौर्याचे प्रतीक आहेत. छत्रपती शिवरायांना मानाचा त्रिवार मुजरा!

**अमोल तपासे**/९९६०६७३७८९

## वाचक पत्रे

### घुसखोरांविरुद्ध कठोर कारवाईची गरज

आपला भारत देश सुखी, समृद्ध व विकसित व्हावा यासाठी सर्व पातळ्यांवर, युद्धस्तरावर प्रयत्न होत असताना आपण बघतो. सरकारचे काटेकोरपणे होत असणारे मूल्यमापन, नियोजन, नवनवीन कायदे व अनुशासन याद्वारे होणारे प्रयत्न आपण बघत आहोत. एवढं होत असलं तरी खऱ्या अर्थाने आपण विकसित होणार आहोत का? असा जर प्रश्न विचारला तर उत्तर नकारार्थी असेल. मग काय कारण आहे की जे देशाला विकसित होण्यास बाधक ठरत आहे. माझ्या मते ते एकमेव मुख्य कारण म्हणजे या देशात जे देशविरोधी असंख्य लोक देशाला पोखरत आहेत त्यांचा न होणारा खात्रीशीर उपाय.

प्रथम तर जे शेजारी देशातील घुसखोर व नंतर देशातील विश्वासघातकी लोक. कितीही कायदे व उपाय करून हा प्रश्न सुटणारा नाही. येथे निदान घुसखोरांना तरी डोनाल्ड ट्रम्प यांचा फॉर्म्युला वापरायला काय हरकत आहे. राहिला प्रश्न विश्वासघातकी लोकांचा. त्यांच्यासाठी एकच उपाय आहे तो म्हणजे अशांचं निर्मूलन वा उच्चाटन. पण पुढे प्रश्नच तो म्हणजे हे करावं कुणी आणि कसं! हे प्रश्न अनुत्तरित राहू नये म्हणून कुणीतरी पुढाकार घ्यावा, असे वाटते.

**शिरीष घिर्णीकर**/मलकापूर

### सुधारित सायबर क्राईम कायद्याची आवश्यकता

एकीकडे शासन भ्रमणध्वनीवर सायबर क्राईमपासून सावध राहा, अशा सूचना देत आहे. त्याचवेळी, रमी सर्कल वगैरे वेगवेगळी आमिषे दाखवणाऱ्या जाहिराती बेधडकपणे युट्युबवर आणि प्रत्येक व्यक्तीच्या भ्रमणध्वनीवर दिसत असतात. आणि त्यांची जाहिरात करणारा चित्रपटातील प्रसिद्ध हिरो असतो, असा विरोधाभास आहे. जर ही सगळी अवैध पैसे मिळवण्याची माध्यमे शासनस्तरावरच बंद केली, तर सायबर क्राईमला आळा बसू शकेल. यासाठी, सोशल मीडिया प्रसार आणि सायबर क्राईम याविषयी सुधारित नियमावली तयार करण्यात यायला हवी. सायबर क्राईमसाठी कठोर शिक्षेची अंमलबजावणी व्हायला हवी. विशेष म्हणजे रमी सर्कल आणि तत्सम जाहिरातींवर बंदी घालण्यात यावी.

चुकीच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या युट्युबसारख्या ॲप्स आणि जाहिरातींवर आळा बसवण्यासाठी परिणामकारक न्यायसंहिता बनेल, त्या दिवसापासून सोशल मीडिया आणि सायबर जगताला एक नवी योग्य दिशा प्राप्त व्हायला सुरुवात होईल, असे म्हणायला हरकत नाही.

**- मेघश्याम दळवी**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### विद्यार्थ्यांनी राबविले रानमसलेत समृध्द गाव स्वच्छता अभियान

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रासेयो शिबिराच्या माध्यमातून लोकमंगल समृद्ध गाव योजनेअंतर्गत उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथे ग्रामस्वच्छता अभियान राबविले. या अभियानांतर्गत रानमसले येथील अंगणवाडी परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अंगणवाडी परिसरातील वाढलेले गवत व झाडांच्या आजूबाजूला असलेल्या काटेरी गवताळ झुडुपे काढण्यात आली. यामध्ये महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमासाठी रानमसले गावचे सरपंच मनोहर क्षिरसागर व उपसरपंच रमेश सुतार यांचे सहकार्य लाभले. यासोबतच रोसेयो शिबिराअंतर्गत पार पडलेल्या रक्तक्षय तपासणी शिबिराचे अहवाल शिबिरातील ब्रम्हगायत्री विद्यामंदिर कृषी व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सहभागी शालेय विद्यार्थीनींना वितरित करण्यात आले. याप्रसंगी प्रा. आशिष सरकाळे, प्रा. अंकिता पवार तसेच रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. या अभियानासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सागर महाजन तसेच संस्थेचे अध्यक्ष रोहन देशमुख व सचिव डॉ. अनिता ढोबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



### चारित्र्यसंपन्न जीवनासाठी चांगले नियम आत्मसात करावे : पोलिस निरीक्षक पाटील

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

आनंदी व चारित्र्यसंपन्न जीवन जगण्यासाठी जीवनात चांगले नियम आत्मसात करावे, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक संगीता पाटील यांनी केले. श्री सिद्धेश्वर साखर कारखाना संचालित श्री सिद्धेश्वर प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रमात संगीता पाटील बोलत होत्या. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक वशिष्टी सोनकांबळे, पोलीस उपनिरीक्षक विद्यासागर सोनकांबळे, मुख्याध्यापक के. टी. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वशिष्टी सोनकांबळे, विद्यासागर सोनकांबळे, सतीश राठोड यांनीही मार्गदर्शन करून विध्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन अंकिता वाले हिने केले. आभार माधुरी पाटील हिने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुप्रिया वडियर, प्रमोद सकोजी यांनी परिश्रम घेतले.



### राजराजेश्वरी प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर दि. १६ फेब्रुवारी-**

विनायक नगर येथील राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक रेवणसिद्ध रोडगीकर, सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, नेताजी प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे उपस्थित होते. प्रास्ताविक सिमरन चन्ना या विद्यार्थिनीने केले. यावेळी भालचंद्र वाघमारे, समर्थ जेऊरे, सिद्धार्थ कांबळे, सुमित जुटला, नंदिनी वालीकर, वाणीश्री वंगारी, जयश्री भोरगुंडे, आरती आवार, श्रेया वच्चे आणि रजिता यनगंटी या विद्यार्थ्यांनी शाळा आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केले. शिक्षक प्रतिनिधी विश्वनाथ तंबाके यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन केदार कुंभार, सुमन बिराजदार यांनी आभार मानले.

# राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत आजपासून निक्षय आठवडा

## आजपासून विविध स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

केंद्रिय क्षयरोग विभाग, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या सन २०२५ अखेर देशातून क्षयरोगाचे दुरिकरण करण्याचे ध्येय लक्षात घेवून राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाबाबत जनजागृती करण्यासाठी राज्य क्षयरोग कार्यालयाने राज्यात १७ ते २३ फेब्रुवारी दरम्यान निक्षय आठवडा या मुक्त स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या स्पर्धकांचे मुल्यांकन करून त्यांना पुरस्कार देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैदयकीय महाविदयालयामधील अधिकारी व कर्मचारी, इतर सर्व शासकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी,सर्व सामान्य नागरिक या विभागामध्ये विभागण्यात आले आहे. सहा श्रेणीमध्ये विभागण्यात आलेली आहे.

क्षयरोग विषयक जनजागृती स्पर्धा यात क्षयरोग विषयक ओपन माईक स्पर्धा, क्षयरोग विषयक नाटक स्पर्धा, क्षयरोग विषयक कलाप्रदर्शन स्पर्धा, क्षयरोग विषयक रांगोळी स्पर्धा, क्षयरोग विषयक चित्रकला स्पर्धा, क्षयरोग विषयक प्रश्नमंजूषा स्पर्धा आणि राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमात योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार आहे.

**कविता, लघुकथा लेखन स्पर्धा होणार**

क्षयरोग मुक्त जग या विषयावर मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतून स्पर्धा होईल. क्षयरोग दूरीकरणासाठीचे संघटित प्रयत्न या विषयावर लघुकथा लेखन स्पर्धा होणार आहे. क्षयरोग दूरीकरणासाठीचे संघटित प्रयत्न या विषयावर मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत होणार आहे. व्हीडीओ रील निर्मिती स्पर्धा ही क्षयरोगविरोधी औषधांना दाद न देणारा क्षयरोग, खोकल्याच्या शिष्टाचार, क्षयरोग प्रतिबंधक उपचार, पोषण आणि क्षयरोग, क्षयरोग कलंक दूर करणे व हवेव्दारे जंतुसंसर्ग नियंत्रण आदी विषयाबाबत राहणार आहे. तसेच मीम बनविण्याची स्पर्धा, लघुपट व्हीडीओ स्पर्धा होणार आहेत. सहा स्पर्धा श्रेणीमधून प्रत्येक श्रेणी व भाषेनुसार सर्वोत्तम ३ प्रवेश निवडल्या जातील व त्यानुसार पुरस्कार देण्यात येतील.

प्रवेशिका ntep.acsm.mhgmail.com वर २४ फेब्रुवारी पाठवावेत. नोंदणी व प्रवेशिकेसाठी गुगल फॉर्म लिंक आहे. प्रवेशिकेसोबत सर्व सहभागीदारांची नावे, प्रमुख सहभागीदाराचे वय, पदनाम, संपर्क भ्रमणध्वनी क्रमांक, विभागाचे नाव आदी माहिती भरावी, असे आवाहन आरोग्य सेवक क्षयरोग व कुष्ठरोग पुणे सहसंचालक डॉ. संदीप सांगळे यांनी केले आहे.

मनोरमा परिवार अंतर्गत
**महिला उद्योजक नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर**
मनोरमा कॉम्प्लेक्स, अवंती नगर, जुना पुना नाका, सोलापूर
**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**
९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९९ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना
अधिक महितीसाठी संपर्क
कु. अरुंधती पद्माकर नायडू - चेअरमन (मो. ९०२८७१७२७२)
सौ. मंजुश्री विजय कालेकर - व्यवस्थापिका (मो. ९८८१४५५११९)

## चिंचोळी एमआयडीसीतील उद्योजकांचे मुख्यमंत्र्यांना पत्र




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने प्रस्तावित केलेल्या वीज दरवाढीमुळे राज्यातील लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांवर मोठे आर्थिक संकट ओढावण्याची भीती निर्माण झाली आहे. या दरवाढीमुळे उत्पादन खर्च वाढणार असून, त्याचा थेट परिणाम उद्योगधंद्यांच्या व्यवहार्यतेवर आणि राज्याच्या आर्थिक प्रगतीवर होईल, अशी भीती सोलापूर इंडस्ट्रिज असोशिएशन चिंचोळी, एमआयडीसीच्या वतीने एका पत्रान्वये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे व्यक्त केली आहे. दरम्यान, ही वीज दरवाढ रद्द करावी, अशीही मागणी केली आहे.या वीज दरवाढीचे संभाव्य दुष्परिणाम त्यांनी निवेदनात मांडले आहेत. यामध्ये वाढलेल्या वीज दरामुळे उत्पादनाचा खर्च वाढेल, ज्यामुळे स्पर्धात्मक बाजारात टिकून राहणे कठीण होईल. लघु व मध्यम उद्योजकांवर मोठा परिणाम होणार असून, आधीच अडचणीत असलेल्या लघु आणि मध्यम उद्योगांना हा अतिरिक्त भार सहन करणे कठीण जाईल. अनेक उद्योग बंद पडण्याची शक्यता असल्यामुळे बेरोजगारी वाढण्याची भीती आहे.

> राज्यातील गुंतवणुकीवर परिणाम होणार असून, उच्च वीज दरामुळे नवीन गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र राज्य अनाकर्षक ठरू शकते, परिणामी औद्योगिक विकासाला फटका बसेल. यामुळे राज्यातील उद्योगधंद्यांच्या हिताचे रक्षण करणे आवश्यक आहे. म्हणून, आपण सदर वीज दरवाढ रद्द करावी अथवा कमी करण्याच्या दृष्टीने तातडीने योग्य पावले उचलावीत.
> **- डी. राम रेड्डी, अध्यक्ष, सोलापूर इंडस्ट्रिज असो. चिंचोळी एमआयडीसी**

## समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर

मुख्य कार्यालय : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर-७. फोन : २७४४२१०/१३

### फेर जाहीर लिलाव

या जाहीर प्रकटनाद्वारे तमाम जनेतस कळविण्यात येते कि, आमच्या बँकेच्या मालकीच्या व प्रत्यक्ष कब्जात असलेल्या खालील दर्शविण्यात आलेल्या परिशिष्टातील नमुद मिळकतीचा फेर जाहीर लिलाव ठेवण्यात आलेला आहे. तरी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी वार **गुरुवार दि. २०/०३/२०२५** रोजी वेळ सकाळी ११.३० वा स्थळ बँकेचे मुख्य कार्यालय - अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्त चौक, सोलापूर येथे उपस्थित रहावे

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

डि व सब डि सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर, येथील मिळकत
१) मौजे मंद्रुप येथील गट क्र.१०४/२/क यांसी क्षेत्र.१ हे ०.०५ आर. यांसी चर्तु:सिमा :
पूर्वेस : गट नं.१०४/२/अ; पश्चिमेस : गट नं.१०४/२/ ब ; दक्षिणेस : गट नं.१०५/३; उत्तरेस : गट नं.९३/१
२) मौजे मंद्रुप येथील गट क्र.१३९ यांसी क्षेत्र ० हे .०.०४ आर. यांसी चर्तु:सिमा :
पूर्वेस : गट नं.१३९ पैकी; पश्चिमेस : गट नं.१४०; दक्षिणेस : गट नं.१३९ पैकी; उत्तरेस : मंद्रुप निंबर्गी रस्ता
३) मौजे नांदणी येथील गट क्र.५/२/अ/२ यांसी क्षेत्र ० हे ०.४९ आर. यांसी चर्तु:सिमा :
पूर्वेस : गट नं.५/२/ब; पश्चिमेस : सोलापूर-विजापूर हायवे रस्ता; दक्षिणेस : गट नं.३/१/ब ; उत्तरेस : ५/१/ब
४) मौजे नांदणी येथील गट क्र.५/२/ब यांसी क्षेत्र ० हे ०.६० आर. यांसी चर्तु:सिमा :
पूर्वेस : हायवे रस्ता; पश्चिमेस : ५/२/अ/२; दक्षिणेस : गट नं.४/१/ब ; उत्तरेस : ५/१/ब

टीप : १) लिलावाच्या नियम, अटी व शर्ती बँकेच्या प्रधान कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तिने अनामत रक्कम रु. १,००,०००/- लिलाव सुरु होण्यापूर्वी भरावी लागेल. त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही
३) लिलावाचे वेळी सर्वात जास्त बोली बोलणाऱ्यांचे नांवे तीन वार पुकारुन लिलाव संपविला जाईल.
४) लिलाव झाल्यानंतर लिलाव रक्कमेच्या २५% रक्कम त्यादिवशी व राहिलेली ७५% रक्कम मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर यांची परवानगी मिळाल्यानंतर भरावी लागेल
५) लिलाव संबधी सर्व अधिकार वसुली अधिकारी यांना असुन याबाबत त्यांचा निर्णय अंतिम राहील.

तारीख : दि. १५/०२/२०२५
स्थळ : सोलापूर

शिक्का

सही/-
श्री. एन. बी. लोंढे
(वसुली अधिकारी)
समर्थ सह. बँक लि. सोलापूर
मो. ९४२००९०५२७

Jhaveri

## जाहिर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १८ अनुसार तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ यांच्या वैधानिक कार्यक्षेत्रातील व प्रवर्गातील खालील क-वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणूक कार्यक्रमांची घोषणा मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा. पुणे यांनी केलेली आहे. सदर निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे नांव | नामनिर्देशन पत्र विक्री व दाखल करावयाचा दिनांक | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याचा कालावधी | मतदान व मत मोजणीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बालाजी अमाईन्स कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., चिंचोली ता. मोहोळ | **जी.टी. वडेकर,** सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ ता. मोहोळ | १७/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ वेळ स.११.०० ते ३.०० | २५/०२/२०२५ वेळ सकाळी ११.३० | २७/०२/२०२५ ते १३/०३/२०२५ स.११.०० ते ३.०० | २२/०३/२०२५ |
| २ | आदर्श महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, मर्या., घोडेश्वर ता. मोहोळ | **जी.टी. वडेकर,** सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ ता. मोहोळ | १७/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ वेळ स.११.०० ते ३.०० | २५/०२/२०२५ वेळ सकाळी ११.३० | २७/०२/२०२५ ते १३/०३/२०२५ स.११.०० ते ३.०० | २३/०३/२०२५ |
| ३ | लोकनेते बाबुराव पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, मर्या., वाफळे ता. मोहोळ | **एन.व्ही.पवार,** सहकारी अधिकारी श्रेणी-२ | १७/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ वेळ स.११.०० ते ३.०० | २५/०२/२०२५ वेळ सकाळी ११.३० | २७/०२/२०२५ ते १३/०३/२०२५ स.११.०० ते ३.०० | २२/०३/२०२५ |
| ४ | सौ. तारामती पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, मर्या., आष्टी ता. मोहोळ | **एन.व्ही.पवार,** सहकारी अधिकारी श्रेणी-२ | १७/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ वेळ स.११.०० ते ३.०० | २५/०२/२०२५ वेळ सकाळी ११.३० | २७/०२/२०२५ ते १३/०३/२०२५ स.११.०० ते ३.०० | २३/०३/२०२५ |
| ५ | मोतीचंद कोठाडिया नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, मर्या., खंडाळी ता. मोहोळ | **एस.टी. शिंदे,** मुख्य लिपीक | १७/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ वेळ स.११.०० ते ३.०० | २५/०२/२०२५ वेळ सकाळी ११.३० | २७/०२/२०२५ ते १३/०३/२०२५ स.११.०० ते ३.०० | २२/०३/२०२५ |
| ६ | राजनश्री सर्व व्यावसायिक ग्राहक सहकारी संस्था मर्या. कुरुल ता. मोहोळ | **एस.टी. शिंदे,** मुख्य लिपीक | १७/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ वेळ स.११.०० ते ३.०० | २५/०२/२०२५ वेळ सकाळी ११.३० | २७/०२/२०२५ ते १३/०३/२०२५ स.११.०० ते ३.०० | २२/०३/२०२५ |
| ७ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी महिला क्रेडीट को. ऑप. सोसायटीलि. मोहोळ ता. मोहोळ | **एम.एम. शिंदे,** सहाय्यक सहकारी अधिकारी | १७/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ वेळ स.११.०० ते ३.०० | २५/०२/२०२५ वेळ सकाळी ११.३० | २७/०२/२०२५ ते १३/०३/२०२५ स.११.०० ते ३.०० | २३/०३/२०२५ |
| ८ | राजहंस ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. सोहाळे ता. मोहोळ | **एम.एम. शिंदे,** सहाय्यक सहकारी अधिकारी | १७/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ वेळ स.११.०० ते ३.०० | २५/०२/२०२५ वेळ सकाळी ११.३० | २७/०२/२०२५ ते १३/०३/२०२५ स.११.०० ते ३.०० | २२/०३/२०२५ |

**टीप : १.** उपरोक्त सर्व सहकारी संस्थांचे मतदारसंघ, समितीची रचना, निवडणूकांच्या विविध टप्पयांच्या तारखा व वेळा इ. बाबतचा सविस्तर निवडणूक कार्यक्रम संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संबंधित तालुक्याचे तालुका सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ यांचे कार्यालय, संबंधीत सहकारी संस्थेच्या नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.
**२.** वरीलपैकी सर्व संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय हे संबंधीत तालुक्याचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय राहील. मतदान व मतमोजणीचे ठिकाण आवश्यकते नुसार संबंधीत संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कडून जाहिर करण्यात येईल.

सही/-
(जी.टी. वडेकर)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ

## ग्रामपंचायत उंदरगाव, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत उंदरगाव ता.माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

### लेखाशिष - १५ वा वित्त आयोग

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालयामागे पुरुष सार्वजनिक शौचालय युनिट बांधणे | ३,३०,०००/- | - | १००/- | ६ महिने | सु.बे.अ. लायसन्स धारक |
| २ | गावठाण अंतर्गत भूमिगत गटार बांधणे व दुरुस्ती करणे | ६,३०,०००/- | - | | | |
| ३ | अण्णाभाऊ साठे नगर वस्ती मध्ये पेव्हिंग ब्लॉक बसवणे | १,४४,०००/- | - | | | |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी १७/०२/२०२५ सकाळी १० पासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक २०/०२/२०२५ पर्यंत सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय उंदरगाव
३ निविदा उघडण्याचा दिनांक २१/०२/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत उंदरगाव
ता. माढा, जि. सोलापूर

सही/-
रतन मा. लवटे
सरपंच
ग्रामपंचायत उंदरगाव
ता. माढा, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्या खालील नियम 1961 व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम 2014 मधील तरतुदीनुसार व मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा. पुणे यांचेकडील दिनांक 03/01/2025 रोजीच्या आदेशानुसार देण्यात आलेल्या अर्हता दिनांकानुसार प्राप्त झालेल्या सोलापूर जिल्हयातील खालील व वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रारुप (कच्ची) मतदार यादीचे जाहिर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

**✻ प्रारुप मतदारयादी प्रसिध्दी कार्यक्रम ✻**

| प्रारुप मतदार यादी प्रसिध्द दिनांक | दावे/हरकत घेण्याचा कालावधी | हरकत न घेतलेल्या संस्थेची अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक | जिसनिअ यांचा हरकतीचा निर्णय देण्याचा दिनांक | दावे/हरकत आलेल्या संस्थेची अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|
| दि. 17-02-2025 | दि.17-2-2025 ते दि.27-2-2025 | दि. 03-03-2025 | दि. 07-03-2025 | दि.12-03-2025 |

| अ.क्र | संस्थेचे नाव (तालुका-पंढरपूर) | अ.क्र | संस्थेचे नाव (तालुका-बाशी) |
|---|---|---|---|
| १ | सोलापूर जिल्हा मलेरिया निर्मूलन सेवक सहकारी पतसंस्था मर्या. पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | ८ | शेळगांव शिक्षण प्रसारक मंडळ सेवक सहकारी पतसंस्था मर्या, शेळगांव (आर) ता. बाशी जि. सोलापूर |
| २ | नेमतवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. नेमतवाडी ता. पंढरपूर जि. सोलापूर | | **संस्थेचे नाव (तालुका-मंगळवेढा)** |
| ३ | छत्रपती विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या, अनवली ता. पंढरपूर जि. सोलापूर | ९ | तळसंगी प्राथ.वि. का. से. सह. संस्था मर्या., तळसंगी, ता. मंगळवेढा जि. सोलापूर |
| ४ | शेतकरी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. कासेगांव ता. पंढरपूर जि. सोलापूर | | **संस्थेचे नाव (तालुका-अक्कलकोट)** |
| ५ | नारायणचिंचोली विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. नारायणचिंचोली ता. पंढरपूर जि. सोलापूर | १० | अक्कलकोट तालुका गटपातळी वरील बहुउद्देशिय सहकारी संस्था म. अक्कलकोट जि. सोलापूर |
| ६ | पंढरपूर तालुका पुरोगामी प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मयां, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर | ११ | स्वामी विवेकानंद सहकारी रुग्णालय व संशोधन केंद्र, मर्या, अक्कलकोट जि. सोलापूर |
| | **संस्थेचे नाव (तालुका-मोहोळ)** | | |
| ७ | नागनाथ सहकारी रुग्णालय व संशोधन केंद्र नियमित, मोहोळ, जि. सोलापूर | | |

**टिप :-** उपरोक्त निवडणूक कार्यक्रम व प्रारुप मतदारयादी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर, ई ब्लॉक मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर, संबंधित तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, संस्थेचे कार्यालय, संबंधित ग्रामपंचायत/ तलाठी कार्यालय व संस्थेच्या शाखा कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे याची नोंद घ्यावी.

स्थळ-सोलापूर
दिनांक - 12/02/2025

सही/-
(किरण गायकवाड)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### प्रो-लीग हॉकी : स्पेनकडून भारताचा ३-१ ने पराभव



**भुवनेश्वर** : कलिंगा हॉकी स्टेडियमवर झालेल्या एफआयएच हॉकी प्रो-लीग २०२४-२५ च्या चुरशीच्या सामन्यात स्पेनने भारताचा ३-१ गोलने पराभव केला. सुखजीत सिंगने सुरुवातीला आघाडी घेतली असली तरी, भारताला पेनॉल्टी कॉर्नर रूपांतरणात अडचणी आल्या. स्पेनच्या बोर्जा लाकाले (२८ वे मिनिट), इग्नासियो कोबोस (३८ वे मिनिट) आणि ब्रुनो अविला (५६ वे मिनिट) यांनी प्रत्येकी एक गोल नोंफ्लदवला व आपल्या संघाचा विजयनिश्चित केला. भारताने आक्रमक सुरुवात केली व सामन्यात आपला दबाव निर्माण करत पहिल्या चरणात अनेक संधी निर्माण केल्या. सुखजीत सिंगने गोल नोफ्लदवून भारताला आघाडी मिळवून दिली, परंतु त्यानंतर भारताचा खेळ कमकुवत होत गेला. स्पेनचा संघ तेवढ्याच आक्रमकतेने खेळत होता. परिणामी नंतर भारताला एकही गोल नोफ्लदवता आला नाही व स्पेनने सामन्यात वर्चस्व गाजवले.

### महिलांच्या प्रो-लीगमध्ये इंग्लंडचा भारतावर विजय

**भुवनेश्वर** : रविवारी भुवनेश्वरमधील कलिंगा हॉकी स्टेडियमवर झालेल्या एफआयएच हॉकी प्रो -लीग (महिला) सामन्यात इंग्लंडने २-२ अशा बरोबरीनंतर भारताला पेनॉल्टी शूट-आउटमध्ये हरवून बोनस पॉईंट जिंकला. भारताकडून नवनीत कौर (५३ वे मिनिट) आणि ऋताजा दादासो पिसालने (५७ वे मिनिट) गोल केले, तर इंग्लंडकडून पैज गिलोट (४० वे मिनिट) आणि टेसा हॉवर्डने (५६ वे मिनिट) गोल केला. ऋताजासाठी ही संध्याकाळ संस्मरणीय होती कारण तिने तिच्या वरिष्ठ आंतरराष्ट्रीय पदार्पणात गोल करून भारतासाठी सामना बरोबरीत आणला. मात्र पेनॉल्टी शूट-आउटमध्ये इंग्लंडने बाजी मारली. पहिल्या चरणात दोन्ही संघांनी चांगल्या संधी निर्माण केल्या, पण कोणीही गतिरोध तोडू शकले नाही.

### दक्षिण आफ्रिकेचा प्रिटोरियस उत्कृष्ट खेळाडू : दिनेश कार्तिक

**नवी दिल्ली** : दक्षिण आफ्रिकेचा युवा लिआन-ड्रे प्रिटोरियस उत्कृष्ट क्रिकेटपटू असून त्याला आयपीएलमध्ये स्थान मिळाले तर आपल्याला आश्चर्य वाटणार नाही, असे भारताचा क्रिकेटपटू दिनेश कार्तिक म्हणाला. प्रिटोरियसने दक्षिण आफ्रिका लीग २०२५ मध्ये पार्ल रॉयल्ससाठी १२ डावांमध्ये ३९७ धावा करून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज म्हणून मोठे यश मिळवले. शिवाय, डावखुरा यष्टिरक्षक-फलंदाजाने अलीकडेच या वर्षीच्याा टी-२० ब्लास्टसाठी हॅम्पशायरशी करार केला. दक्षिण आफ्रिकेच्या वरिष्ठ संघात अद्याप स्थान मिळवलेले नसले तरी, भारताचा माजी यष्टिरक्षक-फलंदाज दिनेश कार्तिक असा अंदाज व्यक्त करतो की प्रिटोरियसचा आयपीएलमध्ये समावेश आश्चर्यकारक ठरणार नाही, कारण तो पार्ल रॉयल्समध्ये त्याचा सहकारी म्हणून जवळून निरीक्षण करत होता. दक्षिण आफ्रिका टी-२० मध्ये खेळणारा कआर्तिक हा पहिला भारतीय खेळाडू आहे.

### लखनौ विजेतेपदाचा प्रबळ दावेदार : झहीर खान

**लखनौ** : लखनौ सुपर जायण्ट्स आयपीएल विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार आहे, असे झहीर खान म्हणाला. बीसीसीआयने आयपीएलच्या हंगामाचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केल्यानंतर काही वेळातच लखनौ सुपर जायण्ट्सचा (एलएसजी) मार्गदर्शक झहीर खान म्हणाला की, संघ विजेतेपद जिंकण्यासाठी एक प्रबळ दावेदार म्हणून आकार घेत आहे.ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील एलएसजी आयपीएलचा पहिला सामना दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध २४ मार्च रोजी संध्याकाळी विशाखापट्टणम येथील एसीए-व्हीडीसीए स्टेडियमवर खेळेल. गेल्या वर्षी जेद्दाह येथे झालेल्या मेगा लिलावात एलएसजीने २७ कोटी रुपयांना खरेदी केल्यानंतर पंत आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला. एलएसजी आयपीएल २२०२२ आणि २०२३ च्या हंगामात प्लेऑफमध्ये पोहोचला होता, परंतु दोनदा एलिमिनेटरमधून बाहेर पडला होता. आयपीएल २०२४ मध्ये, एलएसजी गुणतालिकेत सातव्या स्थानावर राहिला. ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील संघात डेव्हिड मिलर, एडेन मार्कराम, निकोलस पूरन, मिशेल मार्श, आयुष बदोनी, मयंक यादव, आवेश खान आणि रवी बिश्नोई असे अनेक उत्कृष्ट खेळाडू आहेत.

### तापमान/पर्जन्यमान

| | कमाल | मिमी |
|---|---|---|
| अकोला | ३६.७ | १५.८ |
| अमरावती | ३५.८ | १४.५ |
| भंडारा | ३४.८ | १६.२ |
| बुलडाणा | ३५.० | १७.८ |
| चंद्रपूर | ३६.४ | -.- |
| गडचिरोली | ३४.६ | १३.४ |
| गोंदिया | ३४.४ | १५.२ |
| नागपूर | ३६.५ | १४.८ |
| वर्धा | ३६.० | १६.२ |
| वाशीम | ३३.४ | १९.० |
| यवतमाळ | ३५.४ | १६.३ |

# विदर्भाविरुद्ध मुंबई उपांत्य आजपासून

### दुखापतग्रस्त यशस्वी जयस्वाल खेळणार नाही

◆ **नागपूर, १६ फेब्रुवारी**

नागपूरच्या व्हीसीए स्टेडियमवर सोमवारपासून विदर्भ आणि मुंबई संघादरम्यान प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा उपांत्य सामना खेळला जाणार आहे. आपल्याघरच्या मैदानावर दोन वेळचा विजेता विदर्भ संघ ४२ वेळच्या विजेत्या मुंबई संघाचा कसा सामना करतो, हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे. ही लढत म्हणजे गतवर्षीच्या अंतिम सामन्याची पुनरावृत्ती आहे.

या सामन्यासाठी मुंबई संघात दुखापतग्रस्त यशस्वी जयस्वाल असण्याची शक्यता कमी आहे. तो लवकरच आपल्या दुखापतीची अधिक तपासणी करण्यासाठी बंगळुरू येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये जाऊ शकतो. त्याला भारताच्या चॅम्पियन्स चषक संघात ''नॉन-ट्रॅव्हलिंग रिझर्व्ह'' म्हणून निवडण्यात आले आहे.

जयस्वालच्या अनुपस्थितीमुळे मुंबई संघाची ताकद कमी करत नाही. मुंबई संघात कर्णधार अजिंक्य रहाणे, सूर्यकुमार यादव, शिवम दुबे व शार्दुल ठाकूर असे अनेक स्टार खेळाडू आहेत. हे खेळाडू सामन्याला कलाटणी देऊ शकतात.



सरावादरम्यान मुंबईचा सूर्यकुमार यादव आणि संघमित्र

या हंगामात अनेक वेळा मुंबईच्या फलंदाजांची अव्वल फळी अपयशी ठरली आहे, परंतु ठाकूर व तनुष कोटियन सारख्या तळाच्या फळीतील फलंदाजांनी मुंबई संघाला संकटातून बाहेर काढले. हरयाणाविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात त्यांची अवस्था ७ बाद ११३ धावा अशी होती, पण शम्स मुलानी व कोटियनने आठव्या गड्यासाठी १८३ धावांची भागीदारी करत मुंबईला वाचवले.

नागपूरची खेळपट्टी फलंदाजांसाठी अनुकूल आहे, तेव्हा मुंबईच्या मोठ्या खेळाडूंकडून धावांचा पाऊस पडण्याची अपेक्षा आहे. हर्ष दुबे, यश ठाकूर, आदित्य ठाकरे आणि नचिकेत भूत यांनी विदर्भासाठी सातत्याने गोलंदाजी केली आहे, तेव्हा मुंबईच्या फलंदाजांना रोखण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. डावखुरा फिरकी गोलंदाज दुबे या रणजी हंगामात सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज असून त्याच्या नावावर ५९ बळी आहेत. म्हणून, विदर्भ मुंबईच्या अव्वल फळीला खिंडारपासून प्रारंभीच त्यांच्यावर दबाव आणण्यास उत्सुक असेल.

या हंगामात सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत मुंबईच्या एकाही फलंदाजाचा समावेश नाही.

सिद्धेश लाड (५६५ धावा) हा त्यांचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे आणि तो धावा करणाऱ्यांच्या यादीत २२ व्या स्थानावर आहे.

याउलट, विदर्भाची आघाडीची फळी या हंगामात खूपच चांगल्या स्थितीत आहे . यश राठोड (७२८ धावा) हा सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत चौथ्या क्रमांकावर आहे. करुण नायर (५९१) आणि कर्णधार अक्षय वाडकरनेही (५८८) महत्त्वपूर्ण धावा केल्या आहेत. तथापि, विदर्भाला सलामीवीर अथर्व तायडे व ध्रुव शोरीकडून काही चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे.

**प्रतिस्पर्धी संघ असे**

**मुंबई** : अजिंक्य रहाणे (कर्णधार), आयुष म्हात्रे, आंगकृष्ण रघुवंशी, अमोघ भटकळ, सूर्यकुमार यादव, यशस्वी जयस्वाल (जखमी), सिद्धेश लाड, शिवम दुबे, आकाश आनंद (यष्टिरक्षक), हार्दिक तामोरे (यष्टिरक्षक), सूर्यांश शेडगे, शार्दुल ठाकूर, मोहित कोलकाता, तनखे, मुरली. सिल्व्हेस्टर डिसूझा, रॉयस्टन डायस, अथर्व अंकोलेकर व हर्ष तन्ना.

**विदर्भ** : अक्षय वाडकर (कर्णधार, यष्टिरक्षक), अथर्व तायडे, अमन मोखाडे, यश राठोड, हर्ष दुबे, अक्षय कर्णेवार, यश कदम, अक्षय वखरे, आदित्य ठाकरे, दर्शन नळकांडे, नचिकेत भुते, सिद्धेश वाठ (यष्टिरक्षक), यश ठाकूर, दानिश मालेवार, पार्थ रेखडे, करुण नायर व ध्रुव शोरी. सामना सकाळी ९.३० वाजता सुरू होईल. (वृत्तसंस्था)

# एडवर्ड्सचा पंचांच्या निर्णयांवर आक्षेप

◆ **वडोदरा, १६फेब्रुवारी**

शनिवारी महिला प्रीमियर लीग सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने मुंबई संघावर २ गड्यांनी रोमहर्षक विजय नोंफ्लदविला, मात्र या गमावलेल्या सामन्यादरम्यान पंचांनी दिलेल्या वादग्रस्त धावबादच्या निर्णयांवर मुंबई इंडियन्स संघाच्या प्रशिक्षक चार्लोट एडवर्ड्स यांनी टीका केली. पंचांचा निर्णय सामन्याच्या अंतिम निकालावर परिणाम करणारे असे होते. हे निर्णय समजणे खरोखर कठीण आहे, असे त्या म्हणाल्या.

शनिवारी झालेल्या डब्ल्यूपीएल सामन्यात तिसरे पंच गायत्री वेणुगोपालन ?यांनी दिल्ली कॅपिटल्सच्या तीन फलंदाजांना- राधा यादव, अरुंधती रेड्डी व शिखा पांडे - नाबाद घोषित केले. फलंदाज पोहोचण्याच्या आधीच चेंडू यष्टीच्या संपर्कात आल्यानंतर एलईडी उजळल्याच्या क्षणाकडे पंचांनी दुर्लक्ष केले. तीन वादग्रस्त ''रन-आउट'' निर्णयांमुळे वाद निर्माण झाला. जेव्हा अनेक निर्णय तिसऱ्या पंचाकडे जातात तेव्हा ते खरोखर कठीण असते, असे दोन वेळा विश्वचषक विजेत्या इंग्लंडच्या कर्णधार एडवर्ड्स मुंबई इंडियन्सच्या पराभवानंतर म्हणाल्या.

अरुंधती आणि राधा यादव यांच्यावरील निर्णय मुंबई इंडियन्सच्या बाजूने जायला हवे होते, असे निरीक्षण भारताची माजी कर्णधार मिताली राजने असेही निरीक्षण नोंदवले.

डब्ल्यूपीएल २०२५ च्या नियमांनुसार एलईडी स्टम्प उजळल्यावर पहिल्या फ्रेममध्ये विकेट तुटलेली मानली जाते, परंतु येथे तिन्ही प्रकरणांमध्ये, बेल्स पूर्णपणे उखडल्यावर पंचांनी दुसऱ्या फ्रेमवर निर्णय घेतले. (वृत्तसंस्था)

# दिल्लीविरुद्ध आरसीबीचे पारडे जड

### आरसीबी, दिल्ली कॅपिटल्स लढत आज

◆ **वडोदरा, १६ फेब्रुवारी**

महिला प्रीमियर लीगमध्ये सोमवारी येथे गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि दिल्ली कॅपिटल्स याच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. हा सामना म्हणजे गतवर्षीच्या अंतिम सामसन्याची पुनरावृत्ती आहे यंदाच्या हंगामात या दोन्ही संघांनी आपल्या पहिल्या सामन्यात प्रतिस्पर्धी संघांवर विजय मिळविल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास बळावलेला असेल, अशातच हे दोन्ही संघ आता आमने-सामने उभे ठाकतील, तेव्हा आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करतील.

गतविजेत्या आरसीबीने पहिल्या सामन्यात गुजरात जायण्ट्सचा ६ गड्यांनी पराभव केला, तर दिल्ली कॅपिटल्सने मुंबई इंडियन्सवर शेवटच्या चेंडूवर विजय मिळविला. एकंदरीत दिल्ली संघाच्या तुलनेत आरसीबीचा संघ विशेषतः फलंदाजी व गोलंदाजीमध्ये अधिक संतुलित आहे.

स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखालील आरसीबी संघाने २०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य सहजतेने गाठले, त्यामुळे त्यांच्या फलंदाजीची ताकद पूर्ण दिसून आली. राघवी बिस्ट, कनिका आहुजा सारख्या युवा प्रतिभांचा समावेश झाल्यामुळे संघाला बळकटी मिळाली आहे. एलिस पेरी, ऋचा घोष व डॅनी व्याट याची उत्तम साथ मिळत आहे. कनिका व बिस्ट या दोघींनीही गुजरात जायण्ट्सवर नोफ्लदवेलेल्या संघाच्या विजयात उत्कृष्ट भूमिका बजावल्या होत्या. आरसीबीला अनुभवी किम गार्थ आणि जॉर्जिया वेअरहॅम यांच्याकडून मोठ्या योगदानाची अपेक्षा आहे. व्हीजे जोशिता व प्रेमा रावतनेही पुढे येऊन अनुभवी रेणुका सिंगला साथ द्यायला हवी.

दिल्ली कॅपिटल्सकडे कर्णधार मेग लॅनिंग, ॲनाबेल सदरलॅण्ड, शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्ज, ॲलिस कॅप्सी आणि सारा ब्राइसचा समावेश असलेला एक आक्रमक फलंदाजी विभाग आहे. मुंबईविरुद्धच्या सामन्यात त्यांनी अपेक्षित कामगिरी केली नाही, त्यामुळे ते या सामन्यात पूर्ण कसर भरुन काढणार आहेत.

बंगळुरू संघाला अनुभवी वेगवान गोलंदाज शिखा पांडेच्या नेतृत्वाखालील दिल्लीच्या गोलंदाजांविरुद्ध आव्हान द्यावे लागणार आहे. तथापि, आरसीबीची फलंदाजी त्यांना एक वेगळे आव्हान देऊ शकते. (वृत्तसंस्था)

# पुणे येथे होणाऱ्या राज्य कुस्ती स्पर्धेसाठी शहर स्पर्धा मंगळवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी,**

लोणीकंद पुणे येथे २२ व २३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या वरिष्ठ ग्रीकोरोमण राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व १ली ग्रीको रोमन महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी सोलापूर शहर तालीम संघाची निवड चाचणी कुस्ती स्पर्धा मंगळवार १८ फेब्रुवारी रोजी डाळिंबी आड मैदान शिंदे चौक येथे होणार आहे.

ग्रीकोरोमन ५५ किलो, ६० किलो, ६३ किलो, ६७ किलो, ७२ किलो, ७७ किलो, ८२ किलो, ८७ किलो, ९७ किलो व १३० किलो असे वजनगट आहेत. स्पर्धेत सहभागी खेळाडूंची जन्मतारीख जून २००४ पूर्वीची असावी. २००५/६मध्ये जन्म झालेल्या खेळाडूंनी मेडिकल सर्टिफिकेट व पालकांचे संमतीपत्र आणणे आवश्यक आहे. वयाचा व रहिवासी पुरावा म्हणून ओरिजनल आधार कार्ड व पासपोर्ट ग्राह्य धरण्यात येईल. अहिल्यानगर येथे झालेल्या वरिष्ठ गट अजिंक्यपद स्पर्धेतील प्राविण्य धारक कुस्तीगीराला या स्पर्धेत भाग घेता येणार नाही. स्पर्धेसाठी खेळाडूला १ किलो वजनाची सुट राहील. सकाळी १० ते १२ या वेळेत वजने होतील व नंतर कुस्ती स्पर्धेस प्रारंभ होईल.

अधिक माहितीसाठी अर्जुन साठे (९१४६८९४८२५), आतीश मोरे (८९२८८९२१११) अथवा रोहित इगवे (७०२०८२८७१६) यांच्याशी संपर्क साधावा, सोलापूर शहर व जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा, असे आवाहन शहर तालीम संघाचे अध्यक्ष आ. विजयकुमार देशमुख यांनी केले



# नॅशनल गेम स्पर्धेतील पदकविजेत्या रेल्वेच्या खेळाडूंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

हल्द्वानी उत्तराखंड येथे झालेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मध्य रेल्वे सोलापूर विभागाच्या ओम अवस्थी आणि ईशा वाघमोडे यांनी एक रौप्य आणि २ कांस्य पदके पटकाविली. त्यानिमित्त त्यांचा व प्रशिक्षक हरीष अन्नलदास यांचा सत्कार सोलापूर विभागाचे डीआरएम डॉ. सुजित मिश्रा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी एडीआरएम अंशुमाल कुमार, विभागीय क्रीडा अधिकारी आदित्य त्रिपाठी आदी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय शरयू बारामती मॅरेथॉनमध्ये सोलापूरची श्रद्धा गुंटूक प्रथम

**सोलापर, दि. १६ फेब्रुवारी-**




बारामती येथे शरयू फाऊंडेशनतर्फे आयोजित शरयू बारामती मॅरेथॉन स्पर्धेत श्रद्धा केशव गुंटूक हिने १५ वर्षाखालील वयोगटात १० किमी अंतर पूर्ण करीत प्रथम क्रमांक तर खुल्या वयोगटात महिलांमध्ये चौथा क्रमांक पटकाविला.

तिचा ऑलिम्पिक बॉक्सिंग पदक विजेते व अर्जुन पुरस्कार विजेते विजेंदर सिंग यांच्या हस्ते ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार सुप्रिया सुळे, शरयू फाऊंडेशनच्या संस्थापिका शर्मिला पवार आदी मान्यवर उपस्थित होते. श्रद्धास सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडाप्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



# बार्शीची समृद्धी वायकुळे व अथर्व देशपांडे विद्यापीठ बॅडमिंटन संघाचे कर्णधार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १६ फेब्रुवारी**

चंद्रपूर येथील राज्य क्रीडा महोत्सवासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा पुरुष व महिला बॅडमिंटन संघ रविवारी रवाना झाला.

या स्पर्धेसाठी महिला व पुरुष संघाच्या कर्णधारपदी बार्शीच्या अनुक्रमे समृध्दी वायकुळे व अथर्व देशपांडे यांची निवड करण्यात आली. संघास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे , व्यवस्थापक गणेश जोरवर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. वाय. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अब्दुल शेख कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय कारंडे यांनी शुभेच्छा दिल्या.

**संघ : महिला** : समृध्दी वायकुळे (कर्णधार), कोमल बनसोडे, प्रज्ञा पवार, साक्षी कुदळे, दिशा मोजेकर, पायल दमामी. **पुरुष** : अथर्व देशपांडे (कर्णधार), हर्ष घारगे, सोजल रोकडे, समर्थ कुलकर्णी, अर्शद शेख, अथर्व घाडगे




# आयपीएलची धूमशान २२ मार्चपासून

◆ **नवी दिल्ली, १६ फेब्रुवारी**

इंडियन प्रीमियर लीग चा १८ वा हंगाम रविवार २२ मार्च २०२५ पासून प्रारंभ होणार आहे. भारतीयक्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या आयपीएल हंगामाचे वेळापत्रक जाहीर केले.

गतविजेता कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) २२ मार्च रोजी कोलकाता येथील ईडन गार्डन्स स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूविरुद्ध आपला पहिला सामना खेळणार आहे.

१० संघांची ही लीग ९ मार्च रोजी चॅम्पियन्स चषकाच्या अंतिम सामन्यानंतर १२ दिवसांनी सुरू होणार आहे आणि १२ ठिकाणी सामने खेळले जाणार आहे. यात फ्रॅन्चायझींच्या १० पारंपारिक होम ग्राऊंड्ससह गुवाहाटी (राजस्थान रॉयल्सचे दुसरे ठिकाण) आणि धर्मशाळा (पंजाब किंग्जचे दुसरे ठिकाण) यांचा समावेश आहे. साखळी फेरीत प्रत्येक संघ १४ सामने खेळेल. साखळी फेरीत एकूण ७० सामने असतील. प्ले-ऑफ सामने २० ते २५ मे दरम्यान होतील. क्वॉलिफायर १ व एलिमिनेटर अनुक्रमे २० व २१ मे रोजी हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होतील.

स्पर्धेचा समारोप प्रतिष्ठित ईडन गार्डन्सवर होईल, क्वॉलिफायर २ व अंतिम सामना कोलकाता शहरात होईल. २५ मे रोजी अंतिम सामना होणार आहे.

गत वर्षीच्या अंतिम सामन्यात केकेआरने सनरायझर्स हैदराबादला ८गड्यांनी हरवून तिसरे आयपीएल जेतेपद पटकावले होते. यापूर्वी त्यांनी २०१२ व २०१४ च्या आवृत्ती जिंकल्या होत्या.

रजत पाटीदार यांच्या नेतृत्वाखालील आरसीबीचा पहिला सामना कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सशी होईल व १७ मे रोजी बगळुरू येथे त्यांच्या शेवटच्या लीग सामन्यातही केकेआरशी सामना करेल.

आरसीबी व चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) यांच्यातील सामना २८ मार्च रोजी चेन्नईमध्ये होणार आहे, तर परतीचा सामना ३ मे रोजी बंगळुरूमध्ये होईल.

### आयपीएल २०२५ चे वेळापत्रक

२२ मार्च, सायं. ७.३० वा., कोलकाता- केकेआर वि. आरसीबी
२३ मार्च, दुपारी ३.३० वाजता, हैदराबाद - हैदराबाद वि. राजस्थान
२३ मार्चा, सायं. ७.३० वा., चेन्नई- चेन्नई सुपर वि. मुंबई इंडियन्स
२४ मार्च, सायं. ७.३० वा., विशाषापट्टणम् - दिल्ली वि.लखनौ
२५ मार्च, सायं. ७.३० वा. अहमदाबाद- गुजरात टायटन्स वि. पंजाब
२६ मार्च, सायं. ७.३० वा., गुवाहाटी- राजस्थान वि. कोलकाता
२७ मार्च, सायं. ७.३० वा., हैदराबाद - हैदराबाद वि. लखनौ
२८ मार्च, सायं. ७.३० वा., चेन्नई- चेन्नई वि. आरसीबी
२९ मार्च, सायं. ७.३० व., अहमदाबाद- गुजरात वि. मुंबई
३० मार्च, दुपारी ३.३० वा., विशाखापट्टणम्- दिल्ली वि. हैदराबाद
३० मार्च, सायं. ७.३० वा., गुवाहाटी- राजस्थान वि. चेन्नई
३१ मार्च, सायं. ७.३० वा., मुंबई- मुंबई वि. कोलकाता
१ एप्रिल, सायं. ७.३० वा. लखनौ- लखनौ वि. पंजाब
२ एप्रिल, सायं. ७.३० वा., बंगळुरू- आरसीबी वि. गुजरात
३ एप्रिल, सायं. ७.३० वा., कोलकाता- कोलकाता वि. हैदराबाद
४ एप्रिल, सायं. ७.३० वा., लखनौ- लखनौ वि. मुंबई
५ एप्रिल, दुपारी ३.३० वा., चेन्नई- चेन्नई वि. दिल्ली
५ एप्रिल, सायं. ७.३० वा., नवीन चंदीगड - पंजाब वि. राजस्थान
६ एप्रिल, दुपारी ३.३० वा., कोलकाता- कोलकाता वि. लखनौ
६ एप्रिल, सायं. ७.३० वा., हैदराबाद- हैदरबाद वि. गुजरात
७ एप्रिल, सायं. ७.३० वा., मुंबई-मुंबई वि. आरसीबी
८ एप्रिल, साय. ७.३० वा., नवीन चंदीगड- पंजाब वि. चेन्नई
९ एप्रिल, सायं ७.३० वा., अहमदाबाद - गुजरात वि. राजस्थान
१० एप्रिल, सायं. ७.३० वा., बंगळुरू- आरसीबी वि. दिल्ली
११ एप्रिल, सायं. ७.३० वा., चेन्नई- चेन्नई वि. कोलकाता
१२१ एप्रिल, दुपारी ३.३० वा., लखनौ- लखनौ वि. गुजरात
१२ एप्रिल, सायं. ७.३० वा., हैदराबाद- हैदराबाद वि. पंजाब
१३ एप्रिल, दुपारी ३.३० वा., जयपूर- राजस्थान वि. आरसीबी
१३ एप्रिल, सायं. ७.३० वा., दिल्ली- दिल्ली वि. मुंबई
१४ एप्रिल, सायं. ७.३० वा., लखनौ- लखनौ वि. चेन्नई
१५ एप्रिल, सायं ७.३० वा. नवीन चंदीगड - पंजाब वि. कोलकाता
१६ एप्रिल, सायं. ७.३० वा., दिल्ली- दिल्ली वि. राजस्थान
१७ एप्रिल, सायं. ७.३० वा., मुंबई- मुंबई वि. हैदराबाद
१८ एप्रिल, सायं. ७.३०व वा., बंगळुरू - आरसीबी वि. पंजाब
१९ एप्रिल, दुपारी ३.३० वा, अहमदाबाद- गुजरात वि. दिल्ली
१९ एप्रिल सायं. ७.३० वा., जयपूर- राजस्थान वि,., लखनौ
२० एप्रिल, दुपारी ३.३० वा., नवीन चंदीगड- पंजाब वि. आरसीबी
२० एप्रिल, सायं. ७.३० वा., मुंबई- मुंबई वि. चेन्नई
२१ एप्रिल, सायं. ७.३० वा., कोलकाता - कोलकाता वि. गुजरात
२२ एप्रिल, सायं. ७.३० वा., लखनौ- लखनौ वि. दिल्ली
२३ एप्रिल, सायं. ७.३० वा., हैदराबाद- हैदराबाद वि मुंबी
२४ एप्रिल, सायं ७.३० वा., बंगळुरू- आरसीबी वि. राजस्थान
२५ एप्रिल, सायं. ७.३० वा., चेन्नई- चेन्नई वि. हैदराबाद
२६ एप्रिल, सायं. ७.३० वा., कोलकाता- कोलकाता वि. पंजाब
२७ एप्रिल, दुपारी ३.३० वा., मुंबई - मुंबई वि. लखनौ
२७ एप्रिल, सायं. ७.३० वा., दिल्ली- दिल्ली वि. आरसीबी
२८ एप्रिल, सायं ७.३० वा., जयपूर- राजस्थान वि. गुजरात
२९ एप्रिल, सायं. ७.३० वा, दिल्ली- दिल्ली वि. कोलकाता
३० एप्रिल, सायं. ७.३० वा., चेन्नई- चेन्नई वि . पंजाब
१ मे, सायं. ७.,३० वा., जयपूर- राजस्थान वि. मुंबई
२ मे, सायं. ७.३० वा., अहमदाबाद- गुजरात वि. हैदराबाद
३ मे, सायं. ७.३० वा ., बंगळुरू- आरसीबी वि. चेन्नई
४ मे, दुपारी ३.३० वा., कोलकाता- कोलकाता वि. राजस्थान
५ मे, सायं. ७.३० वा., हैदराबाद- हैदराबागद वि. दिल्ली
६ मे, सायं. ७.३० वा., मुंबई- मुंबई वि. गुजरात
७ मे, सायं. ७.३० वा. कोलकाता- कोलकाता वि. चेन्नई
८ मे, सायं. ७.३० वा., धर्मशाळा- पंजाब वि. दिल्ली
९ मे, सायं ७.३० वा., लखनौ- लखनौ वि. आरसीबी
१० मे, सायं. ७.३० वा., हैदराबाद- हैदराबाद वि. कोलकाता
११ मे, दुपारी ३.३० वा., धर्मशाळा- पंजाब वि. मुंबई
११ मे, सायं. ७.३० वा., दिल्ली - दिल्ली वि. गुजरात
१२ मे, सायं. ७.३० वा., चेन्नई- चेन्नई वि. राजस्थान
१३ मे., सायं. ७.३० वा., बंगळुरू- आरसीबी वि. हैदराबाद
१४ मे, सायं. ७.३० वा., अहमदाबाद - गुजरात वि. लखनौ
१५ मे, सायं. ७.३० वा., मुंबई - मुंबई वि. दिल्ली
१६ मे, सायं. ७.३० वा., जयपूर- राजस्थान वि,. पंजाब
१७ मे. सायं. ७.३० वा., बंगळुरू- आरसीबी वि. कोलकाता
१८ मे, दुपारी ३.३० वा., अहमदाबाद- गुजरात वि. चेन्नई
१८ मे, सायं. ७.३० वा., लखनौ- लखनौ वि. हैदराबाद
२० मे, सायं. ७.३० वा, हैदराबाद- पात्रता-१ सामना
२१ मे, सायं. ७.३० वा., हैदराबाद- एलिमिनेटर सामना
२३ मे, सायं. ७.३० वा., कोलकाता- पात्रता-२ सामना
२५ मे, सायं. ७.३० वा,. कोलकाता- अंतिम सामना

## संक्षिप्त वृत्त



### सिद्धाराम पाटील यांचा तरुण भारत माजी कर्मचाऱ्यांतर्फे सत्कार

**सोलापूर. दि. १७ फेब्रुवारी-**

दै.सकाळच्या सोलापूर आवृत्तीच्या सहयोगी संपादकपदी नियुक्ती झाल्याबद्दल तरुण माजी कर्मचाऱ्यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. रविवारी सकाळी शिवछत्रपती रंगभवन सभागृहात झालेल्या कार्यक्रमात तरुण भारतचे चेअरमन व ज्येष्ठ निरुपणकार विवेकजी घळसासी यांच्या हस्ते शाल व नॅपकिन बुके देवून पाटील यांना सन्मानित करण्यात आला. याप्रसंगी माजी संपादक नारायण कारंजकर कर्मचारी समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर म्याकल, कार्याध्यक्ष दशरथ वडतिले व सचिव रमेश बसाटे हे उपस्थित होते. सर्वांनी सिद्धाराम पाटील यांना पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.



### स्वच्छतेमुळे व्यक्तीमत्व उठून दिसते : प्रकल्प संचालक डॉ. ठोंबरे

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

स्वच्छतेमुळे व्यक्तीमत्व उठून दिसते. स्वतः मध्ये बदल करण्याचा संकल्प करा. स्वच्छता ही सेवा माना असे मत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांनी केले. मुख्यमंत्री महोदयांच्या शंभर दिवसीय कृती आराखडा व सात कलमी कार्यक्रमांमध्ये कार्यालयीन स्वच्छता, अभिलेख वर्गीकरण व जुन्या वापरात नसलेल्या वस्तूंचे निर्लेखनबाबत विशेष सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आज जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा येथे मोहीम राबविण्यात आली यावेळी डॉ. सुधीर ठोंबरे बोलत होते. याप्रसंगी सहाय्यक प्रकल्प अधिकारी रतीलाल साळुंखे, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, विस्तार अधिकारी सराफ, कार्यालयीन अधीक्षक लोखंडे, जिल्हा व्यवस्थापक दयानंद सरवळे, मीनाक्षी मडीवली, अनिता माने, प्रमिला बचुटे उपस्थित होते. यावेळी सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सदर मोहिमेत दोन तास श्रमदान करून कार्यालयीन परिचर स्वच्छता केली.

### दहावी, बारावी परीक्षा तणावमुक्तीसाठी समुपदेशकांची नियुक्ती

**सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी व बारावी परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. पुणे मंडळस्तरावर इयत्ता दहावीसाठी ९४२३०४२६२७ तर इयत्ता बारावीसाठी ७०३८७५२९७२ ही हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना व पालकांना काही समस्या असल्यास भ्रमणध्वनीवर सकाळी ८.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत संपर्क साधावा, असे आवाहन पुणे विभागीय महामंडळ, विभागीय सचिव औदुंबर उकिरडे यांनी केले आहे.

**भयमुक्त- तणावमुक्तीसाठी समुपदेशकांची नियुक्ती**

माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु- मार्च २०२५ या भयमुक्त व तणावमुक्त होवून परीक्षेस सामोरे जाणे आवश्यक आहे. यासंदर्भात विद्यार्थी-पालकांसाठी समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार पुढीलप्रमाणे समुपदेशकांशी संपर्क करता येईल. सोलापूर जिल्ह्यासाठी समुपदेशकाचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत. वृषाली आठवले (भ्रमणध्वनी क्र- ९८३४०८४५९३), मीनाक्षी हिरेमठ (भ्रमणध्वनी क्र - ८३२९२३००२२), संगीता सपकाळ (भ्रमणध्वनी क्र. ९५५२९८२११५).

### बार्शी येथील शिवसृष्टीमध्ये शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शन

**बार्शी, दि. १६ फेब्रुवारी-**

येथील शिवसृष्टीमध्ये शिवजन्मोत्सवानिमित्त एकविराई मर्दानी आखाड्याच्यावतीने शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवकालीन शस्त्रांच्या माहितीचा ऐतिहासिक खजिना शिवसृष्टी बार्शी या ठिकाणी पाहावयास मिळणार आहे. शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन दि. १७ व १८ फेब्रुवारीपर्यंत, सकाळी १० ते सायंकाळी १० वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले रहाणार असून, शिवप्रेमी व लहान मुला- मुलींनी याचा लाभ येण्याचे आवाहन शिवकालीन शस्त्र संग्राहक शिवश्री माधवराव देशमुख यांनी केले आहे.

### इंडिया एनर्जी वीक २०२५ मध्ये सादर केले तंत्रज्ञान

**सोलापूर दि. १५ फेब्रुवारी-**

ऊर्जा स्वावलंबन आणि २०७० पर्यंत नेट झिरो म्हणजेच शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याच्या भारताच्या दृष्टिकोनाशी आपली वचनबद्धता दृढ करत,टोयोटा किर्लोस्कर मोटरने आज इंडिया एनर्जी वीक २०२५ मध्ये भाग घेतला.

इंडिया एनर्जी वीक (आयईडब्ल्यू) २०२५ हे स्वच्छ ऊर्जा उपाय सादर करण्यासाठी आणि ऊर्जा स्वावलंबन तसेच कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे व्यासपीठ आहे.गव्हर्नन्स विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष विक्रम गुलाटी यांनी कार्यक्रमादरम्यान सांगितले की ''इंडिया एनर्जी वीक हे ऊर्जा,गतिशीलता आणि तंत्रज्ञानआधारित कंपन्यांना एकत्र आणण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज हे पूर्ण देशाला मार्गदर्शन करणारे जाणता राजा

**शहर पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांचे प्रतिपादन**



**सोलापूर दिनांक १७**

येथील छत्रपती शिवाजी प्रशालेत शिवजयंती निमित्त छत्रपती शिवरायांच्या सिंहासनाधीष्ट मूर्तीची शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार व व्याख्याते केदारनाथ फाळके यांच्या हस्ते शिवतीर्थवर प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर समृद्धी अनिल शिंदे या मुलीने शिवगर्जना केली.

छत्रपती शिवजन्मोत्सव व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पाचे उद्घाटन करतेवेळी पोलीस आयुक्त एम राजकुमार म्हणाले की, पूर्ण देशाला मार्गदर्शन करणारे जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सर्वांनी आपल्या डोक्यात घ्यायला पाहिजे. मराठा सेवा मंडळाने हे अत्यंत चांगल्या प्रकाराची व्याख्यानमाला राबविते याचा सार्थ अभिमान आहे. तसेच पुढे बोलताना ते म्हणाले की आपल्या पाल्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण देऊन मोठे करावे असे आव्हान त्यांनी केले.

प्रमुख वक्ते डॉ केदारनाथ फाळके म्हणाले की, अज्ञान पत्र म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे राजनीती विषयक विचार होता. चारित्र्यसंपन्न समाज निर्माण करणारे छत्रपतींचे कार्य उल्लेखनीय आहे. प्रजेचे कल्याण करणे हे छत्रपती शिवाजी महाराजांचे महत्त्वाचे असे कार्य आहे. मुघल आले तर आपल्या प्रजेला नाहक त्रास होईल. त्यांच्या रक्षणासाठी आपल्याकडे मजबूत ६० किल्ले आहेत. माझ्या भूमीचे संरक्षण करणे हे माझे आद्य कर्तव्य आहे. असे त्यांनी पत्रात नमूद केले आहेत.

पुढे बोलताना ते म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळी जनतेसाठी लाभदायी निर्णय घेतले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालावधीत त्यांनी शेतकऱ्यांना पंगू बनवले नाही तर त्यांनी त्यांना पायावर उभे राहण्याचे धैर्य दिले. छत्रपती शिवाजी महाराज अचूक बोलत असत. त्यांचे राज्यातील रयतेसाठीचे सर्व निर्णय अचूक असते. असा उल्लेख त्यांनी वेगवेगळे संदर्भ देऊन केला. यावेळी विनायक पाटील, नामदेव थोरात,रेखा सपाटे, सुनिता साळुंखे, शिवदास चटके, ज्ञानेश्वर सपाटे, डॉ. मधुकर पवार, तानाजी माने, सुजाता जुगदार, जयश्री साठे, मंजुश्री पाटील, उषा गोकळे, महानंदा सोलापुरे,दत्ता भोसले, आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केले. प्रा. महेश माने यांनी आभार मानले.



## खरा योग हा कवायतींच्या पलीकडे

**योग-आहार विहार संस्कार या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी विवेक घळसासी यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

शरीर स्वास्थ्यासाठी योग हा योगाचा प्राथमिक स्तरावरील उपयोग आहे. खरा योग हा कवायतींच्या पलीकडे आहे. तो जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करतो. हीच बाब योग - आहार विहार संस्कार या पुस्तकामध्ये समग्रपणे आणि सोप्या भाषेत मांडण्यात आल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांनी केले. जटायु अक्षरसेवा प्रकाशन संस्थेच्या वतीने श्री शिवछत्रपती रंगभवन येथे आयोजित पुस्तक प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर लेखक धनंजय सूर्यवंशी व स्नेहल पेंडसे, जटायुचे संपादक ड. मंजुनाथ कक्कळमेली, प्रा. टिंकेश ग्यामलानी, अश्विनी चव्हाण, सुजय निकते यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दुर्वांकुर योग संस्थेच्या विद्यार्थ्यांनी योगासनांची संगीतमय प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी योगदीप या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचेही प्रकाशन करण्यात आले. यावेळी विविध योग संस्थांचे कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी चव्हाण यांनी केले तर आभार प्रगती बाळी यांनी मानले.

**आसन, प्राणायाम हे अगदी वरवरचे...**

स्वामी रामदेव यांनी योगाच्या माध्यमातून फार मोठी जागृती आणली. यामुळे अनेकांना योग, प्राणायाम करावं वाटतं हे चांगलंच आहे. पण आसन प्राणायाम हे अगदी वरवरचे आहे हेही तेवढेच खरे. सूर्यनमस्कार हा थोडा पुढचा भाग झाला. योगशास्त्र हे संपूर्ण मानवी जीवनाचे विज्ञान आहे. त्याचा यशस्वी मागोवा या पुस्तकात घेण्यात आला आहे.

**अवघड विषय सोपा केला...**

घळसासी म्हणाले, योगी अरविंद यांच्या नुसार संपूर्ण जीवन हे योगच आहे. जसे अन्न तसे मन. जसे मन तसे व्यवहार. जसे व्यवहार तसे संस्कार. योगशास्त्र म्हणजे केवळ योगासने नाहीत. वेद उपनिषद ते ओंकार साधनेपर्यंत आणि जीवनाच्या निरामयतेसाठी असणाऱ्या आरोग्याच्या प्रत्येक पैलूपासून ते आहार विहारापर्यंतचे सर्व पैलू महत्वाचे आहेत. योगशास्त्राचा अवघड विषय लेखकांनी तीस वर्षांच्या अनुभवामुळे अतिशय सोपा केला आहे.

## रमाई आवासच्या जागेची अट रद्दसाठी पाठपुरावा करणार



**आ. विजयकुमार देशमुख यांनी घेतली महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

रमाई आवास योजनेत २८० चौरस फुट जागेच्या अटीमुळे अनेक अर्जदारांना वंचित रहावे लागत आहे. यामुळे ही अट शिथिल करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार आहे. जास्तीत जास्त लोकांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती भाजपचे आ. विजयकुमार देशमुख यांनी दिली.

सोलापूर शहरात रमाई आवास योजनेच्या लाभासाठी मोठ्या प्रमाणात अर्ज करण्यात आले आहेत मात्र अत्यंत कमी लाभार्थ्यांचे अर्ज महापालिका प्रशासनाने मंजूर केले आहे. या योजनेसाठी किमान २८० चौरस फूट जागा आवश्यक आहे मात्र इतकी जागा झोपडपट्टी व वस्त्यांमध्ये उपलब्ध नाही. तसेच खाजगी मालकीच्या वस्त्यांमध्येही घरकुल मंजूर होत नाही. यामुळे अनेकांना या योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. संबंधितांमध्ये नाराजीच्या सुर उमटत आहे. या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्याने आ. विजयकुमार देशमुख यांनी त्यांच्या कार्यालयात आज दुपारी महापालिकेच्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी महापालिकेचे उपअभियंता अविनाश वाघमारे, प्रकाश दिवाणजी, किशोर सातपुते आदींसह अधिकारी तसेच माजी नगरसेवक प्रा. नारायण बनसोडे, अजित गायकवाड , अजित गादेकर, गौतम कसबे, पिंटू डावरे, संजय बनसोडे, प्रमोद चंदनशिवे, अमोल सोनवणे आदी उपस्थित होते. या बैठकीत रमाई आवास योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे इतर अडचणी यावर चर्चा करण्यात आली. योजनेच्या अंमलबजावणीतील नियम व अडचणी अधिकाऱ्यांनी सांगितल्या. आ. देशमुख यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर मधील बस डेपो येथून जाणाऱ्या रस्त्यासंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या.

## आपले सरकार केंद्र व सेतू कार्यालयावर आता करडी नजर

- अधिकचे पैसे मागितल्यास क्यूआर कोडवर तक्रार नोंदवण्याची सुविधा
- क्विक रिस्पॉन्स कोडवर आठ तक्रारी प्राप्त; चौकशी करून जिल्हाधिकारी करणार कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

जिल्ह्यातील नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना लागणारे विविध प्रकारचे दाखले उतारे व अन्य प्रमाणपत्रे ऑनलाईन पध्दतीने आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयातून दिले जातात. परंतु बऱ्याचदा आपले सरकार केंद्र अथवा सेतू कार्यालयात विविध दाखले, उतारे व प्रमाणपत्रे काढण्यासाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांना मध्यस्थ व्यक्तीकडून शासनाने विहित केलेल्या रकमेपेक्षा अधिकच्या रक्कमेची मागणी करण्यात येत असल्याची वरिष्ठ अधिकारी वरिष्ठ यांच्याकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

त्यामुळे सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्वसामान्य नागरिकांना मध्यस्थ व्यक्ती (एजंट) यांच्याकडून पैशाची मागणी होऊ नये अथवा झाल्यास तात्काळ तक्रार करता यावी यासाठी प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयात दर्शनी भागात क्यू आर कोड उपलब्ध करून देण्यात येत आहे. संबंधित नागरिकांनी हा किंवा कोड स्कॅन करून यावर तक्रार नोंदवण्याची सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, यावरील तक्रारीची तात्काळ दखल घेऊन त्यासंबंधी कारवाई करण्यात येणार आहे.

हा क्यु आर कोड सोलापूर जिल्ह्यातील सर्व सीएससी सेंटर तसेच सेतू कार्यालय, तहसील कार्यालय आणि प्रांताधिकाऱ्यांच्या कार्यालयात लावण्यात आले आहेत. यामध्ये केंद्रचालकांनी दाखल्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिकची रक्कम मागणी केल्यास, दाखला विहीत मुदतीत दिला नाही अथवा विलंब केला तर, दाखल्या संदर्भात संबधिताला एसएमएस व्दारे




माहिती न दिल्यास, एजंटाव्दारे संबधित नागरिकांकडे अधिकचे पैसे मागणी केल्यास अशा कोणत्याही प्रकारच्या तक्रारी असल्यास नागरिकांनी यावर दिलेला क्यु आर कोड स्कॅन केल्यास त्यावर तात्काळ आपली तक्रार नोंदविली जाते. तसेच आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तातडीने चौकशी करुन पुढील कार्यवाही केली जाते. त्यामुळे नागरिकांना कोणाला भेटण्याची अथवा अधिकचे पैसे देण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे नागरिकांनी जर असे प्रकार कोठे घडत असतील तर जिल्हा प्रशासनाने क्यू आर कोड स्कॅन करून तक्रार नोंदवणीच्या दिलेल्या अद्यावत सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे, आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

**क्यू.आर. कोडवर आठ तक्रारी प्राप्त**

हा क्यु आर कोड कोणत्याही मोबाईल ॲपवरून स्कॅन करून नागरिकांना सुलभरित्या तक्रार नोंदविण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. आज दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजीपर्यंत एकुण ८ तक्रारी क्यु आर कोडद्वारे नोंदविल्या गेलेल्या आहेत. या तक्रारीमधील १ तक्रारीबाबत अर्जदार यांना कळविणेत आले आहे. उर्वरीत प्रकरणांबाबत चौकशी अहवाल प्राप्त करून तक्रारीत तथ्य आढळून आल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

**कोठून आल्या नागरिकांच्या तक्रारी**

उत्तर सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, पंढरपूर, माढा, या तहसिल कार्यालयांकडे प्रत्येकी एक तक्रार अर्ज प्राप्त झाला असून, तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूरकडे एक अर्ज प्राप्त झाला आहे. तक्रार अर्ज हा आपले सरकार सेवा केंद्राच्या सेवाबाबत संबंधित नसल्याने सदरचा तक्रार अर्ज तहसिलदार दक्षिण सोलापूर यांना पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. व तहसिल कार्यालय बार्शी कार्यालयाकडे २ अर्ज असे एकूण आठ अर्ज प्राप्त झाले असल्याचे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## कर्मचाऱ्यांचा लढवय्या नेता हरपला

**लिंगराज यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

शनिवारी रात्री बल्करच्या अपघातात हैद्राबाद रस्त्यावर जिल्हा परीषदेचे प्रशासन अधिकारी विवेक लिंगराज यांचा दुर्दैवी निधन झाले. या अपघातामुळे जिल्हा परीषदेतील अधिकारी,कर्मचार्यांसहसर्वपक्षीय नेत्यांमधून हळहळ व्यक्त करून लिंगराज यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आले. रविवारी सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंतिमसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी लिंगराज यांच्या स्वभावासह त्यांच्या प्रशासकीय कामकाजातील आठवणींना उजाळा दिला. त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



जिल्हा परिषद आवारात लिंगराज यांनी झाडे लावून निसर्गसौंदर्य वाढविण्याचा प्रयत्न केला. कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक प्रश्न व अडचणीवर प्रशासन आणि सरकारशी भांडणारा कर्मचारी नेता, प्रसार माध्यमांचा चांगला मित्र, सर्व अधिकाऱ्यांच्या आवडता कर्मचारी म्हणून लिंगराज यांची ओळख होती. जिल्हा परीषदेत अधिकारी, कर्मचारी व पत्रकारांच्या वाढदिवसानिमित्त एक वृक्ष देऊन लिंगराज सत्कार करायचे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे निकटचे स्नेही होते. तसेच अधिकारी व कर्मचार्यांवर अन्याय झाल्यास निषेध करण्यात लिंगराज अग्रेसर असायचे. ते जिल्हा परिषद कर्मचारी युनियन महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस होते. जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था क्रमांक एक ताब्यात ठेऊन त्या माध्यमातून गरजू कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी पुढाकार घ्यायचे. ते जिल्हा परिषद कृषी विकास कार्यालयात कक्ष अधिकारीम्हणूनकार्यरत होते. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था क्रमांक एकचे त्यांनी अनेक वर्षे अध्यक्षपद सांभाळले. संस्थेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना आर्थिक सक्षम करण्यासह संस्थेचा कारभार पारदर्शी करण्याचे प्रयत्न केले. जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या माध्यमातून ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदसह राज्यस्तरावर त्यांनी कर्मचारी संघटनेची एक सक्षम बांधणी केली होती. मात्र त्यांच्या अपघाती निधनाबद्दल कर्मचार्यांसह अधिकारी वर्गातून शोक व्यक्त करण्यात आला.

**अतिशय धक्कादायक**

विवेक लिंगराज यांचे अपघाती निधन दुःख देणारी घटना आहे. लिंगराज यांचे धाडसी स्वभाव, प्रामाणिकपणा, कामासाठी एकाग्रता, कणखरपणा, स्वार्थ न ठेवता प्रत्येकाशी प्रेमाचे स्वभाव, सर्वांची काळजी घेण्याची मानसिकता, कुशल संघटक, चांगला वक्ता व कर्मचाऱ्यांचा आधारस्तंभ यामुळे लिंगराज कायमच स्मरणात राहतील.

**- दिलीप स्वामी, तत्कालीन सीईओ तथा जिल्हाधिकारी,**
छत्रपती संभाजीनगर

## १० कोटी ८३ लाखांच्या जी.एस.टी प्रकरणी व्यापारी लड्डा बंधूंना जामीन मंजूर

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

येथील व्यापारी एस. आर. एल. कंपनीचे संचालक श्रीकांत सुरेंद्रकुमार लड्डा व लक्ष्मीकांत सुरेंद्रकुमार लड्डा यांना १०.८३ कोटीच्या जी.एस.टी. प्रकरणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री जे. जे. मोहिते यांनी सशर्त जामीन मंजूर केला.

याची हकीकत अशी की, एस.आर.एल.इंडिया लिमिटेड कंपनीचे संचालक श्रीकांत लड्डा व लक्ष्मीकांत लड्डा यांना दिनांक ०८जानेवारी २०२५ रोजी जी.एस.टी. कार्यालय यांनी १०.८३ कोटीच्या आय. टी. सी (जी.एस.टी) प्रकरणी अटक केली होती. यीकामी व्यापारी लड्डा बंधू यांनी येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. या जामीन अर्जाची सुनावणी कोर्टासमोर झाली. यासुनावणीवेळी आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, लड्डा बंधू हे प्रतिष्ठित व प्रामाणिक व्यापारी आहेत, त्यांच्या संपूर्ण व्यवहार पारदर्शी आहे जीएसटी कार्यालयाने ७५ बॉक्स फाइल्स जप्त केलेल्या आहेत. लड्डा बंधुची ५ कोटींची मालमत्ता जप्त केलेली आहे. जेलमध्ये ठेवण्यासारखी कोणतीही परिस्तिथी नाही, ते कुठेही पळून जाणार नाहीत, तसेच तपासकामी सहकार्य करण्यास तयार आहेत, असा युक्तिवाद सदर सुनावणी वेळी कोर्टासमोर करण्यात आला. युक्तिवाद व न्यायनीवडे विचारात घेऊन कोर्टाने सोमवार ते शुक्रवार सकाळी ११ ते २ पर्यंत जी.एस.टी. कार्यालय येथे हजेरी लावणे, तसेच पासपोर्ट जी. एस. टी कार्यालयाकडे जमा करणे अशा अटींवर आरोपींचा जामीन अर्ज मंजूर केला. लड्डा बंधू यांच्यातर्फे ॲड. शशी कुलकर्णी, गुरुदत्त बोरगावकर, देवदत्त बोरगावकर, विश्वास शिंदे तसेच सरकारतर्फे महेश झंवर यांनी काम पाहिले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक **:प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : अक्कलकोट रोड परिसरात शासकीय तंत्रनिकेतनजवळील मॉर्निंग ट्रॅकवरील दिवाबत्ती लवकर सुरु करावी आणि तो ट्रॅक नागरिकांसाठी खुला करावा, अशी मागणी नागरिकातून होत आहे.
(छायाचित्र : केवल तिवारी)



## संक्षिप्त वृत्त...

### द्वारकादीश प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षपदी अॅड. राजन दीक्षित



**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-** येथील सोनार समाजाचे प्रणेते अॅड. राजन दीक्षित यांची नागपूर येथील द्वारकादीश प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली. पुणे येथे झालेल्या सभेत नागपूर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अंजली अनासणे यांनी त्यांची निवड केली. प्रतिष्ठानद्वारे विविध सामाजिक, शैक्षणिक व अध्यात्मिक उपक्रम गेल्या १० वर्षापासून राबविले जातात. पंढरपूर येथे संत नरहरी महाराज यांचे नावे भवन, विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व गरजू विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याचे श्री. दीक्षित यांनी सांगितले.

### परीक्षा कालावधीत इलेक्ट्रीक उपकरण वापरास बंदी

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-** इयत्ता १२ वी ची परीक्षा दि.११ फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान घेण्यात येत आहे. परीक्षांचे संचालन सुयोग्य प्रकारे व्हावे यासाठी परीक्षा कालावधीत सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळात पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर हद्दीचे कार्यक्षेत्रातील सर्व परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहे. हा आदेश परीक्षा प्रक्रियेशी संबंधीत सर्व शासकीय अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवृंद, परीक्षार्थी, पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, होमगार्ड यांना त्यांचे परीक्षेसबंधी कर्तव्य पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाही. हा आदेश १८ मार्च या कालावधीत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ९ ते सायं. ६ वाजेपर्यंत सर्व परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परीसरात लागू राहील.

### सोमनाग प्रशालेतील श्रावणी दासरी सर्वोत्कृष्ठ विद्यार्थी

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-** अक्कलकोट रोडवरील सोमनाग प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी प्रशालेतील सर्वोत्कृष्ठ विद्यार्थ्यांचा पुरस्कार श्रावणी दासरी हिला देण्यात आला. मुख्याध्यापक शहाजी नीळ, प्रा. डॉ. भीम ाशंकर बिराजदार, संस्थाध्यक्ष शंकर चौगुले, सचिव शारदा चौगुले, महात्मा विद्यामंदीरच्या मुख्याध्यापिका सविता गायकवाड, सदस्य नागराज चौगुले यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला.

सावित्रीबाई फुलेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी बोर्डाच्या परीक्षेच्यावेळी घ्यायची काळजी व परीक्षेचे बदलते स्वरूप यावर मुख्याध्यापक नीळ यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. सौ. गायकवाड यांनी जीवनात शिक्षकांचे महत्व हे सांगितले.

# रणरागिणींच्या शिवशोभा बुलेट यात्रेने वेधले लक्ष

## शिवजयंतीनिमित्त पारंपरिक वेशभूषा, भगवे फेटे परिधान करून महिलांची बाईक रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**
जाणता राजा हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दृष्टीक्षेपात आली आहे. यंदा जयंतीचे औचित्य साधून श्रीशिवजन्मोत्सव म ध्यवर्ती महामंडळाच्या वतीने यंदाच्या वर्षी पहिल्यांदाच उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांच्या संकल्पनेतून शिवशोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

रविवारी सकाळी दहा वाजता छत्रपती संभाजी महाराज चौकात पारंपरिक वेशभूषेत महिला दुचाकीसह शोभायात्रेत सहभागी होण्यासाठी जमू जमल्या. यावेळी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने महिलांना भगवे फेटे बांधण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजी महाराज चौक येथील संभाजी महाराजांचे पूजन करून शिभयात्रेस सुरुवात करण्यात आली, ही यात्रा छत्रपती संभाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेकॅनिक चौक, नवी पेठ, राजवाडे चौक, चौपाड, मार्गे डाळींबी आड शिंदे चौक पर्यंत काढण्यात आली. शिवजयंतीनिमि त्त महिलाची पारंपरिक वेशभूषेत आणि भगवे फेटे परिधान करून बाईक रॅली पहिल्यांदाच निघाल्याने बघ्यांची मोठी गर्दी झाली होती,

दरम्यान, शोभायात्रा शिंदे चौक येथे समाप्त झाल्यानंतर शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या शिवमूर्तीची आरती महिलांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी महिलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष केला. यंदाच्या वर्षी शिवजयंती निमि त्त पहिल्यांदाच अशी शोभायात्रा निघाल्याने महिलांनी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ आणि उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांचे आभार मानले. आणि प्रत्येक वर्षी अशीच शोभायात्रा काढण्यात यावी अशी इच्छा व्यक्त केली. शोभयात्रेचे पहिलेच वर्ष असून म हिलांनी मोठया प्रमाणात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्याने उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांनी सर्वांचे आभार मानले.



### महिला पोलिसांचा सन्मान

शिवशोभायात्रेत शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाने बंदोबस्त साठी असलेल्या म हिला पोलिसांचा देखील फेटा बांधून सन्मान केला. त्याच प्रमाणे शिवशोभा यात्रेत पारंपारिक वेशभूषा परिधान केलेल्या महिलांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. प्रथम द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहे.

> छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती घराघरात साजरी केली जावी. महाराजांचे विचार घरा घरात पोहोचणे आवश्यक आहे. या माध्यमातून बालकांना शिकवण द्यावी.
>
> **- उज्वला साळुंखे**

> छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त यंदा प्रथमच महिलांची शिवशोभा यात्रा काढण्यात आली. त्यामध्ये महिलांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. दरवर्षी सदरची शिवशोभा यात्रेचे आयोजन करण्यात यावे.
>
> **- चारुशीला जगदाळे**

यावेळी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर नाना काळे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, राजन जाधव, पुरुषोत्तम बरडे,लहू गायकवाड, प्रकाश ननवरे, अंबादास शेळके, बाळासाहेब पुणेकर, महेश हनमे, सचिन स्वामी, जेलपेश घुले, देविदास घुले, बसवराज कोळी, तुषार गायकवाड, कृष्णा बुरळे सोमनाथ बनसोडे, राहुल मुद्दे, सिद्धाराम पाटील, मनीष अलकुंटे, शुभम अलकुंटे यांच्यासह शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूरच्या कन्येची गगनभरारी

## प्रा. डॉ. दिप्ती जाधव यांच्या संशोधनाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल

### लंडन येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत होणार शोधनिबंध सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**
प्रा. डॉ. दिप्ती शैलेंद्र जाधव यांच्या आर्टिफिशीअल इंटेलिजेंस क्षेत्रातील संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे.



लंडन येथे दि.१८ फेब्रुवारीपासून सुरु होत असलेल्या १० व्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये दिप्ती जाधव यांच्या 'टू स्टेजड् इंटेलिजेंट व्हिडीओ समरी बेस्ड ऑन डिक्शनरी लर्निंग अँड मल्टि ऑब्जेक्टीव जेनेटीक ॲल्गोरिदम हा शोध निबंध सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. प्रा. डॉ. दिप्ती जाधव यांचे प्राथमिक शिक्षण सेंट जोसेफ हायस्कूल सोलापूर तर महाविद्यालयीन शिक्षण संगमेश्वर महाविद्यालय व अभियांत्रिकी शिक्षण वॉलचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे झाले.

प्रा. दिप्ती जाधव या मागील पिढीतील ज्येष्ठ विधिज्ञ कै. अण्णासाहेब माने यांची नात तर ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय माने व रेखा माने यांच्या कन्या व विधिज्ञ जयदीप माने यांच्या भगिनी आहेत. सध्या त्या डी. वाय. पाटील विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई येथे गेल्या २० वर्षांपासून प्राध्यापक म्हणून काम पाहत आहेत. या यशाबद्दल प्रा. डॉ. दिप्ती जाधव यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# इलेक्ट्रो प्रदर्शनास केंद्रीय मदतीकरीता प्रस्ताव पाठवणार : खा. प्रणिती शिंदे यांचे आश्वासन

### ग्राहकांचा उत्सफूर्त प्रतिसाद; मंगळवारपर्यंत प्रदर्शन सुरू राहणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी**
गेल्या पंचवीस वर्षापासून शहरांमध्ये उत्तम रीत्या इलेक्ट्रो प्रदर्शनाचे आयोजन केले जात आहे. याप्रदर्शनाकरिता केंद्राच्या माध्यमातून इतर प्रदर्शनाला जसा निधी दिला जातो. त्याच धर्तीवर इलेक्ट्रो प्रदर्शनाकरिताही मदत देण्याकरिता आपण प्रस्ताव पाठविणार असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

इलेक्ट्रो २०२५ होम मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनाला खासदार शिंदे यांनी भेट दिली. केतन शहा यांनी केंद्रीय मदतीबाबत खासदार शिंदे यांच्याकडे मागणी केली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. खासदार शिंदे यांनी विविध स्टॉलला भेटी देऊन इलेक्ट्रो प्रदर्शनाची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत मनोज यलगुलवार, तिरुपती परकीपंडला आदी उपस्थित होते. यावेळी खासदार शिंदे यांचा सत्कार सेडाचे अध्यक्ष आनंद येमूल यांच्या हस्ते करण्यात आला.



होम मैदानावर सुरु असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स, होम ॲप्लायन्सेस, कॉम्प्यूटर, टेलिकम्युनिकेशन, सोलार उत्पादन व फिटनेस इक्विपमेंटसचे प्रदर्शन सकाळी ११ ते रा. ९.३० पर्यंत असणार असून ग्राहकांनी याचा अधिकाधिक फायदा घ्यावा असे आवाहन श्री येमूल यांनी केले आहे.

यंदा इलेक्ट्रो प्रदर्शनाचे शार्प हे मुख्य प्रायोजक असून हायफा इलेक्ट्रिकल्स् व एमआयटी विश्वशांती गुरुकुल हे सहप्रायोजक आहेत. या प्रदर्शनाचे हे २५ वे वर्ष असून जर्मन हॅंगर पध्दतीचे डोम सोलापूरकरांचे आकर्षण ठरले आहे. ३०० स्टॉलधारकांचा समावेश असलेल्या या प्रदर्शनात भेट देणाऱ्यांसाठी दररोज लकी ड्रॉद्वारे विविध भेट वस्तु देण्यात येत असून शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ द्वारे सुमारे एकावन्न हजार किंमतीचे आयएफबी कंपनीचे किचन चिमणी भेट देण्यात येणार असल्याची माहिती सचिव भुषण भुतडा यांनी दिली. पाच दिवसांत सुमारे साठ हजार लोकांनी भेट दिली असल्याचे सांगण्यात आले. सेल्फी पॉईंट वर अनेक जण आपले छायाचित्र काढताना दिसत आहे. याचे संपूर्ण निटनेटके नियोजन सेडा समितीद्वारा करण्यात येत आहे.याप्रसंगी इलेकट्रो चेअरमन दीपक मुनोत, सचिव भूषण भुतडा, खजिनदार सुयोग कालानी, सहसचिव हरीष कुकरेजा, उपाध्यक्ष डॉ.सूरजरतन धुत व संचालक सर्वश्री यल्लप्पा भोसले, चंद्रकांत शाहपुरे, बसवराज नवले, रवींद्र पाचलगे, संस्थेचे माजी अध्यक्ष जितेंद्र राठी, शिवप्रकाश चव्हाण, खुशाल देढीया, ईश्वर मालू, बिपीन कुलकर्णी आदी उपस्थित होते.



### डब्लिंग युनिटला लागलेल्या आगीत ७० लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**
अक्कलकोट रोड एमआयडीसीनजीकच्या पद्मशालीनगरातील एका यंत्रमाग कारखान्यातील डब्लिंग युनिटला लागलेल्या आगीत सुमारे ७० लाखांचे नुकसान झाले.

पद्मशाली नगरात श्रुतिका आदित्य विडप यांच्या मालकीचे श्रुतिका इंडस्ट्रीज या नावाने तसेच प्रभाकर लक्ष्मण विडप यांचा स्वतःच्याच नावाने यंत्रमाग उद्योग आहे. शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास या कारखान्यातील डब्लिंग युनिटला ही आग लागली. या आगीत टीएफओ डब्लिंग मशीन, कच्चामाल, पक्का माल आदी जळाले. दरम्यान, आग लागताच अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. या दलाच्या बंबांनी तसेच खाजगी टँकरची मदत घेऊन ही आग विझवण्यात आली. या आगीत सुमारे ७० लाखांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

# सोलापूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर तिहेरी विचित्र अपघात

### सुदैवाने कोणतीही जिवीतहानी नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**
सोलापूर ते तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे दि. १५ फेब्रुवारी रोजी दु. ४ वाजणेच्या सुमारास विचित्र असा तिहेरी अपघात घडला. दरम्यान, सुदैवाने कोणतीही जिवीतहानी नाही. दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावरील रुग्णवाहिकेच्या मदतीने जखमींना सोलापूर येथील रुग्णालयात उपचारासाठी तत्काळ दाखल करण्यात आले आहे.

याबाबतचे अधिक वृत्त असे की, एक इनोव्हा कार सोलापूरकडून वेगात आली आणि संरक्षण कठडा तोडून विरुद्ध दिशेला जाऊन दोन गाड्यांना धडकुन हा अपघात घडला. धुळे सोलापूर राष्ट्रीय राजमार्ग क्रं ५२ वरती तुळजापूर तालुक्यातील तामलवाडीकडून क्रुझर गाडी क्रं.के ए ३२ पी ८८६४ ही आपल्या रस्त्याने सोलापूरकडे जात होती. याचवेळी तुळजापूरकडे जाणारी इनोव्हा ही कार क्रं.एम एच १३ ए झेड १४१३ ही वेगाने राष्ट्रीय महामार्गाचे संरक्षण कठड्यावरुन पलीकडे जाणाऱ्या क्रुझरला जोरात धडकली.



ही धडक एवढी जोरात होती की, क्रुझर गाडीची मागील बाजुची दोन्ही चाके तुटुन क्रुझर जवळपास शंभर मीटर घासत गेली. लागलीच क्रुझरच्या पाठीमागे असलेली वॅगनर कार क्रं. एम एच २० एफ जी ३०५७ या गाडीवर जाऊन ही इनेव्हा गाडी आदळली. एका इनेव्हा कारने महामार्गावरच्या संरक्षण कठड्यावरुन विरुद्ध दिशेला जाऊन दोन गाड्यांना जोराची धडक दिल्याने हा तिहेरी अपघात घडला आणि तीनही गाड्यांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. या अपघातात क्रुझर व वॅगनर या दोन गाडीतील काहीजण जखमी झाले आहेत. तामलवाडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गोकुळ ठाकुर व पोलीस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित अधिकारी व पोलिसांनी रस्त्यावरील वाहने क्रेनच्या सहाय्याने बाजुला करुन वाहनांसाठी रस्ता मोकळा करून दिला.

### होनसळ-मार्डी फाट्यावर उड्डाणपुलाची गरज

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमार्ग क्रं. ५२ वर होनसळ, मार्डीकडे जाणारा रस्ता हा अपघात प्रवणक्षेत्र बनला असून, या ठिकाणी अनेक अपघात घडुन नागरीक जखमी होत असल्याचे दिसून येत आहे. तामलवाडी येथे मोठमोठे कारखाने असल्याने होनसळ, राळेरास, मार्डी, येथील युवक कामासाठी येतात व येथील नागरिकांना सोलापूर येथे जाण्यासाठी याच रस्त्याने जावे लागते. कुलस्वामिनी श्री आई तुळजाभवानी मातेचे दर्शन करुन भाविक मार्डी येथील यमाई देवीच्या दर्शनासाठी याच फाट्यावरून पुढे जातात. यामुळे याठिकाणी ये-जा करणाऱ्या वाहनांची गर्दी कायम असते. रात्री याठिकाणी उजेड नसल्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांचा अंदाज लागत नाही व अपघात घडत असून, अनेक नागरीक आजपर्यंत जखमी झाले आहेत. दरम्यान, याठिकाणी उड्डाणपूल करुन वारंवार होणाऱ्या छोट्या मोठ्या अपघातास आळा घालावा, अशी तामलवाडी, होनसळ ग्रामस्थांनी मागणी पुढे येत आहे.

**होनसळ रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत दोनजण जखमी**

दुसऱ्या एका घटनेत तामलवाडी येथील सोलापूर हद्दीजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघेजण जखमी झाले असून, जखमींना उपचारासाठी सोलापूर येथे पाठविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमार्ग क्र. ५२ वरती सोलापूर सरहद्दीजवळील होनसळकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ दि. १५ फेब्रुवारी रोजी रात्री ७.३० वा. दरम्यान दोन चाकी गाडी घेऊन जाणाऱ्या दोन इसमास अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील वैभव शिंदे, समर्थ जगदाळे रा. उळे, ता दक्षिण सोलापूर हे दोन इसम जखमी झाले असुन, या अपघाताची माहिती मिळताच तामलवाडी येथील राष्ट्रीय महामार्गावरील १०३३ ही रुग्णवाहीका तात्काळ दाखल झाली व जखम ींना उपचारासाठी सोलापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सोलापूर हद्दीजवळ होनसळकडे जाणारा रस्ता हा अपघातग्रस्त रस्ता बनला असुन, याठिकाणी उड्डाणपूल बनवावे, अशी मागणी तामलवाडी व होनसळ ग्रामस्थांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### ॲड. आरगडे यांची महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या सोशल मीडिया प्रमुखपदी नियुक्ती

**बार्शी, दि. १६ फेब्रुवारी-**

बार्शीच्या ॲड. निवेदिता आरगडे यांची महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या सोशल मीडिया प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अखिल भारतीय काँग्रेसच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्या दृष्टिकोनातून आणि माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अखिल भारतीय महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा श्रीमती अल्का लांबा यांच्या आदेशाने त्यांच्यावर ही जबाबदारी देण्यात आली आहे. पक्षाच्या विचारधारेचा प्रचार व प्रसार करण्यासह महिला काँग्रेसच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय कार्याचा वस्तार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल. महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे



यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस सोशल मीडिया प्रमुखपदी ॲड.निवेदिता आरगडे यांना मुंबई येथे नियुक्तीचे पत्र दिले. निवेदिता आरगडे यांनी पक्षवाढीसाठी मोठे योगदान दिले असून, सातत्याने विविध ठिकाणी पक्षाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांच्या मेहनतीला आणि पक्षनिष्ठेला मान्यता देत त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली.या निवडीबद्दल ॲड. निवेदिता आरगडे यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### शिवजयंतीनिमित्त पालखी सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात

**बार्शी, दि. १६ फेब्रुवारी-**

शिवजयंती निमित्त निघणाऱ्या ऐतिहासिक मध्यवर्ती पालखी सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात आलेली आहे. कोणतेही वाद्य नसलेल्या या ऐतिहासिक पालखी सोहळ्याच नियोजन गेली ११



वर्षांपासून बार्शी शहरातील सर्व शिवभक्त एकत्र येऊन करीत असतात. या पालखी सोहळ्यात सर्व समाजातील पुरुष महिला मोठ्या संख्येने उपस्थित असतात. पालखी सोहळ्यातील रांगडे मावळे हे या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असते. यावर्षी देखील हा पालखी सोहळा श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथून दुपारी ३ वाजता निघणार आहे. यासाठी आतापर्यंत दोन बैठक आयोजित करुन या सोहळ्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. या पालखी सोहळ्यात सहभागी होताना पांढरा शर्ट व डोक्याला भगवा फेटा घालून बार्शीतील तमाम शिवभक्तांनी सहकुटुंब सहपरिवार या पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन पालखी सोहळा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

### महापालिकेच्यावतीने संत सेवालाल महाराज यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने संत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त कौन्सिल हॉल येथील कार्यालयात संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस महापालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीष पंडित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी उद्यान अधिकारी किरण जगदाळे, जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार ,अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १७ फेब्रुवारी २०२५ | क्रांति. लहुजी साळवे पुण्यदिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | औदुंबर पंचमी, |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - माघ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. पंचमी (२८.५३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - चित्रा (अहोरात्र) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शूल (०८.५३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (१५.३३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : शुभकामाची रूपरेषा आखाल. राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत. जास्त फायदा मिळण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न फायदेशीर राहतील.

**वृषभ** : मागील स्मृती उजाळल्यामुळे दु:ख होईळ. धार्मिक प्रवृत्तीत वाढ होईल. उच्च अधिकाऱ्यांच्या भेटी होती. काम चुकारपणा करू नका.

**मिथुन** : सामाजिक कामात यश व सन्मान मिळण्याचे योग आहे. परिश्रमाचा पूर्ण मोबदला मिळेल. उत्पन्नात वाढ होईल. खाण्या:पिण्यावर लक्ष असू द्या. रोजगारात प्रगती राहील.

**कर्क** : मित्रांचे सहकार्य लाभेल. विचारपूर्वक काम केल्याने कामात यश मिळणार आहे. साथीदारांच्या कामावर लक्ष असू द्या.

**सिंह** : मनमानीने काम करण्याची प्रवृत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती खराब राहील.

**कन्या** : कामकाजात आलेली समस्या आपल्या प्रयत्नामुळे दूर होईल. बाहेरील व्यत्तिंफ्च्या काम काजावर विशेष लक्ष द्या. यश मिळाल्याने उत्साह वाढेल. व्यापार व्यवसाय फायदेशीर राहील.

**तुळ** : जुन्या परिचित व्यक्तिची अचानक भेट होईल. मनोबलात वाढ होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**वृश्चिक** : कामात यश मिळाल्याने आनंदी रहाल. नातेवाईकांशी असलेल्या संबंधावर मर्यादा राखा.

**धनु** : विशेष काम होण्याचे योग आहेत. साथीदाराचे सहकार्यामुळे मन प्रसन्न राहील.

**मकर** : पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसेल. मुलांच्या बाबतीत भावनीक समस्या निर्माण होतील.

**कुंभ** : कौटुंबिक सदस्याचे आपल्या विषयी मत चांगले राहील. काम करतांना वेळेचे बंधन राखा.

**मीन** : जोशपूर्वक कामात रस घ्याल. हुशार व्यक्तिची भेट होईल त्यामुळे फायदा होईल. कौटुंबिक समाधान लाभल्यामुळे मन प्रसन्न राहील.

# बाजार समितीमधील ५०० व्यापाऱ्यांना नोटीसा

## प्रशासकांनी उगारला कारवाईचा बडगा

## अतिक्रमण जागेवर व्यापार करणे भोवले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी -**

सोलापूर बाजार समितीमध्ये जवळपास पाचशेहून अधिक जणांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. या नोटिसा अतिक्रमित जागेवर व्यापार करीत असल्याने देण्यात आल्या आहेत.

तत्कालीन संचालक मंडळानी येथील व्यापाऱ्यांची गरज ओळखून अतिक्रमण जागेमध्ये शेतमाल ठेवण्यासाठी परवानगी दिली होती. त्यामध्ये फळे विभागात जवळपास १३ व्यापाऱ्यांना नोटिसा दिल्या आहेत. उन्हात आणि पावसात फळे ठेवल्यामुळे खराब होतात. ही बाब पाहन तत्कालीन संचालक मंडळानी व्यापाऱ्यांना पत्र्याचे शेड मारण्यासाठी परवानगी दिली होती. आता ते शेड काढण्यासाठी प्रशासक मोहन निंबाळकर यांनी काढण्यासाठी नोटिसा बजाविल्या आहेत. विशेषतः पणनच्या कायद्यामध्ये कोणत्याही प्रकारे दुकान सोडून इतरत्र पत्र्याचे शेड मारून शेतमाल ठेवण्यास परवानगी देणे हे नाही. मात्र तत्कालीन संचालक मंडळाच्या कार्यकाळात काही व्यापाऱ्यांची मर्जी सांभाळण्यासाठी शेतमाल ठेवण्यासाठी परवानगी दिली आहे. फळे, भाजीपाला, कांदा, फुले, भुसार, ऑईल मिल, शेती पूरक व्यवसाय करीत असलेल्या दुकानदारांनाही नोटिसा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रशासक यांनी नोटिसा काढण्यासाठी दिल्या असल्या तरी त्यामध्ये व्यापाऱ्यांचा काय खुलासा येतो याकडे याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> अतिक्रमित जागेवर व्यवसाय करणाऱ्यावर ५०० ते ६०० व्यापाऱ्यांना नोटिसा दिल्या आहेत. या नोटीसांवर उत्तर आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. शेवटी बाजार समितीमध्ये शेतकरी, व्यापारी, आडते, हमाल, तोलार सर्व घटक महत्वाचे आहेत.
>
> **- मोहन निंबाळकर,**
> पणन उपसंचालक तथा प्रशासक
> कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर

**सेस मिळतो का ?**

तत्कालीन संचालक मंडळानी काही व्यापाऱ्यांना तात्पुरत्या स्वरूपात मूळ दुकान सोडून मोकळ्या जागेत व्यापार करण्यासाठी परवानगी दिली आहे. परंतु त्या मोकळ्या जागेचा बाजार समितीला सेस मिळतो की, केवळ मर्जीसाठी असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०).



आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (५४) नेमबाजी

परमपूजनीय डॉ. हेडगेवारांच्या शिस्त संचलन व नेमबाजी या गोष्टी राष्ट्राचे त्राण टिकवण्यास अत्यंत उपयुक्त आहेत. अशी दृढ धारणा त्या अहिंसेच्या काळात सुद्धा होती. ते अनेकदा त्यांचे मित्र भाऊसाहेब टालाटुले व बाकी मित्र यांच्याबरोबर रानात शिकारीला जात; तेव्हा रानात सुद्धा त्यांचे दोन-तीन दिवसाचे वास्तव्य शिस्तबद्ध तरीसुद्धा एका वास्तव्यात त्यांच्यातील एकाने बंदुकीत काडतुसे भरलेली नसतील अशा कल्पनेने थट्टेने घोडा ओढला व डॉक्टरांच्या अगदी जवळून सूँी करीत गोळी निघून गेली! या जणू अंगाला घसटून गेलेल्या मृत्यूचे वर्णन करून डॉक्टर सांगत गोळी असो वा नसो पण कोणत्याही व्यक्तीवर थट्टेने नेम करू नये! एका प्रसंगी वान्नेरा येथे झाडाला वांगी टांगून ते टिपण्याच्या शर्यतीत फक्त डॉक्टरांनीच अचूक लक्ष्य टिपून सर्वांना हरवले होते. एकूणच आचार व विचार या दोन्ही बाबतीत नेमबाजी हवी. व ती अचूक असावी असा त्यांचा आग्रह असे.

**क्रमशः**



## मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात संत सेवालाल महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिकचे सहाय्यक आयुक्त तथा प्रशासन अधिकारी गिरिश पंडित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, महेश वालवकर, सारंग अंजीखाने, अमोल गायकवाड, दत्तात्रेय सोनवणे, भालचंद्र साखरे, केरबा माने आदी उपस्थित होते.

# मने जोडणारी, प्रेम व बंधुत्व निर्माण करणारी उर्दू भाषा

## जेष्ठ कवी बशीर परवाज; अ.भा. उर्दू साहित्य समितीतर्फे उर्दू दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

उर्दू भाषा हि आपल्या देशात जन्मलेली भाषा असुन ती सर्व समाजाची असल्याने ती मने जोडणारी, प्रेम व बंधुत्व निर्माण करणारी भाषा आहे. डॉ. गोपीचंद नारंग यांनी या भाषेला उतुंग शिखरावर पोहोचविले आहे असे उद्गार सोलापूरातील जेष्ठ कवि बशीर परवाज यांनी काढले.



ते अखिल भारतीय उर्दू साहित्य संमेलन समितीतर्फे उर्दू दिना निमित्त आयोजित पुरस्कार वितरण समारंभात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी प्रा.आय.आय. मुजावर (प्रेरक वक्ते) व सोशल महाविद्यालयाचे प्राचार्य ई.जा. तांबोळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थेचे विश्वस्त प्रा.रियाज वळसंगकर यांनी सर्वांचे स्वागत केले. आनंद रघुनाथ देशपांडे यांना उर्दू मित्र पुरस्काराने तर उर्दू भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न करुन शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय योगदान दिल्याबद्दल आसिफ इक्बाल शेख तर साहित्यिक क्षेत्रातील उल्लेखनिय योगदानाबद्दल इरफान कारीगर यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, रोख पाच हजार, शाल व श्रीफळ देऊन जीवन गौरव पुरस्काराने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विकार शेख, म.शफी कॅप्टन, प्रा.हारुण बंदुकवाला, नासीर आळंदकर, जावेद उस्ताद, याकुब मंगलगिरी, प्रा. जब्बार शेख, रफिक नल्लामंदु उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रियाज वळसंगकर यांनी केले तर म.हुसेन बक्षी यांनी आभार मानले.

# एमपीएससी परीक्षेत यश मिळवणाऱ्या भोजने भगिनींचा आ. कोठेंच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असतानाही म हाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे परीक्षेत घवघवीत यश मिळवणाऱ्या सरोजिनी ज्योतीराम भोजने आणि संजीवनी ज्योतीराम भोजने या भगिनींचा सत्कार अज्ञफ देवेंद्र कोठे यांच्या हस्ते करण्यात आला. अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीशी सामना करून भोजने भगिनींनी मिळवलेल्या यशाबद्दल आमदार देवेंद्र कोठे यांनी त्यांचे कौतुक केले.



आ. कोठे म्हणाले, संजीवनी भोजने आणि सरोजिनी भोजने या दोघीही संभाजीराव शिंदे प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी आहेत. याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. त्यांचे वडील ज्योतीराम भोजने हे गॅरेज चालक आहेत. त्यामुळे स्वाभाविकच त्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे. परंतु त्याही परिस्थितीत ज्योतीराम भोजने यांनी आपल्या मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. संजीवनी आणि सरोजिनी भोजने यांनी वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून प्रामाणिकपणे अभ्यास करून हे घवघवीत यश मिळवले आहे. आगामी काळात त्यांना येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी मी मोठा भाऊ म्हणून त्यांच्या पाठीशी राहणार आहे, असेही आ. कोठे याप्रसंगी म्हणाले.

यावेळी संभाजीराव शिंदे प्रशालेचे प्राचार्य अंबादास चाबुकस्वार, विडी घरकुल विभागाचे प्राचार्य वासुदेव इप्पलपल्ली, माजी नगरसेवक सिद्राम अट्टेलुर, विजय घुले, अनिरुद्ध होमकर, गुरु कटके, दादा गांगर्डे, बाळासाहेब गवळी, नारायण बचुटे, शंकर ताकमोगे, संतोष मोरे, प्रशांत बचुटे, ऋषिकेश केदार, नेताजी कदम, सतीश मोरे, विठ्ठल कदम उपस्थित होते.

### अशासकीय लिपिक टंकलेखक पदासाठी भरती

**सोलापूर दि. १६ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक-टंकलेखकाचे अशासकीय एक पद मेस्को मार्फत भरावयाचे आहेत. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह गुरुवार, दि. २० फेब्रुवारी पूर्वी जिल्हा सैनिक कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे. जिल्ह्यातील माजी सैनिक तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्या रोजगार पटावर नोंद असलेल्या युध्द विधवा युध्दजन्य कारणाव्यतिरिक्त दिवंगत झालेल्या सैनिकांच्या विधवा पत्नी यांना प्राधान्य देण्यात येईल. सदर प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्या माजी सैनिकांच्या विधवा पत्नी या पदासाठी पात्र ठरतील. प्राप्त अर्जामधील उमेदवारांची गुरुवार, दि.२० फेब्रुवारी रोजी मुलाखती घेण्यात येतील.

# शहरासाठी भीमा नदीतून आजपासून सोडले जाणार पाणी

## नदीकाठच्या लोकांना दिला सावधानतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

जिल्हास्तरीय आकस्मिक पाणी आरक्षण समितीच्या निर्णयानुसार नुसार भीमा नदीवरील पिण्याचे पाणी आवर्तन क्रमांक २ उद्या दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ वाजता उजनी धरण विद्युतगृहामधून सोडण्यात येणार असून, दीड महिन्यानंतर हे यंदाचे दुसरे आवर्तन आहे. दरम्यान, नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा संबंधित यंत्रणेकडून देण्यात आला आहे.

उजनी धरण विद्युतगृहातून सुरुवातीस १६०० इतका विसर्ग सोलापूर महानगरपालिका, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा नगरपरिषद व भीमा नदीकाठच्या ग्रामपंचायतसाठी पिण्याचे पाणी योजनांसाठी सोडण्यात येणार आहे. तसेच सदर विसर्गामध्ये आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात येणार आहे. तरी भीमा नदी काठच्या सर्व नागरिकांनी नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदी मधील शेती पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत. असेही आवाहन करण्यात आले आहे. सध्या नदीपात्रात पहिल्या आवर्तनात सोडलेले पाणी काही ठिकाणी साठलेले आहे. यामुळे टप्प्याटप्प्याने लागेल तसे हे पाणी सोडण्यात येणार आहे. उजनीत यंदा मुबलक पाणी असले तरीही पाण्याचा वापर सर्वांनी काटकसरीने करावा, असे आवाहन कार्यकारी अभियंता खांडेकर यांनी केले आहे.

# 'आयुष्यमान'च्या कामाला येतेय गती

## रेशन दुकानदारांकडून याद्या झाल्या 'व्हेरीफाय'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

मुख्यमंत्री आणि राज्याच्या मुख्य सचिवांनी फेब्रुवारी २०२५ च्या पहिल्याच आठवड्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना १०० टक्के पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सुचना दिल्या होत्या; यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा आरोग्य विभाग आणि जिल्हा पुरवठा विभागाची यंत्रणा चांगलीच कामाला लावली असून, आयुष्यमान योजनेचे १०० टक्के टार्गेट पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनीही या कामात झोकून देत; राशन दुकानदारांकडून आयुष्मान कार्डसाठी जिल्ह्यातील मयत आणि स्थलांतरीत लोक वगळून याद्या व्हेरिफाय केल्या आणि जिल्हा आरोग्य यंत्रणेकडे पाठविल्याची माहिती दिली.

एकत्रित आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड काढण्याचे काम सोलापूर शहर-जिल्ह्यात अत्यंत संथगतीने सुरू होते. त्या अनुषंगाने आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेचे जिल्ह्यात पात्र लाभार्थ्यांची संख्या ४०.९२ लाख इतकी असून, त्यापैकी १०.५२ लाख (२६%) एवढे कार्ड तयार करण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे तयार करण्यात आलेल्या कार्ड पैकी फक्त २.९९ लाख इतके कार्ड वितरीत करण्यात आले आहेत. यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी हा विषय गांभीयांने घेत दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी संबंधित यंत्रणेला जागे केले आहे. यामुळे आता ही यंत्रणा आयुष्मान भारत कार्ड देण्याच्या कामाला चांगलीच लागल्याचे दिसत आहे.

आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना ही भारत सरकारची प्रमुख योजना असून, दि. २३ सप्टेंबर २०१८ पासून राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने सोबत एकत्रितपणे राबवण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत लाभार्थी रुग्णांना योजेने अंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये रुपये ५ लाख पर्यंतचा मोफत उपचार देण्यात येतो. सदर काम हे मोहीम स्वरूपात राबवून कार्यक्षेत्रातील सर्वांचे आयुष्मान कार्ड काढणे आवश्यक आहे.

ज्या लाभार्थ्यांची ई केवायसी बाकी आहे, त्यांची तालुका निहाय व ग्राम पंचायत निहाय याद्या तयार करण्यात आल्या होत्या. त्या यादीतील सध्या शिधापत्रिकेचा वापर करणारे लाभार्थी यांची वेगळी यादी तयार करून त्यांचे आयुष्मान कार्ड काढणेसाठी तालुका आरोग्य अधिकारी, पुरवठा निरीक्षक यांच्या समन्वयाने गावनिहाय व तारीख निहाय सूक्ष्मकृती नियोजन करण्यात आले आहे. यासाठी जिल्हा आरोग्याधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, शहराचे धान्य वितरण अधिकारी, जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, जिल्हा व्यवस्थापक, आशा समन्वयक, तालुका आरोग्याधिकारी, प्रा. आ. केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय वैद्यकीय अधिकारी आदी सर्व यंत्रणा चांगलीच कामाला लागली असल्याचे सध्यातरी दिसून येत आहे.

**निष्काळजीपणा दिसल्यास कडक कारवाई**

सदर काम करत असतांना दैनंदिन कामकाजावर व इतर कार्यक्रमांवर त्याचा परिणाम होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी बजावले आहे. दरम्यान, कोणताही अधिकारी व कर्मचारी आयुष्मान कार्ड मोहिमेत हलगर्जीपणा करताना निदर्शनास आल्यास संबंधितांवर कडक कारवाईचा इशाराही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे.



# मेहता प्रशालेत कॅन्सरवर मागदर्शन शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

५ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय बाल कर्करोग दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून सोलापूर शहरातील वि. मो. मेहता प्रशाला येथे विद्यार्थ्यांच्या मध्ये कॅन्सर विषयक जाणीव जागृती कार्यक्रम आणि लसीकरण याविषयी मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते अशी माहिती युगंधर फाऊंडेशनचे अध्यक्षा प्रा. रेश्मा माने यांनी दिली.

संस्थेच्या वतीने सोलापूर जिल्हा आणि शहरात कॅन्सर जाणीव जागृतीसाठी आरोग्य तपासणी शिबीर आणि व्याख्यानांचे आयोजन करण्यात येत आहेत. प्रशालेत कार्यक्रमाच्या वेळी मार्गदर्शक म्हणून सोलापूर सिव्हील हॉस्पिटलमधिल कॅन्सर तज्ञ डॉ.अवधूत डांगे आणि स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रदीप पाटील उपस्थित होते .विद्यार्थ्यांनी लहान वयात कॅन्सर बाधित वस्तू आणि अन्नपदार्थ यापासून कसे दूर राहावे कॅन्सर विषयक माहिती करून घेवून त्याबद्दल भीती कमी करावी आणि आपला आहार विहार योग्य ठेवून कॅन्सरपासून आपला बचाव करावा, असे मत डॉ. डांगे यांनी व्यक्त केले. युगंधर फाऊंडेशन सोलापूर वतीने HPV लस विद्यार्थ्यांच्यासाठी मोफत उपलब्ध करून देणार असल्याची माहिती प्रा.माने यांनी दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रशालेच्या मुख्याध्यापक श्रुती बागेवाडिकर या उपस्थित होत्या. तर पालक संघचे अध्यक्ष कुलकर्णी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### एनएमएमएस परीक्षेत जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेचे यश

**अक्कलकोट, दि. १६ फेब्रुवारी-**

गौडगाव बु!! येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेचे राष्ट्रीयआर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (छ्चचड) परीक्षेत सात विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या एनएमएमएस परीक्षेत प्रशालेचे सात विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यात साक्षी चांनकोटे. राकेश नागलगाव .अक्षता दानशेट्टी. श्रद्धा इंडी.श्रावण हाळतोट.अंबिका नागलगाव .आनंद कलशेट्टी. या विद्यार्थ्यांच्या समावेश असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे विश्वस्त 'शिवाचार्यरत्न' श्री.ष. ब्र.डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे सर्व पदाधिकारी योगीराज हिरेमठ, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबळे, शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी, पर्यवेक्षक लाडप्पा शिंदे, केंद्रप्रमुख भिमराव धडके आदींनी अभिनंदन केले.



### सह्याद्री कॉलेजमध्ये क्रीडा सप्ताह

**सांगोला, दि. १६ फेब्रुवारी-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे येथे एससीपीएम-क्रीडासप्ताह-२०२५ याचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्‌घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्याहस्ते झाले. या क्रीडासप्ताहामध्ये क्रिकेट, हॉलीबॉल, बॅडमिंटन, थ्रो-बॉल, बुद्धिबळ, कॅरम, रस्सीखेच, कब्बडी, गोळा फेक या स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी जोरदार तयारी केल्याने व भरघोस प्रतिसादामुळे सर्व स्पर्धेत रंगत येऊन त्या अतिशय रोमांचकारक, अटीतटीच्या झाल्या. विजेत्या संघास व विद्यार्थ्यास ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा क्रीडा सप्ताह यशस्वी करण्यासाठी क्रीडा विभागप्रमुख प्रा. आर. के. कदम यांनी परिश्रम घेतले.



### वळसंगच्या श्री शंकरलिंग प्रशालेत श्री संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी

**वळसंग, दि. १६ फेब्रुवारी-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत श्री संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी संजयकुमार धनशेट्टी, सिदधाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, नीलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, मल्लिनाथ गौडगाव, विजय प्याटी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, ग्रंथपाल निलकंठ चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी केले.



### श्री महाशिवयोगी महासिद्ध यात्रेनिमित्त जंगी कुस्त्या

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

भंडारकवठे येथील ग्रामदैवत श्री महाशिवयोगी महासिद्ध देवाच्या यात्रेनिमित्त आयोजित जंगी कुस्त्या पार पडले. एक लाख रूपये बक्षीसाची भंडारकवठे केसरी कुस्ती नवतेज कोंडकर पुळूज आणि धनंजय गावडे धाराशीव यांच्यात बरोबरीत सुटली. यात शंभर ते लाख रूपये इनामाची दीडशेहून अधिक कुस्त्या झाले.या कुस्ती फडाचे उद्‌घाटन माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी भीमाशंकर बिराजदार होते. यावेळी सरपंच भिमाशंकर बबलेश्वर, बाजार समितीचे माजी संचालक वसंतराव पाटील, उमराणीचे हणमंत पुजारी, माजी सरपंच चिदानंद कोटगोंडे, धुंडप्पा निराळे, पांढरेवाडीचे सरपंच कोंडेबापू पाटील, उपमहाराष्ट्र केसरी विजेता भरत मेकाले, बुवा बडरे, विलास तोरवे, बाळू बनसोडे, पैलवान कुबेर चडचण, महानिंग मनगेनी, पैलवान हणमंत पुजारी, प्रथमेश पाटील, गुरूनाथ आरकेरी आदी उपस्थित होते. द्वितीय क्रमांकाची कुस्तीही रामा शेळके सोलापूर आणि शुभम दुधाळ बामणी यांना विभागून दिले. तृतीय क्रमांकाच्या कुस्तीत बाळ शेळके हराळवाडी व संजीव हारूगिरी कर्नाटक यांच्यातील लढतीत शेळके यांनी बाजी मारली. यावेळी सरपंच भिमाशंकर बबलेश्वर, निलेश कोळी, नागेश बिराजदार, यतीन शहा, अप्पासाहेब कोळी उपस्थित होते. येथील मैदानात पैलवानांनी कलाजंग, गदा लोट, ढाक, कचाक, घुटना, मोळी, झोळी, साल्तु, बँक थ्रो, उखाडा यासह अन्य डावावर कुस्ती करत कुस्तीतील विविध डावांचे दर्शन घडविले.

# वनपर्यटनामुळे रोजगाराच्या संधी : आ. कल्याणशेट्टी

## बोरामणी येथे कुरण वनपर्यटनाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

वनविभागाने नागरिकांसाठी वनपर्यटनाचा अनुभव आणि आनंद देणाऱ्या या प्रकल्पासाठी पुढाकार घेतला. या वनपर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी आर्थिक मदत करण्यास तयार आहे. बोरामणी कुरण पर्यटनाच्या विकासासाठी प्रस्ताव सादर केल्यास तो मंजूर करून घेण्याची ग्वाही त्यांनी दिले. या वनपर्यटनामुळे बोरामणी आणि परिसरातील नागरिकांना नक्कीच रोजगार आणि व्यापाराची नवीन संधी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील नागरिक आणि विद्यार्थी यांना वन्यजीव आणि त्यांच्या नैसर्गिक आधिवासाचा जवळून आनंद अध्ययन करण्याची संधी उपलब्ध झाली असल्याची भावना आमदार कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केली.

कुरण पर्यटन, बोरामणीच्या कोनशिला आणि प्रतीक चिन्हांचे अनावरण आणि प्रवेशद्वाराची फीत कापून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपवनसंरक्षक लेफ्टनंट कुशाग्र पाठक होते. मुख्य वनसंरक्षक



एन. आर. प्रवीण, वन्यजीव आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याकरिता संविधानिक कर्तव्य भावना नागरीकांमध्ये रुजविण्याचे धेय्य आणि वनपर्यटनाच्या माध्यमातून रोजगार आणि व्यापाराची संधी निर्माण करण्याचा हेतू असल्याची भावना उपवन संरक्षक कुशाग्र पाठक यांनी प्रास्ताविकात व्यक्त केली. वन्यजीव आणि त्यांच्या नैसर्गिक आधिवासाला पाहण्याकरिता नागरिकांनी आणि वन्यजीवांच्या नैसर्गिक आधिवासासह जैवविविधतेचे अध्ययन करण्याकरिता विद्यार्थ्यांनी या पर्यटन केंद्राला भेट देण्याचे आवाहन रोजगार हमी योजनेचे सहायक वनसंरक्षक अजित शिंदे यांनी केले आहे.

यावेळी बोरामणीचे सरपंच साळुंखे, संयुक्त वन व्यवस्थापन समिती बोरामणीचे अध्यक्ष राजकुमार हळणगे, पोलीस पाटील महादेव पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक केदारलिंग विभुते आणि बोरामणी तसेच खडकी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# करकंबच्या लेकीची गरुडझेप

## जलसंधारण अधिकारीपदी तनवी करळे यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १६ फेब्रुवारी-**



टीसीएसच्या वतीने जुलै २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या सरळसेवा भरती परीक्षेमध्ये रामभाऊ जोशी हायस्कूल करकंबचे पर्यवेक्षक धनवंत करळे यांची कन्या तनवी धनवंत करळे यांनी घवघवीत यश संपादन केले असून त्यांची धाराशिव विभागाअंतर्गत उपविभाग तुळजापूर येथे जलसंधारण अधिकारी स्थापत्य वर्ग दोन महाराष्ट्र शासन या पदावर निवड झाली.जलसंधारण अधिकारीपदी नेमणुकीचे पत्र १३ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथे त्यांना देण्यात आले.विशेष म्हणजे त्यांच्या एका वर्षात चार विविध पदांवरती नेमणुका झाल्या आहेत.त्यातूनच त्यांनी या पदाची निवड केली.सध्या त्या सार्वजनिक बांधकाम विभाग अंधेरी मुंबई येथे महाराष्ट्र शासन स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर कार्यरत आहेत.त्यांचे प्राथमिक शिक्षण प्रा.शाळा करकंब,अकरावी बारावी केबीपी महाविद्यालय पंढरपूर बि.टेक सिव्हील कॉप शासकीय महाविद्यालय पुणे येथे झाले.त्या बी.टेक इंजिनियर असून दहावीच्या परीक्षेत पुणे विभागात प्रथम येण्याचा मान त्यांनी प्राप्त केला आहे.त्या चित्रकला स्पर्धेमध्ये ए ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाल्या. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे शिक्षक,विद्यार्थि मित्र,करकंब ग्रामस्थ यांचेकडून अभिनंदन करण्यात येत आहे.



### श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास एक लाखाची देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.१६ फेब्रुवारी-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस कौशल्या केंद्रे व शिवाजी केंद्रे यांनी एक लाख रुपये ची देणगी दिल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. त्याबद्दल देणगीदार यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची प्रतिमा व उपरणे देऊन येथोचित सन्मान केला.

यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते. कौशल्या शिवाजी केंद्रे व शिवाजी भीमराव केंद्रे हे देणगीदार दांपत्य आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी सदरची देणगी दिली असून, ते लोहा जिल्हा नांदेड येथील रहिवासी आहेत.

# मराठा महासंघाच्या जिल्हा युवक अध्यक्षपदी जयकुमार केचे-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १५ फेब्रुवारी-**



अखिल भारतीय मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य या सामाजिक संघटनेच्या सोलापूर जिल्हा युवक अध्यक्षपदी लवंग ता माळशिरस येथील जयकुमार तुकाराम केचे पाटील यांची नुकतीच निवड झाली असून या निवडीबद्दल सकल मराठा समाज माळशिरस तालुक्याच्या वतीने जयकुमार केचे-पाटील यांचा सत्कार करण्यात आला यावेळी सकल मराठा समाजाचे धनाजी साळकर, अण्णासाहेब शिंदे बबनराव शेंडगे, मराठा सेवा संघाचे रवींद्र पवार डॉ. अमोल माने-शेंडगे, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रिया नागणे उपस्थित होते

मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा हे ब्रीदवाक्य घेऊन स्व. अण्णासाहेब पाटील यांनी स्थापन केलेल्या मराठा महासंघाचे कार्य सोलापूर जिल्ह्यात सर्वदूर असून या मराठा महासंघाची युवकांची फळी तयार करून जास्तीत जास्त युवकांना सामाजिक कार्यात सहभागी करून समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात मराठा महासंघ नेहमीच अग्रेसर असतो अशा या मराठा महासंघाचे सोलापूर जिल्हा सचिव गणेश चव्हाण यांनी जयकुमार केचे पाटील यांच्या निवडीचे नुकतेच पत्र दिले आहे.

> सोलापूर जिल्हा युवक अध्यक्ष पदाची माझ्यावर जी जबाबदारी टाकली आहे ती जबाबदारी माजी आ. नरेंद्र पाटील यांच्या जिल्हा सचिव गणेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांना सोबत घेऊन पार पाडणार असून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून जास्तीत जास्त युवकांना उद्योग व्यवसायात सहभागी करून घेण्यासाठी यापुढे प्रयत्न राहील
>
> **- जयकुमार केचे-पाटील,**
> जिल्हा युवक अध्यक्ष, मराठा महासंघ सोलापूर

### वागदरीमध्ये भागवत कथा निरुपण, पारायण सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि.१६ फेब्रुवारी-**

येथून जवळच असलेल्या वागदरी येथे दिनांक १३ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या सप्ताहात,ग्रामस्थांच्या वतीने श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण व श्रीमत भागवत कथा निरूपण ज्ञान यज्ञ व सार्वजनिक विवाह सोहळा याचे आयोजन करण्यात आले असून, त्याला ग्रामस्थ, महिलांचा उस्फुर्त सहभाग लाभत आहे.



यंदाचे हे १८ वे वर्ष असून संपूर्ण गावात या काळात धार्मिक वातावरण तयार होते, दररोज सकाळ संध्याकाळ एका ग्रामस्थाच्या घरी प्रसादाच्या,भोजनाच्या पंक्तीवर पंक्ती उठवल्या जात आहेत,मुख्य भागवत कथाकार हभप मधूकरजी नादरे महाराज वसमत हे आपल्या सुश्राव्य वाणीमधून वेगवेगळी उदाहरणे देऊन ही कथा दररोज १ ते ७ या वेळेत सांगत आहेत तर त्यांना गायनाची साथ त्यांच्या धर्मपत्नी सोनाली ताई नादरे या देत आहेत तसेच हभप सागर महाराज नांदेडकर तबला वादन, व सतीश महाराज आळंदीकर यांचे निरूपण होत आहे, तर हभप राजकुमार पाटील हे व्यासपीठ धारक आहेत .

दररोज सकाळी ७ ते १२ तुकाराम गाथा पारायण होत असून त्याला मुली व महिलांची उपस्थिती मोठी आहे,तर रात्री ९ ते ११ कीर्तन, भजन होत आहे. शेवटच्या दिवशी म्हणजे गुरुवारी २० तारखेला समारोप, महाप्रसाद व सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे,तरी वागदारी परिसरातील भक्तानी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे, या संपूर्ण धार्मिक कार्यक्रमासाठी भवानीसिंग महाराज भजनी मंडळ, महिला भजनी मंडळ, शिवाजीराव मिटकर गुरुजी, रामचंद्र यादव, राजेंद्र पवार, ज्ञानोबा सुरवसे, रामलिंग चव्हाण, मोहन सोमवसे, नागनाथ धुमाळ,किशोर सुरवसे, ज्ञानेश्वर पाटील, बाळू पवार, शंकर धुमाळ व समस्त ग्रामस्थ मंडळी परिश्रम घेत आहेत.

### दत्तकला इंजिनिअरिंग महाविद्यालयाची ISRO अकादमिक कार्यक्रमासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ फेब्रुवारी-**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO)द्वारे आयोजित शैक्षणिक कार्यक्रमांसाठी दत्तकला शिक्षण संस्थेच्या दत्तकाला फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयाची निवड झालेली असून ग्रामीण भागातील हे पहिलेच सेंटर आहे. या कार्यक्रमांतर्गत तीन महिने, दोन महिने, एक महिना आणि सहा दिवस असे विविध कालावधीचे अभ्यासक्रम विद्यार्थी तसेच प्राध्यापकांसाठीही राबवले जातील.

या अभ्यासक्रमासाठी नोंदणी केल्यानंतर महाविद्यालयास तसेच सहभागी विद्यार्थ्यास शासकीय प्रमाणपत्र प्राप्त होईल. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा भाग असल्याने पुढील १ ते २ वर्षांत विद्यार्थ्यांना मोफत ISRO केंद्राला भेट देण्याची संधी मिळणार आहे. हा अभिमानास्पद क्षण असून विद्यार्थ्यांसाठी संशोधन व अंतराळ क्षेत्रात नवी दारे उघडणारा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. असे मत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी व्यक्त केले.

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे मत प्राचार्य डॉ.एस. ए.पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. श्रीकांत साळुंके उपस्थित होते. नोडल अधिकारी म्हणून प्रा. तनुजा ढगे हे काम पहात आहेत.



### स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात प्रशांत अंधारे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १६ फेब्रुवारी**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून भक्तस्नेही संकल्पना ह्या उत्कृष्ठ असून, परिसरात वसुंधरेची जपणूक चांगल्या प्रकारे झाली असल्याचे मनोगत राज्याच्या अल्पसंख्याक विभागातील कक्ष अधिकारी प्रशांत अंधारे मंत्रालय, मुंबई यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे अतिश पवार, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, संभाजीराव पवार, सागर पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, धनंजय निंबाळकर, मुन्ना कोल्हे, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण उपस्थित होते.

# गणित अधिवेशनामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना

## महेश इंगळे; कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनमध्ये जिल्हास्तरीय वार्षिक गणित अधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ फेब्रुवारी-**

गणित हा विषय विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच अभ्यासक्रमात आहे. गणित शिक्षकांनी या विषयात विद्यार्थ्यांकरिता अत्यंत तळमळीने देत असलेल्या शिकवणीतुल्य योगदानामुळे बालवयापासूनच विद्यार्थ्यांच्या मेंदूला कार्यप्रणाली लाभून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे व कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले.

येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील कै.कल्याणराव इंगळे महाविद्यालयात महेश इंगळे यांच्या विशेष सहकार्याने सोलापूर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने १४ वे वार्षिक गणित अधिवेशन नुकतच मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्ताने श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान कार्यालयात सोलापूर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने मंडळाचे उपाध्यक्ष



स्वप्नाली जमदाडे, सचिव बसवराज शावरी, सदस्य सतिष मर्जी, शिवानंद पुजारी यांच्या उपस्थितीत मंडळाचे अध्यक्ष कलप्पा बुळ्ळा यांच्या हस्ते महेश इंगळे यांचा शाल, पुष्पगुच्छ, कृतज्ञापत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी महेश इंगळे बोलत होते. या वेळी गणित अध्यापक मंडळाच्या वतीने मंडळाचे उपाध्यक्ष स्वप्नाली जमदाडे यांनी महेश इंगळे यांच्या प्रती कृतज्ञतापूर्वक मनोगत व्यक्त करताना जिल्ह्यातील गणित शिक्षकांसाठी सोलापूर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने १४ वे वार्षिक गणित अधिवेशन देवस्थानच्या कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनमध्ये उत्साहात पार पडले. श्री. स्वामी समर्थांच्या पावन नगरीत हे गणित अधिवेशन संपन्न होण्यात महेश इंगळे यांचा सिंहाचा वाटा आहे.

या अधिवेशनाकरीता आलेल्या जिल्ह्यातून ४०० हून अधिक गणित शिक्षकांची आपण राहण्याची, भोजनाची व्यवस्था केली. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीकांत झिपरे, संतोष पराणे, श्रीशैल गवंडी, विपुल जाधव, अमर पाटील, संतोष स्वामी, सागर गोंडाळ उपस्थित होते.

### वाशिंबे रेल्वे स्थानकावर हैद्राबाद-हडपसर एक्सप्रेसला थांबा देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१६ फेब्रुवारी**

वाशिंबे रेल्वे स्थानकावर रविवार, मंगळवार, गुरुवार अशी आठवड्यातून तीन दिवस चालणाऱ्या पुणे (हडपसर) हैदराबाद एक्स्प्रेसला थांबा मंजूर करण्याची मागणी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव दिपक चव्हाण यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात चव्हाण यांनी म्हटले आहे की वाशिंबे रेल्वे स्थानकावरून सकाळी पुणे,दौंड येथे जाण्यासाठी वाशिंबे स्टेशन परिसरातील वाशिंबे सोगाव, ऊंदरगाव, गोयेगाव, मांजरगाव, राजूरी, रीटेवाडी, केतूर येथील नागरीकांना दवाखाना, कोर्ट कचेरीची कामे, शाळा,कॉलेज,खरेदी, चाकरमानी यांना जावे लागते. परंतू सध्या या वेळेत स्टेशन वर गाडीला थांबा नाही. त्यामुळे या परिसरातील नागरीकांना गैरसोईला सामोरे जावे लागते. या गाडीस प्रवासी थांबा मिळावा यासाठी प्रवासी संघटना,सामाजिक संघटना, राजकीय पक्ष संघटना यांनी वेळोवेळी मागणी केली आहे.त्यामध्ये रेल्वे प्रशासनाकडून आठवड्यातून रविवार, मंगळवार व शुक्रवारी सकाळी आठ वाजता पुणे येथे जाणारी गाडी क्रमांक १७०१४ हैदराबाद-हडपसर गाडीला वाशिंबे स्थानकावर थांबा मंजूर केल्यास या भागातील प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वैराग येथे शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि १६ फेब्रुवारी-**

वैराग (ता. बार्शी) येथील आण्णा ग्रुपच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव १९ ते २२ फेब्रुवारी असा चार दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येणार असल्याचे आण्णा ग्रुपचे संस्थापक वैजिनाथ आदम ने, मेजर जगन्नाथ आदमाने यांनी सांगितले .

बुधवार १९ फेब्रुवारी रात्री शिवपाळणा होणार असून पहाटे ४ वाजता तुळजापूर ते वैराग येथून शिवज्योत आणणे, सकाळी १० वाजता छत्रपती शिवप्रतिमेची स्थापना व पूजन व सायंकाळी ७ वाजता ह. भ.प. रामायणाचार्य राजन महाराज काशीद पिंपरीकर यांचे कीर्तन , गुरुवार २० फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन भगवंत ब्लड बँक बार्शी करण्यात येणार आहे . सायंकाळी ६ ते ७ आण्णा ग्रुप च्या वतीने शिवभोजन महाप्रसाद, सायंकाळी ८ वाजता श्री प्रशांत महाराज कापसे व पंडित महाराज बारामतीकर यांचा भारुडाचा कार्यक्रम आहे २१ फेब्रुवारी शुक्रवारी रोजी सायंकाळी ६ ते १० पर्यंत वक्तृत्व स्पर्धा लहान, मध्यम व मोठा गटात असणार आहेत. दि. २२ रोजी सायंकाळी ७ वाजता भव्य असा होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम निवेदिका अपर्णा दळवी यांच्या उपस्थितीत होणार आहे. तरी सर्व महिलांनी व शिवभक्तांनी यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आदमाने यांनी केले.

# सोलापुरात दोन दिवसीय कृषी संस्कृती कार्यशाळेचे आयोजन

### व्याख्याने, परिसंवाद अन् सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी : सोलापूरकरांनी सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.१७ आणि मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात दोन दिवसीय कृषी संस्कृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कार्यशाळेचे सहसमन्वयक रवी सोलापुरे यांनी दिली.

या कार्यशाळेचे उद्घाटन सोमवारी दिनांक १७ रोजी सकाळी १० वाजता होईल. यानंतर सकाळी ११ वाजता प्रा. डॉ. महेंद्र कदम यांचे 'कृषी संस्कृतीतील लोकपावत चाललेले घटक' या विषयावर बीजभाषण होईल. तर दुपारी १२ वाजता 'शिवकालीन शेती' या विषयावर शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांचे मार्गदर्शन होणार आहे. दुपारी २ वाजता कृषी संस्कृती कृषी पर्यटनाचा आधार या विषयावर परिसंवाद होणार आहे. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी पांडुरंग तावरे राहणार असून यावेळी अरविंद जोशी, सूर्यकांत भिसे, स्नेहा शिनखेडे, डॉ. सुवर्णा पापळ हे सहभागी होणार आहेत.

दुपारी ३ वाजता 'कृषी संस्कृती संबंधी सण, उत्सव आणि विधी' या विषयावर सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी ४ वाजता 'शोध कृषी संस्कृतीचा' या विषयावर इंग्रजीत भालेराव यांचे व्याख्यान होणार असून सायंकाळी ५.२० वाजता 'जात्यावरच्या ओव्या' ही कार्यशाळा होणार आहे. यात अपर्णा सहस्त्रबुद्धे आणि सहकारी तसेच स्वप्निल सपना लोककला विकास मंडळाचा सहभाग असेल. सायंकाळी ७ वाजता योगेश चिकटगावकर यांचा भारुडाचा कार्यक्रम होईल. कमलेश भडकमकर आणि सहकाऱ्यांच्या रात्री ८ वाजताहोणाऱ्या 'कृषीगीते, लोकगीते' या सांस्कृतिक कार्यक्रमाने कार्यशाळेच्या पहिल्या दिवसाचा समारोप होणार आहे.

कृषी संस्कृती कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि. १८) सकाळी १० वाजता डॉ. विश्वनाथ शिंदे 'कृषी संस्कृती आणि जत्रा यात्रा' या विषयावर व्याख्याने देतील. सकाळी ११ वाजता मुकुंद कुळे यांचे 'कृषी संस्कृती, साहित्य संबंधी म्हणी, उखाणे, वाक्यप्रचार, काव्य' या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. दुपारी १२ वाजता 'कृषी परंपरेचे घटक' या विषयावर संजय बाविस्कर व्याख्याने देतील. दुपारी २.२५ वाजता परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून 'कृषी संस्कृतीवर आधुनिकीकरणाचा परिणाम' या विषयावर हा परिसंवाद होईल. यात डॉ. अजित देशपांडे, प्रा. डॉ. रवींद्र चिंचोळकर, डॉ. सचिन फुगे, सुप्रिया महेंद्रकर यांचा सहभाग राहील. दुपारी ४ वाजता 'कृषी कला' या विषयावर कार्यशाळा होणार असून त्यात संध्या मोहिते आणि निखिल परमेश्वर भाग घेणार आहेत. सायंकाळी ५.३० वाचता नेहा राचरला आणि सहकाऱ्यांचा संस्कृती कार्यक्रम तर सायंकाळी ६.३० वाजता स्वप्निल सपना लोककला विकास मंडळाचा संस्कृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या संस्कृती कार्यक्रमाने कृषी संस्कृती कार्यशाळेचा समारोप होणार आहे.

या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून लोकमंगल कॉलेज वडाळा काम पाहत आहे. या कार्यशाळेत अधिकाधिक सोलापूरकरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कार्यशाळेचे सहसमन्वयक रवी सोलापुरे यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास दोन लाखांची देणगी

**पंढरपूर, दि. १६ फेब्रुवारी-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस नित्या मुक्तानंद चॅरिटेबल ट्रस्ट, पाचगणी यांच्याकडून दोन लक्ष रुपयांची देणगी प्राप्त झाल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. पाचगणी जिल्हा सातारा येथील सदरचा ट्रस्ट असून त्यांनी मंदिर समितीच्या विविध विकास कामास हातभार लागावा म्हणून ऑनलाइन पद्धतीने देणगी दिली आहे. ऑनलाइन पद्धतीने देणगी देण्यासाठी क्यू आर कोड, आरटीजीएस, संकेतस्थळ, मोबाईल प इत्यादी माध्यमे उपलब्ध आहेत. याद्वारे देणगी देणाऱ्या भाविकांना देणगीची पावती व प्रसाद पोष्टद्वारे पाठवण्याची देखील सुविधा उपलब्ध आहे. याशिवाय, अनिल तुकाराम खराडे राहणार कोथरूड पुणे या भाविकाने ५० हजार रुपयाची देणगी दिली असून, त्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कर्मचारी रमेश गोडसे यांनी श्री ची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. तसेच सुनील रोहकले रा. मुंबई या भाविकांने ९२६ ग्रॅम वजनाची चांदीची समई श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केली असून, त्याची अंदाजे किंमत ८३ हजार इतकी होत आहे. त्याबद्दल त्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कर्मचारी पृथ्वीराज पोळ यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर कर्मचारी सुधाकर घोडके व देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते.



### द.ह.कवठेकर प्रशालेतील विद्यार्थ्यांना निरोप

**पंढरपूर, दि. १६ फेब्रुवारी -**

द.ह. कवठेकर प्रशालेच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभात बोर्ड परीक्षा संदर्भातल्या महत्त्वाच्या सूचना सांगत विद्यार्थ्यांना कॉपी मुक्त अभियान समजावून सांगितला . दहावीची परीक्षा निर्भय वातावरणात घेण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहेत आपणही सर्वजण कॉपीमुक्त परीक्षा अभियानाला सामोरे जाऊया असा संदेश मुख्याध्यापक व्ही.एम.कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना दिला. परीक्षाबाबत महत्त्वाचे नियम व सूचना मुलांना सांगीतल्या. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना त्यांच्या जडणघडणीमध्ये प्रशालेचा व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पालकां सारखाच महत्त्वाचा वाटा आहे असे सांगितले. विनीत शिंदे व सुयोग वगरे याने एकत्रितरित्या पाचवी ते दहावीचा शैक्षणिक प्रवास अतिशय उत्तमरीत्या सांगितला व सुयोग वगरे याने स्वरचित कविता सादर केली. तर सानिका धर्माधिकारी हिने आपले मनोगत व्यक्त करताना आम्ही निश्चितच खूप मोठे बनव व पुन्हा प्रशालेत सन्मानाने येऊ असे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन व आशीर्वाद देण्यासाठी प्रशालेचे सेवानिवृत्त उपमुख्याध्यापक गणित तज्ञ एन.बी.बडवे यांनी मार्गदर्शन केले व आरोग्य ही जपण्यासाठी मुलांना आवाहन केले. पर्यवेक्षक आर. एस.कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना आत्मचिंतनाची सवय परीक्षेत कशी उपयोगी पडते याबाबत मार्गदर्शन करत परीक्षेला शुभेच्छा दिल्या. आभार व्यक्त करण्यासाठी उपमुख्याध्यापक सुनील रुपनर यांनी सर्व विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन एस.एम. कुलकर्णी यांनी केले. प्रशालेतील शिंदे, चलवाड,धर्माधिकारी, वगरे यांनी प्रशालेच्यासाठी घड्याळ भेट दिले.



### माढ्यात श्री संत रविदास महाराजांची जयंती साजरी

**टेंभुर्णी, दि. १६ फेब्रुवारी-**

श्री संत गुरू रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती माढा तालुक्यातील भोईंजे येथील श्री संत रविदास महाराज यांच्या मंदिरात विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सकाळी मूर्तीचे पूजन, अरदास आरती करण्यात आली.तर दुपारी १२.३० वाजता सर्व भाविकांच्या उपस्थितीत मंदिर ट्रष्टचे मुख्य ट्रस्टी राजाभाऊ शिंदे यांनी पूजा,आरती केली. यावेळी मंदिर ट्रस्टचे मुख्य ट्रस्टी राजाभाऊ शिंदे यांनी सांगितले की, श्री गुरू संत रविदास महाराज हे अनेक संतांचे गुरू आहेत. हरी (ईश्वर) सारख्या सख्यास सोडून इतर कोणाची सेवा करणे चुकीचे आहे. हरीच्या नावा शिवाय दुसरे काहीही नाही.त्यांच्या नावा शिवाय जग अधुरे आहे असा उपदेश महाराजांनी केलेला आहे असे सांगितले.ज्याच्यात पंच महाभूतांचे चैतन्य तोच ईश्वर होय. आई वडिलांची सेवा हाच परमार्थ आहे, असे शेवटी राजाभाऊ शिंदे यांनी सांगितले.शेवटी प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी चंद्रकांत कांबळे,अमित शिंदे, आजिनाथ कांबळे, शोभा शिंदे, राजेंद्र बनसोडे,जयश केदारे,धनाजी गायकवाड,जनार्दन शिंदे,दादा लोंढे, प्रदीप जाधव, भगवान खरात, रामभाऊ पवार, मारुती माढेकर, भीमराव लोंढे, धनाजी माने, कानिफनाथ आहिरे उपस्थित होते.



## महसूल सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल स्वप्नील कांबळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतून महसूल सहाय्यक (मंत्रालय) पदी निवड झाल्याबद्दल स्वप्नील कांबळे यांचा संत रोहिदास आश्रम शाळेत जय तुळजा भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कैलास सातपुते यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

स्वप्नील कांबळे याचे प्राथमिक शिक्षण घोटी जि.प.शाळेत झाले.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण जय तुळजा भवानी ज्यू. कॉलेज टेंभुर्णी येथे झाले.नंतर त्याने पंढरपुर तालुक्यात शेळवे येथे इंजि.पूर्ण केले.२०२१ पासून त्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेची पुण्यात तयारी सुरू केली होती.तो आणखी दोन परिक्षेत ही उत्तीर्ण झाला असून अंतिम निकाल लागला नाही.भविष्यात त्याचे क्लास वन अधिकारी होण्याचे ध्येय आहे.घरची आर्थिक स्थिती अत्यंत बेताची असल्याने त्याचे मामा सतीस शिंदे यांनी त्यास प्रोत्साहन देऊन सर्वतोपरी मदत पुरविली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रशांत साळे, ऋषीकेश बोबडे, सचिव विलास सातपुते, प्राचार्या जयश्री गवळी, मुख्याध्यापिका संतोषी आगावणे,शुभम सातपुते,प्रशांत चौधरी, अधिक्षक सतीश शिंदे उपस्थित होते.

## अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त इंदूर ते चोंडी संदेश रथयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१६ फेब्रुवारी-**

१ एप्रिल ते ३१ मे असा ३००० कि.मी. चा प्रवास करून सासर ते माहेर संदेश रथयात्रा त्यांचा विचार कार्याचा प्रसार जागृती करत जाणार ३० जिल्हे ३०० तालुके आणि हजारो गावातून पोचणार आहे.

धर्म समाज दानधर्म आणी मंदिरांचे जीर्णोदरांचे लोकोपयोगी काम करणाऱ्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची यावर्षी ३०० वी जन्मतिथी आहे या निमित्ताने अनेक कार्यक्रमाचे आयोजन आहे यात एक भव्य दिव्य जनजागृती संदेश रथयात्रेचे आयोजन सकल धनगर मल्हार सेनेतर्फे संस्थापक अध्यक्ष प्रल्हाद सोरमारे हे या इंदूर ते चौंडी (सासर ते माहेर) जन्मस्थळ या संदेश यात्रेचे मुख्य आयोजक आहेत.

६० दिवस ही संदेश रथयात्रा चालणार आहे तरी सर्व समाजातील समाज बांधवांनी महिला भगिनींनी या रथयात्रेचे गावोगावी जंगी स्वागत करून बहुसंख्येने आपापल्या ठिकाणाहून सहभागी होण्याचे आवाहन लक्ष्मी संजय सरवदे यांनी केले आहे.

## दामाजी कारखान्याचा गुरुवारी गळीत हंगामाचा सांगता समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १६ फेब्रुवारी-**

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ सालच्या ३२ व्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ गुरुवार दि.२० फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता होणार असल्याची माहिती कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी दिली. सांगता समारंभ कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील यांच्या हस्ते व कारखान्याचे व्हाईस चेअरमन तानाजी खरात यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तसेच त्यानिमीत्त तत्पूर्वी दुपारी ३ वाजता कारखान्याचे संचालक गौडाप्पा गोविंद बिराजदार व त्यांच्या पत्नी यमुना गौडाप्पा बिराजदार या उभयतांचे हस्ते सत्यनारायण महापूजेचे आयोजन केले असल्याची माहितीही यावेळी त्यांनी दिली.

यावेळी पाटील म्हणाले, या गळीत हंगामामध्ये कारखान्याने दि. १५ फेब्रुवारी अखेर ८७ दिवसांत २,९०,५४० मे. टनाचे गाळप करुन सरासरी १०।२९ टक्के साखर उताऱ्याने २,९५,६५० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन केलेले आहे. या गळीत हंगामामध्ये सर्वच साखर कारखान्यांना ऊसाची समस्या भेडसावलेली आहे. तरीही इतर कारखान्याच्या तुलनेत संत दामाजी साखर कारखान्याने समाधानकारक ऊस गाळप केले आहे. कारखान्याने ३१ डिसेंबर २०२४ अखेर शेतक-यांची ऊस बिले अदा केली असून १ ते १५ जानेवारी २०२५ अखेरची तोडणी वहातूक बिलेही अदा केली आहेत. याशिवाय कामगारांचे पगारही महिन्याच्या महिन्याला अदा केले असलेची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी व्हाईस चेअरमन तानाजी खरात, संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द् लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, सिध्देश्वर आवताडे, अशोक केदार, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे

### मल्लिनाथ कल्याणशेट्टी; कल्याणशेट्टी विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ फेब्रुवारी-**

विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणानंतर उच्च शिक्षण घेऊन आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे, असे मत संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालय,अक्कलकोट येथे आयोजित केलेल्या इयत्ता १० वी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते.



यावेळी संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, ज्युनियर कॉलेज प्रमुख पूनम कोकळगी, संस्थेच्या सीईओ रुपाली शहा, सीनियर कॉलेज प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक विद्यार्थिनी वेदांती मसलेकर यानी केले. शुभांगी पाटील, मयुरी हळगोदे, श्रेया बिराजदार,साक्षी टोणपे, महेश्वर स्वामी, साक्षी बिराजदार, कृष्णा फुलारी या विद्यार्थ्यांनी अध्यापन केलेल्या शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केले. कल्पना स्वामी, पूनम कोकळगी व शांभवी कल्याणशेट्टी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप, राजकुमार गवळी, मनिषा दूधभाते, सागर मठदेवरु, निशिगंधा कोळी, विद्या बिराजदार, कुमार जाधव, शरणबसप्पा चानकोटे,दिपक गंगौंडा, सिद्रामप्पा पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन मयुरी हळगोदे व पूजा बंदीछोडे यानी केले तर आभार शुभांगी पाटील यानी मानले.

## शंकरराव मोहिते महाविद्यालयात मशरूम लागवड कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. १६ फेब्रुवारी-**

दर्जेदार स्पॉन वापरून मशरूमचा भविष्यामध्ये फायदेशीर व्यवसाय करता येईल असे मत डॉ.टी.एस.रोडगे यांनी व्यक्त केले. शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये वनस्पतीशास्त्र विभागामार्फत मशरूम लागवड या संबंधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून अनगर येथील बाबुराव पाटील आर्ट्स अँड सायन्स महाविद्यालयाचे प्रा.डॉ.टी.एस रोडगे हे होते.



त्यांनी या कार्यशाळेमध्ये मशरूमचे प्रकार आणि त्याची उपयुक्तता याविषयी माहिती देऊन मशरूम लागवडीविषयी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.तसेच या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.टिळेकर यांनी नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० मध्ये शासन कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम समाविष्ट करीत आहे तरी विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे कोर्सेस करून कौशल्य विकसित केली पाहीजे.असे मनोगत व्यक्त केले.या प्रास्ताविक डॉ.एस.एम सातपुते यांनी केले. ही कार्यशाळेस शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील,सचिव अभिजीत रणवरे व सहसचिव हर्षवर्धन खराडे- पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन प्रा.पी.एम.धाईंजे यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार प्रा.व्ही.एम.कुंभार यांनी मानले.ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ.एस.एच.वाघ, प्रा.डी.एफ.देशमुख,ए.ए.साठे आणि प्रयोगशाळा परिचारक बी.बी.कदम यांचे सहकार्य लाभले

## सांगोल्यात शिवजन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

### सांगोला शिवप्रेमी मंडळांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १६ फेब्रुवारी-**

सांगोल्यात शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त दि. १८ ते २२ फेब्रुवारी दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शिवप्रेमी मंडळ, सांगोला यांनी दिली.

मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी सायं. ६ वा. महात्मा फुले चौक येथे महात्मा फुले पुतळ्यास पुष्पहार अर्पण व अभिवादन, संध्या.७ वा. छत्रपती शिवाजी महाराजांची शिवमुर्ती प्रतिष्ठापना, संध्या.८ वा. मुली व महिलांसाठी पारंपरिक वेशभूषा स्पर्धा, संध्याकाळी १० वा. छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा व स्फूर्ती गीते, बुधवार दि.१९ फेब्रुवारी रोजी स.६ वा. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस अभिषेक व पूजन,सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व कार्यक्रमास सुरुवात होईल.



तसेच स.९ वा. सांगोला शहरातील व तालुक्यातील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या सर्व गुणवंत खेळाडूंचा सत्कार, स.९:३० वा. सांगोला शहरातुन सर्व महापुरुषांना अभिवादन व भव्य दिव्य रॅली तसेच सर्व शिवप्रेमी महिलांच्या वतीने सांगोला मुकबधीर शाळा व वृध्द आश्रम येथे खाऊ, शालेय वह्या, पुस्तक तसेच विविध वस्तू वाटप करण्यात येणार आहे. दि.२१ फेब्रुवारी रोजी सायं.६ वा. जागर ग्रामीण साहित्याचा, शनिवार दि.२२ फेब्रुवारी रोजी स.९ ते सायं.६ वाजेपर्यंत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर, रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. वरील सर्व कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज चौक शिवतीर्थ सांगोला येथे आयोजित करण्यात आले असल्याची माहिती शिवप्रेमी मंडळ, सांगोला यांनी दिली.

#### शिवकालीन शस्त्रांचे भव्य प्रदर्शन

छत्रपती शिवाजी महाराज चौक शिवतीर्थ सांगोला येथे दि .२० व २१ फेब्रुवारी रोजी शस्त्र संग्रहक माधवराव उत्तमराव देशमुख, एकविराई मर्दानी आखाडा, बार्शी, जि.सोलापूर यांचे स.९ ते ५ वा. पर्यंत शिवकालीन शस्त्रांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.



## न्यू इंग्लिश स्कूल प्रशालेत वार्षिक पारितोषिक वितरण

**करकंब, दि. १६ फेब्रुवारी-**

न्यू. इंग्लिश स्कूल प्रशालेत जिल्हा व राज्यस्तरावरती डॉ. होमीबाबा विज्ञान स्पर्धा, स्काऊटगाईड, क्रीडा स्पर्धा, एनएमएमएस या विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी दत्तात्रेय नरसाळे संचालक विठ्ठल सहकारी साखर कारखाना गुरसाळे,शिक्षक अनिल कवडे उपाध्यक्ष शिक्षक पालक संघ, अमोल शेळके अध्यक्ष अभिछाया प्रतिष्ठान करकंब या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत व आदिनाथ देवकते मार्गदर्शक चेतना विकास मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी अविनाश देवकते, संजीव म्हेत्रे, दिलीप पुरवत, प्रशांत वेळापूरकर, मुख्याध्यापिका संगीता करमाळकर उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## नळदुर्ग येथे संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ फेब्रुवारी -**

सेवालाल महाराज की जयच्या जय घोषात श्री सेवालाल महाराज यांची जयंती नळदुर्ग येथे मोठया उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली.

यावेळी अमृता देवेद्र फडवणीस यांनी गायलेल्या बंजारा गीतावर पारंपारीक वेशभुषेत बालिकांनी नृत्य् सादर केले. तर याच गीतावर जि.प.च्या माजी उपाध्यक्षा अर्चना पाटील यांनी महिला समवेत बंजारा वेशभुषा पारीधान करून उत्साहात नृत्य सादर केले. नळदुर्ग येथील कै. वसंतराव नाईक (गोलाई) चौकात शनिवार रोजी सकाळी ११ वाजता सदगुरू श्री. सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर भोगचा कार्यक्रम होऊन ध्वजारोहन करण्यात आले. यानंतर अक्कलकोट रोड येथुन रॅली काढण्यात आली.

रॅलीचे विसर्जन करण्यात आले. या रॅलीत महिला युवक पुरूष पारंपारिक वेशभुषेत मोठया प्रमाणावर सहभागी झाले रॅली दरम्यान सहाय्य्क पोलिस निरिक्षक कांगुने यांनी प्रतिमेचे पुजन केले. त्यानंतर महाप्रसादाचे उपस्थितांना वाटप करण्यात आले.

यावेळी बंजारा समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त...



## ओलंपियाड परिक्षेत विवेकानंदला सुवर्णपदक

**उमरगा, दि.१६ फेब्रुवारी -**

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या आठ विद्यार्थ्यांनी इंग्लिश ओलंपियाड परीक्षेत सुवर्णपदक पटकावले. ८ ऑक्टोबर २०२४ रोजी इंग्लिश ओलंपियाड परीक्षा घेण्यात आली होती. त्यावेळी या शाळेतील ३० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ते सर्वजण उत्तीर्ण झाले असून, त्यातील आठ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक प्राप्त केली आहे. ऑलिंपियाड परीक्षा अनेक विषयात घेतली जाते. या परीक्षेची तयारी येथील शिक्षक अतिरिक्त तास घेऊन विद्यार्थ्यांची तयारी करून घेतात. यामध्ये विभाग प्रमुख गोविंद जमादार, बाह्य परीक्षा प्रमुख वर्षा शाही वाले, प्रणित सूर्यवंशी व इतर शिक्षक तयारी करून घेतात. त्यांच्या या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष डॉक्टर चंद्रकांत महाजन, संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन दंडगे, कार्यवाह डॉ. कपिल महाजन, मुख्याध्यापिका सविता लोहार, गोपाळ आष्टे, दत्तात्रय कोकणे यांनी मार्गदर्शक शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



## ‘तेरणा’त सेवालाल महाराज जयंती साजरी

**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

तेरणा महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक घोलकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. सुधाकर चव्हाण यांनी संत सेवालाल महाराज यांच्या सामाजिक कार्याचा संदेश विद्यार्थ्यांना आपल्या व्याख्यानांमधून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभम काशीद यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ. अविनाश ताटे यांनी मांडले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. चंद्रजीत जाधव, डॉ.डी.बी. मोरे, डॉ. तुळशीराम उकिरडे, डॉ. अनघा तोडकरी, डॉ. सुशिलकुमार सरवदे, प्रा. संतोष जाधव, डॉ. नंदा उबाळे, डॉ. मंजुषा बाबजे, डॉ. सुनील पाटील, प्रा. उत्रेश्वर तवले तसेच विविध विभागातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, विद्यार्थिनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नॅचरल स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन

**कळंब, दि.१६ फेब्रुवारी -**

कळंब तालुक्यातील घारगांव येथील येथील नॅचरल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले यावेळी चिमुकल्यांनी खंडोबा गीत व महा कुंभमेळा अशा अनेक गाण्यातील वेशभूषा करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नॅचरल उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष माननीय कृषिरत्न बी.बी ठोंबरे साहेब व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नवनियुक्त उपजिल्हाधिकारी डॉक्टर महेश अरविंद घाटुळे हे उपस्थित होते. यावेळी नॅचरल शुगरचे संचालक ए.बी. ठोंबरे, कृषिभूषण पांडुरंग आवाड, नॅचरल डेअरी विभागाचे श्रीपाद ठोंबरे, नॅचरल इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कापसे, साई कॉलेजचे प्राचार्य जगदीश गवळी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे उप मुख्याध्यापक प्रशांत गायकवाड, बाळासाहेब पाखरे, किरण गंभीरे, गोविंद सोमवंशी, ज्ञानेश्वर वाबळे, दिनकर घाटुळे, भाग्यश्री तांबवे, इरफाना शेख, पुनम डावखरे, भाग्यश्री सरवदे, जयश्री पवार, पुनम वराडे, स्वाती पवार, सुनिता भिसे आदींनी परिश्रम घेतले.

### आता तुळजापुरात कौशल्य विकास विद्यापीठ...

# तांत्रिक सहकार्यासाठी सिम्बायोसिस विद्यापीठासोबत तुळजाभवानी मंदिर समितीचा करार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

येत्या काळात धाराशिव जिल्ह्यात अपारंपारिक ऊर्जा, टेक्निकल टेक्स्टाईल उत्पादन, कृषिपुरक उद्योग त्यासोबतच पर्यटन वाढीला मोठा वाव मिळणार आहे. स्थानिक युवकांना जिल्ह्यातच हक्काच्या रोजगार संधी उपलब्ध व्हाव्या यासाठी आपण तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात कौशल्य विकास विद्यापीठ सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. पुणे येथील जगप्रसिद्ध सिम्बायोसिस कौशल्य आणि व्यवसायिक विद्यापीठाकडून त्यासाठी तांत्रिक सहकार्य घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार तुळजाभवानी मंदिर समितीने बुधवार १२ फब्रुवारी रोजी सिम्बायोसिस कौशल्य विकास विद्यापीठासोबत तांत्रिक सहकार्य कराराची प्रक्रिया पूर्ण केली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव जिल्ह्यात महायुती सरकारच्या माध्यमातून तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, अजितदादा पवार यांच्या सहकार्याने अनेक महत्वाचे प्रकल्प मोठ्या गतीने पुढे जात आहेत. विविध योजना, प्रकल्प, उद्योग आणि पर्यटनाच्या माध्यमातून जिल्ह्यात ३५ हजार रोजगार निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आपण डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यानुसार पुढील एक-दोन वर्षात आपल्याला मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ लागणार आहे. त्यासाठी स्थानिक युवकांना आधुनिक, एकात्मिक आणि व्यापक



> **कौशल्य विद्यापीठामुळे मोठ्या रोजगार संधी : आ. पाटील**
>
> कौशल्य विद्यापीठ हे उच्च दर्जाचे कौशल्यपूर्ण आणि रोजगारक्षम तरुण निर्माण करण्यासाठी, रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि उच्च दर्जाचे कौशल्य शिक्षण, स्टार्टअप्स, इनक्युबेशन, रोजगारक्षमता, प्रशिक्षण, समुपदेशन, नोकरीवर आधारित प्रशिक्षण, याला प्रोत्साहन देण्यासाठी एक विशेष विद्यापीठ असणार आहे. त्यातून प्लेसमेंटही मोठ्या प्रमाणात होणार आहे. प्रशिक्षणानंतर, मूल्यांकन यंत्रणेमार्फत मूल्यांकन करून पात्र तरुणांना हक्काचा रोजगार मिळण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार असल्याचा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

असे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन कौशल्यधारीत शिक्षणाद्वारे रोजगारक्षम बनवण्यासाठी तुळजापुरात कौशल्य विकास विद्यापीठाची स्थापना करण्याची संकल्पना आपण मांडली होती. ती पूर्णत्वाला नेण्यासाठी सिम्बायोसिस कौशल्य विकास विद्यापीठ आणि तुळजाभवानी मंदिर समिती यांच्यात कौशल्य विद्यापीठ उभारणीसाठी तांत्रिक सहकार्य कराराची प्रक्रिया बुधवारी पूर्ण झाली. त्यामुळे रोजगार निर्मितीच्या दृष्टीने एक महत्वपूर्ण टप्पा आपण पूर्ण केला असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

तुळजापूर येथे कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्याचा अनुषंगाने पुणे येथील जगप्रसिद्ध सिम्बायोसिस कौशल्य आणि व्यवसायिक विद्यपीठचा मागील महिन्यात आपण दौरा केला होता. विद्यपीठाच्या प्र. कुलगुरू डॉ. स्वाती मुझुमदार यांच्याकडून सिम्बायोसिसमार्फत चालविल्या जात असलेल्या कौशल्य विकास विद्यापीठाची इत्यंभूत माहिती जाणून घेतली होती. या कौशल्य विद्यापीठात कोणते अभ्यासक्रम आहेत, त्यांच्या उपक्रमांची रूपरेषा काय याचे विस्तृत सादरीकरणही सिम्बायोसिसच्यावतीने त्यावेळी करण्यात आले होते. त्याचवेळेस तुळजाभवानी कौशल्य विद्यपीठाचा मास्टरप्लॅन तयार करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यासाठी सिम्बॉयसिस विद्यापीठाने तांत्रिक सहकार्य करण्याचे उत्स्फूर्तपणे मान्य केले होते. त्यानुसार बुधवार १२ फब्रुवारी रोजी सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठ आणि तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यात सामंजस्य कराराची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. 'जावा' सारख्या कमी कालावधीच्या व लगेच नोकरी मिळेल अशा कोर्सची आता लगेच सुरुवात केली जाईल. त्यानंतर सिम्बायोसिसचे अनुभवी आणि तज्ञांचे पथक धाराशिव जिल्ह्यातील एकूण भौगोलिक परिस्थिती, जिल्ह्यातील शेती आणि त्यावर आधारित शेतीपूरक उद्योग आदी बाबींची सखोल माहिती घेऊन कृषी-व्यवसाय, पर्यटन आणि अपारंपारिक ऊर्जा सारखे डिप्लोमा/प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार करण्यास मदत करणार आहेत. येणाऱ्या दोन महिन्यांमध्ये तातडीने लागणाऱ्या कुशल मनुष्यबळ उपलब्धतेसाठी अल्पकालीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत, त्यासाठी विशेष तज्ञांचा समावेश असलेली समितीही गठीत करण्यात आली असल्याची माहिती आ. पाटील यांनी दिली आहे.

## आगी मधमाशांच्या चाव्याने शेतकऱ्याचा मृत्यु; तीघे जखमी

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१६ फेब्रुवारी -**

वाशी तालुक्यातील वडजी येथे आगी मधमाशांच्या चाव्याने एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी झाल्याची घटना दि.१४ फब्रुवारी रोजी घडली आहे. दशरथ जाधवर (वय ५६) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. चंद्रकांत मोराळे, तारामती जाधवर, लताबाई जाधवर अशी जखमींची नावे आहेत.



दरम्यान शेतात काम करत असताना साडेचार च्या सुमारास शेतातील काम आटपून झाडाखाली सर्वजण बसले असता अचानक आगी मधमाशांनी हल्ला केला. बचावासाठी सर्वांनी ज्वारी पिकामध्ये धावा घेतली. मात्र दशरथ जधावर हे पायांनी अपंग असल्याने त्यांना धाव घेता आली नाही. मधमाशांनी त्यांचा कडाडून चावा घेतला त्यात त्यांचा मृत्यू झाला.

दशरथ जाधवर हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी तेरखेडा येथील रुग्णालय दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान दशरथ जाधवर यांचा मृत्यू झाला. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्ताने किल्ले स्वच्छतेचा अभिनव उपक्रम...

## जिल्ह्यातील नळदुर्ग, परंडा किल्लयांची आज स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ फेब्रुवारी -**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. (एम.के.सी.एल.) यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने किल्ले स्वच्छता अभियानाचा अभिनव उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती एम.के.सी.एल. धाराशिवचे जिल्हा समन्वयक धनंजय जेवळीकर यांनी दिली. दि.१७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या अभिनव उपक्रमामध्ये जिल्हाभरातील जवळपास ४० संगणक प्रशिक्षण केंद्राचे एकूण ४०० विध्यार्थी सहभागी होणार आहेत. ज्यामध्ये किल्लयांवर असलेला कचरा, उगवलेले गवत यांची साफसफाई करण्यात येणार आहे.



संपूर्ण राज्यभरात शिवजयंती महोत्सव खूप मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रम राबवून साजरे केले जातात. आपल्या धाराशिव जिल्ह्यामधील विविध शहरातील उपक्रमांना आणि मिरवणूक कार्यक्रमांना राज्यभरातून नावाजले जाते. सारथी आणि एमकेसीएलच्या माध्यमातून किल्ले स्वच्छता आणि वारसा जपणूक या उपक्रमाद्वारे नवीन पिढीला आपल्या किल्लयांबद्दल, आपल्या इतिहासाबद्दलची माहिती मिळावी आणि यातूनच या किल्लयांचा वारसा जपण्याची जबाबदारीही त्यांना कळावी असा उद्देश ठेवण्यात आला आहे. ऐतिहासिक वास्तू असलेल्या अशा किल्लयांची स्वच्छता, साफसफाई करण्याचे नियोजन सारथी आणि एमकेसीएलच्या वतीने संपूर्ण राज्यभरात करण्यात आले आहे.

आपल्या धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग आणि परांडा या दोन ठिकाणी ऐतिहासिक किल्ले असून या दोन्ही ठिकाणी ही सर्व संगणक प्रशिक्षण केंद्रे आणि त्यांचे विध्यार्थी मिळून हा उपक्रम राबवणार आहेत.

## रस्त्याच्या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व ठेकेदाराविरुद्ध कारवाई करा

### लोहगांव ग्रामस्थांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ फेब्रुवारी -**

लोहगाव ते नळदुर्ग रस्त्याच्या कामामध्ये दिरंगाई होत असल्याने समस्त लोहगाव ग्रामस्थांच्या वतीने दि.१८ फेब्रुवारी रोजी सकाळी साडे अकरा वाजता नळदुर्ग येथील आलियाबाद पुलावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे लेखी निवेदन धाराशिव जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, लोहगाव ते नळदुर्ग या रस्त्याचे काम गेल्या वर्षभरापासुन संथ गतीने सुरु असुन रस्त्यावर पडलेल्या खडीमुळे अनेक ठिकाणी अर्धवट निकृष्ट दर्जाच्या पुलाच्या कामामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकासह नागरीकांना नाहकच त्रास होत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुला चर मारून साईडपट्टी वरील झाडे व अतिक्रमण काढुन साईड पट्टी मोकळी करणे गरजेचे असताना आहे त्याच अरुंद रस्त्यावर खडी व दगड, गोटे टाकण्यात आल्याने वाहतुकीसाठी मोठा अडथळा निर्माण होत आहे.



एक वर्षापासुन रस्त्याचे काम रखडले असून कामात दिरंगाई केली जात आहे. परीणामी रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. तसेच बस सेवा बंद झाल्याने शालेय विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. याप्रकरणी अनेक वेळा संबंधितांकडे तक्रार करून सुद्धा संबंधित बांधकाम विभाग दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे नागरीकांतुन संताप व्यक्त केला जात आहे. त्यामुळे तात्काळ संबंधित बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी व ठेकेदाराविरुद्ध कारवाई करावी, या मागणीसाठी दि.१८ फेब्रुवारी रोजी आलियाबाद पुलावर रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचे म्हटले आहे.

निवेदनावर लोहगाव येथिल शिवसेना शाखाप्रमुख रविंद्र दबडे, सामाजिक कार्यकर्ते संजय घोडके, शालेय कमिटीचे अध्यक्ष राहुल शेंडगे, सामाजिक कार्यकर्ते मारुती बनसोडे, माजी ग्रामपंचायत सदस्य निजाम शेख, अरुण कदम, प्रभाकर कलशेट्टी यांच्यासह ५२ ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## खामसवाडीच्या येथे गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व विशेष नागरिक यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१६ फेब्रुवारी-**

खामसवाडी (ता.कळंब) येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत ८वी वर्गतील एन एम एम एस स्पर्धा परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा व युवा प्रशिक्षनार्थी शिक्षिका, कला शिक्षक यांचा शाळा व्यवस्थापन समिती व शाळेच्या वतीने गुणगौरव यथोचित सत्कार करण्यात आला.

जि.प. शाळेतील स्पर्धा परीक्षेतील यशाची परंपरा कायम असून यावर्षीही शाळेच्या आठवितील विद्यार्थ्यांनी बाजी मारली असून मुलींची संख्या वाढत आहे हे विशेष.

याच शाळेत मागील सहा महिन्यापासून मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी म्हणून उत्तम कार्य करणाऱ्या प्रियंका पवार व जि.प.प्राथमिक शाळेतील चव्हाण यांचा शाळेतर्फे पुष्पहार, शाल, श्रीफळ, साडी-चोळी देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

येथील इयत्ता १ लीचा वर्ग गुणवंत बनवण्यात महत्वाची भूमिका असणारे मार्गदर्शक शिक्षक अनंत बाबर त्याचबरोबर प्रशालेतील ८ वी एनएमएमएस स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करणारे शिक्षक सुधाकर सुरवसे, वाघमारे, तुकाराम सुरवसे, गव्हाणे यांचा सत्कार करण्यात आला.

# डिसेंबर २०२६ पर्यंत येडशी ते बोरगाव (काळे) रत्याचे चौपदरीकरण पुर्ण होणार : खा. ओम राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

टेंभुर्णी- लातूर या रस्त्यावरील येडशी ते बोरगाव (काळे) महामार्ग क्र.६३ या ३७ किमी लांबी व ५७४ कोटी रूपयाच्या होणाऱ्या चौपदरी रस्त्याच्या बाबत नागरिकांसमवेत परिसंवाद ढोकी येथे पार पडला.

सदरील रस्ता पश्चीम महाराष्ट्रास (पुणे-मुंबई) व मराठवाडयास जोडणारा आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.६३ वरील जवळा (दु) ता.धाराशिव ते बोरगाव (काळे) जि.लातूर यासाठी भूप्रष्ठ व राजमार्ग केंद्रीय मंत्रालय नवी दिल्ली यांनी २० डिसेंबर २०२४ ला मंजुरी दिलेली आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ येडशी येथील बार्शी रोडच्या उड्डानपुलापासून येडशी गावास बायपास रस्ता होणार असून तो पुढे येडशीच्या बाहेर लातूर रोडला जोडला जाणार आहे. तसेच ढोकी येथे उड्डानपुल होणार असून कसबे तडवळे येथे गावातून जाणार आहे. पुढे ढोकी येथे कळंब चौक येथे उड्डाणपूल होणार असून त्यामुळे ढोकी येथील मुख्य चौकातील ट्रॉफीक व होणारे अपघात टळणार आहेत. या महामार्गावर १२ बसस्थानके होणार आहेत. या रस्त्याची निवीदा प्रक्रीया सुरु असून दि.१७ फेब्रुवारी रोजी या महामार्गाची निवीदा उघडली जाणार आहे. त्यानंतर पुढील चार महिण्यात सर्व कायदेशीर प्रक्रीया पुर्ण होवून पुढील ४ महिण्यात कार्यारंभ आदेश पात्र कंत्राटधारकाला दिला जाणार आहे व त्याची मुदत ही १८ महिण्याची राहणार आहे. त्यामुळे साधारणतः डिसेंबर २०२६ पर्यंत हा रस्ता पुर्ण चौपदरीकरण होणार आहे.



या रस्त्यामध्ये लहान पूल ८ व अन्य नळकांडी पुल होणार आहेत. या रस्त्याच्या कामासाठी ढोकी गावात उड्डानपुलाच्या शेजारी दोन्ही बाजूस ४ मिटरचे भुसंपादन होणार असून त्यासाठी २.८० हे भूसंपादन होणार आहे. या महामार्गावर रहदारीची मोठी समस्या कायम सतावत होती व त्यामुळे मोठया प्रमाणावर अपघात देखील यापुर्वी घडलेले आहेत. या रस्त्यामुळे वाहतूक व्यवस्था सुरळीत होणार असून इंधन आणि वेळेची बचत होणार आहे. लातूर ते टेभुर्णी हे अंतर या चौपदीकरणाच्या कामामुळे कमी वेळेत व कमी खर्चात पुण्याला जाण्यासाठी सोईचे ठरणार आहे.

या परीसंवादासाठी या महामार्गाचे कार्यकारी अभियंता सुमंत व कंसल्टंट तसेच ढोकी येथील माजी सरपंच समुद्रे, संग्राम देशमुख, तुळशीदास जमाले, चंद्रप्रकाश जमाले, गजेंद्र नलावडे, तानाजी जमाले, विशाल जमाले, डॉ. चांडक तवले, बी.एन. डोंगरे, विनोद थोडसरे, मुरलीधर लोमटे, शकील काझी, शाकेर शेख, सुनिल नाईकनवरे, धाबेकर सरपंच तसेच येडशी, तडवळे, दुधगाव, ढोकी, कोल्हेगाव, ढोराळा व मुरुड येथील प्रतिष्ठीत नागरीक व व्यवसायीक मोठया संख्येने उपस्थीत होते.

सन २०१९ ला लोकसभा सदस्य झाल्यापासून या महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी सतत संबंधीत खात्याशी पाठपुरवा केल्याने हा रस्ता पुर्ण होत असल्याचे समाधान व आनंद नागरीकांच्या माध्यमातून व्यक्त होत आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## साहेब आमच्या घरी काय साखर कारखाना आहे का?

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१६ फेब्रुवारी -**


महावितरण कंपनीच्या अनागोंदी कारभाराचा फटका सर्वसामान्य ग्राहकांना बसत असून तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ व परिसरात अनधिकृत वीज वापर सुरू असल्याची जोरदार चर्चा चालू असूनही महावितरण कुठलीही ठोस कारवाई करत नसल्याने जे ग्राहक रेग्युलर बिल भरत आहेत त्यांना अव्वाच्या सव्वा बिल येत आहे. यामुळे गोरगरीब सर्वसामान्य ग्राहक साहेब आमच्या घरी काय साखर कारखाना आहे का? आमच्याकडूनच अनधिकृत वीज वापरनाऱ्याचीही वसूली करनार आहात काय असा आर्त टाहो फोडला जात आहे.

मंगरुळ व परिसरात अनेक ग्राहक अनधिकृत (आकडे) वीज वापरत असल्याचे दिसून येत असूनही महावितरण कुठलीही कारवाई करत नसल्याचे निदर्शनास येत आहे. मंगरुळ महावितरण शाखेअंतर्गत जवळपास तीस गावे, वाडी, वस्त्या येत असून तब्बल तीन-चार कोटी रुपयांची थकबाकी असल्याचेही ऐकावयास मिळत आहे. तसेच एकाएका ग्राहकांकडे तब्बल तीन ते चार लाख रुपयांची थकबाकी असल्याचीही माहिती प्राप्त झाली आहे. येवढी मोठी थकबाकी होई पर्यंत महावितरणचे वरिष्ठ अधिकारी काय करत होते असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याच्यामुळाशी जाऊन याचा सोक्षमोक्ष लावावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.



# विद्युत महामंडळ कर्मचारी अधिकाऱ्यांचा कामात हलगर्जीपणा; नागरिकांचे कार्यालयाला हेलपाटे



## ▶▶ विद्युत महामंडळाचे उप कार्यकारी अभियंता विजय सूर्यवंशी यांच्या कक्षाला कार्यालयीन वेळेत नेहमीच कुलूप...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ फेब्रुवारी -**

विद्युत वितरण महामंडळाचे उप कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता तसेच लाईनमेन आणि सर्वच कर्मचारी अधिकारी यांचे कर्तव्य बजावत नसल्याने दि.१८ फेब्रुवारी वार मंगळवार रोजी येथील सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे व अपसिंगा रोड येथील वंदे मातरम नगर येथील विद्युत महामंडळाचे सर्व ग्राहक महावितरण कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करणार आहेत.

विद्युत महामंडळाचे उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी सहाय्यक अभियंता किशोर वाकुरे हे दोघेही मेन अधिकारी सकाळी ऑफिसच्या टायमात गैरहजर राहतात. तालुक्यातील गोरगरीब शेतकरी आणि नागरिकांचे हे अधिकारी फोन उचलत नाहीत म्हणून चार पैसे खर्चून तालुक्याच्या ऑफिसला येतात. पण कार्यालयीन वेळेत देखील हे अधिकारी कार्यालयात नसतात त्यामुळे नागरिक ऑफिसमध्ये हेलपाटे घालून त्रस्त झाले आहेत.

**१८ फेब्रुवारीला महावितरण कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण...**

व नेमून दिलेले लाईन मेन ग्राहक तक्रार नंबर बंद ठेवतात अधिकारी व लाईन मेन अधिकाऱ्याची नेमणूक दिलेले काम व्यवस्थित रीतीने पार पाडत नाहीत.

रात्रीच्या सुमारास लाईन मेन फ्युज कॉल नंबर बंद ठेवून घरी झोपतात व ग्राहकाला कुठले तरी कारणे सांगून काम करण्यास टाळाटाळ करतात असे पुरावे व्हिडिओ रेकॉर्डिंग देखील पांढरे यांच्याकडे उपलब्ध आहेत. महाराष्ट्राचे कुलदैवत आई तुळजाभवानी मंदिर असल्याने येथे दररोज हजारो ते लाखो भाविक दर्शनासाठी येतात. जर काही मोठी दुर्घटना झाली तर याला जबाबदार अधिकारी शहरातील मुख्यालयाच्या ठिकाणी न राहता परगावी राहून ड्युटी येजा करून करतात.

अशा अधिकारी लाईनमेन यांच्यावर कठोर स्वरूपाची कारवाई करून त्यांना व्यवस्थित रीतीने काम करण्यास कार्यकारी अभियंतांनी समज द्यावी म्हणून सदरील उपोषण करण्यात येत असल्याचे वंदे मातरम नगर येथील रहिवाशांनी सांगितले.

# विभागीय क्रीडा स्पर्धांचे पारितोषिक वितरण



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग यांच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचलनालय अंतर्गत येणाऱ्या मराठवाडा विभागातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा बक्षीस वितरण समारंभ रुपामाता परिवाराचे मॅनेजिंग डायरेक्टर ॲड. अजित व्यंकटराव गुंड यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी भाई उद्धवराव पाटील यांचे वंशज आदित्य पाटील, राज्यस्तरीय सुवर्णपदक विजेता विजय ढगे, कॅन्टन इलेक्ट्रिकलचे अभिजीत मोरे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण अवताडे, खेळात देशातली पहिली डॉक्टरेट मिळवणारे डॉ. विलास जोंधळे, प्रेरणा युथ फाऊंडेशनचे नितीन खंडागळे, गणेश इंगळगी, मेघराज बागल, मुदस्सिर शेख, अशितोष नाईक, चेतन भद्रे, अविनाश खांडेकर हे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना रूपामाता परिवाराचे मॅनेजिंग डायरेक्टर ॲड. अजित व्यंकटराव गुंड म्हणाले की २००३ साली स्थापन झालेला रुपामाता परिवार आज वटवृक्षात रूपांतरीत झालेला आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून आम्ही समाजातल्या सर्व क्षेत्रातील बांधवांना मदत करण्याचा प्रयत्न करत असतो. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर आयटीआय सक्षम केले पाहिजे. त्यांचे आधुनिकरण केले पाहिजे. यासाठी जी मदत हवी असेल ती रुपामाता परिवार नक्की करेल. आज नोकरी हवी असेल तर प्रत्येकाला स्किल पाहिजेच.

आयटीआय हेच आर्थिक उपजीविकेचं साधन आहे. मी सर्वांना आत्मनिर्भर धाराशिव करण्याचं आवाहन करतो. त्यासाठी पुढे या व कौशल्य आत्मसात करा. आयटीआय धाराशिवचे डॉ. किरण झरकर हे रूपामाता परिवाराचे अविभाज्य घटक आहेत.

त्यांच्या रूपान धाराशिव आयटीयाला नवनवीन उपक्रम येत आहेत. येथील विद्यार्थ्यांना घडवण्याचं मोलाचे कार्य ते करत आहेत. सर्वांनी याचा नक्कीच आदर्श घेतला पाहिजे. तसेच जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांनी हा विभागीय क्रीडा स्पर्धा व तंत्र प्रदर्शन कार्यक्रम पहिल्यांदाच धाराशिव येथे घेतला. त्यांचे कार्य धाराशिवसाठी गौरव पुर्ण राहिले.

यावेळी सर्व विजेत्या खेळाडूंना बक्षीस वाटप करण्यात आले. मुलांच्या खेळात क्रिकेटमध्ये विजेता लातूर, उपविजेता छत्रपती संभाजी नगर, खोखो मध्ये विजेता लातूर उपविजेता छत्रपती संभाजी नगर, हॉलीबॉल मध्ये विजेता लातूर उपविजेता धाराशिव यांनी पारितोषिक पटकावले.

मुलींच्या सांघिक खेळात क्रिकेट मध्ये विजेता लातूर उपविजेता जालना, हॉलीबॉल विजेता लातूर उपविजेता धाराशिव, खोखो विजेता जालना उपविजेता बीड, हॉलीबॉल विजेता बीड उपविजेता धाराशिव यांनी पारितोषिके पटकावली. यांना सांघिक खेळासाठी ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी डॉ. किरण झरकर, मनोज चौधरी, पुनम जेउघाले यांनी सूत्रसंचालन केले. यासाठी अनेक प्राचार्य, गटनिदेशक, शिल्प निदेशक, कर्मचारी वृंद, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, तेरणा युथ फाऊंडेशन स्वयंसेवक यांनी मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला. या भागातील हजारो क्रीडाप्रेमींनी खेळाचा व भोजनाचा आस्वाद घेतला.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त नळदुर्गमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ फेब्रुवारी -**

नळदुर्ग येथे दि.१९ फेब्रुवारी रोजी राजमाता जिजाऊ माँ साहेब, छत्रपती शिवाजी महाराज व युगपुरुष श्री स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त जयहिंद प्रतिष्ठानच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले असुन शहरातील युवकांनी या रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन जयहिंद प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक संजय बताले यांनी केले आहे.

यावर्षी दि.१९ फेब्रुवारी रोजी राजमाता जिजाऊ माँ साहेब, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व युगपुरुष श्री स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तसेच युवा दिनाचे औचित्य साधुन जयहिंद प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक संजय बताले यांनी नळदुर्ग येथील श्री मल्लिकार्जुन मंदिर सभागृहात सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. त्यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारे हे आठवे रक्तदान शिबीर आहे.

दि.१९ फेब्रुवारी रोजी नळदुर्ग येथे आयोजित केलेल्या भव्य रक्तदान शिबिरात शहरातील युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या राष्ट्रीय एकात्मिक कार्यक्रमात रक्तदान करावे, असे आवाहन जयहिंद प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक संजय बताले यांनी केले आहे.

## पत्रकार दिनेश सलगरे यांची महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१६ फेब्रुवारी -**

इटकळ येथील ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष दिनेश सलगरे यांची महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी शनिवार दि.१५ फेब्रुवारी रोजी सोलापूर येथे आयोजित कार्यक्रमात निवड करण्यात आली.

यावेळी लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके राष्ट्रीय उपाध्यक्ष संदिप जाधव, श्रद्धा कंदुडे, संध्या सरोदे यांची उपस्थिती होती. पत्रकार दिनेश सलगरे हे गेल्या वीस वर्षांपासून इटकळ ग्रामीण पत्रकार म्हणून सोलापूर दै. तरूण भारतमध्ये काम करतात. सर्व सामान्यांच्या न्याय हक्कासाठी प्रयत्नशील राहत सकारात्मक लिखाणातून नेहमीच लहान सहान उद्योग व्यावसायिकांना प्रोत्साहित करीत सामाजिक व धार्मिक कार्यातून समाज प्रबोधनाचे ही उत्कृष्ट असे काम सातत्याने करतात त्यांच्या या कामाची दखल घेत महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य यांनी सलगरे यांची धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी निवड केली आहे. निवडी नंतर पत्रकार दिनेश सलगरे यांनी भविष्यात लोकशाही पत्रकार संघाचे ध्येय उद्दिष्ट समोर ठेऊन संघटना वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे ही बोलताना सांगितले.

पत्रकारसलगरे यांची लोकशाही पत्रकार संघाच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याने मित्र परिवार व गाव परिसरातून कौतुक केले जात आहे.

# स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या कार्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे अनावरण

## ▶▶ मध्यवर्ती शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त भवानी तरुण मंडळ व जाणता राजा युवा मंडळाचा उपक्रम ...



### विविध कार्यक्रमांचे आयोजन...

मंगळवार, १८ फेब्रुवारी २०२५ सकाळी ८ वाजता कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी चरणी महाअभिषेक, सकाळी ११ वाजता मंडळाचे जेष्ठ सभासदांच्या हस्ते ध्वजारोहण, सायं. ४ वाजता श्रीराम ढोल ताशा पथक यांची श्रींना मानवंदना, सायं. ५ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती उत्सव मूर्तिसि १०८ महाकुंभांचा अभिषेक, १००८ सुवर्ण, होणांचा अभिषेक आणि १००८ किलोंची पुष्पवृष्टी, सायं. ६ वाजता पारंपारिक वाद्यात श्री च्या मूर्तीचा प्रतिष्ठापणा सोहळा, सायं. ७ वाजता शिव शाहीर सुरेश जाधव (छत्रपती संभाजीनगर) यांचा पोवाडा. बुधवार, १९ फेब्रुवारी सकाळी ८ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्यास दुग्धाभिषेक व मानवंदना, नगर प्रदक्षिणा, सकाळी ११ वाजता शिवराय मनामनात शिवजयंती घराघरात या संकल्पनेने ५०१ मूर्तीचे घरोघरी वाटप. शनिवार, २२ फेब्रुवारी दुपारी ३ वाजता: पारंपारिक पध्दतीने भव्य मिरवणूक सोहळा. मंगळवार, २५ फेब्रुवारी सकाळी १० वाजता महाआरोग्य शिबीर.

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ फेब्रुवारी -**

श्री शिवजयंतीचे औचित्य साधून जय भवानी तरुण मंडळ व जाणता राजा युवा मंडळाच्या स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या केलेल्या कार्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे अनावरण शहरातील सर्व पत्रकार बंधू व मंडळाच्या जेष्ठ सभासदांच्या हस्ते दि.१२ फेब्रुवारी बुधवार रोजी करण्यात आले.

या सोहळ्याच्या आयोजनात शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याची महती, आपल्या परंपरेचा अभिमान आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला जातो. सगळ्यांना या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना सहभागी होण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले. मंडळाचे माजी अध्यक्ष अमोल कुतवळ यांनी मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती उपस्थित पत्रकारांना दिली. यावेळी मंडळाचे माजी अध्यक्ष अमोल कुतवळ, अध्यक्ष सुदर्शन वाघमारे, ज्येष्ठ सभासद अंबादास पोपळे, राजेश देशमुख, महेश पुजारी, शुभम दहीहांडे, शुभम खोले, अजिंक्य मस्के, आदित्य बुरांडे, विराज कदम, अभिजीत कुतवळ, राहुल भालेकर, पृथ्वीराज मलबा, प्रसाद प्रयाग, ऋषिकेश साळुंखे, राजाभाऊ चोपदार, बापू साखरे, दुर्गेश वराडे, नागेश किवडे, अनंत कोळगे, स्वप्नील पाठक, अक्षय सुरवसे, गौरव साळुंके, बालाजी भूमकर, नितीन मस्के, सचिन खोले, पुरंजन कोंडो, राजीनिकांत शिंदे, शशिकांत मस्के, संदीप जोशी, प्रतिक प्रयाग, अनमोल साळुंके, महेश शिंदे, सागर डोके, सारंग कावरे, योगेश पाठक, तानाजी साळुंके, सोमनाथ मस्के, विशाल जाधव, सागर मस्के, ओम यादव, रोहित भोसले, अनिकेत बर्वे, संजय देवळालकर, परीक्षित साळुंके, अनिमेश बर्वे, संकेत मस्के यांच्यासह सर्व सदस्य उपस्थित होते.

# जागजी येथे रेडिओ किसान दिन उत्साहात साजरा; शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद






**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ फेब्रुवारी -**

आकाशवाणी धाराशिव केंद्र आणि कृष्णाई सेंद्रिय शेती गट यांच्या संयुक्त विद्यमाने १५ फेब्रुवारी हा दिवस रेडिओ किसान दिन म्हणून जागजी (ता.जि.धाराशिव) येथे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघ (पुणे)चे संचालक आणि सोलापूर विभागाचे अध्यक्ष राजेंद्र देशमुख होते, तर उद्धाटक म्हणून एन.व्ही.पी. शुगर प्रा.लि.चे चेअरमन नानासाहेब पाटील यांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी प्रमोद राठोड, पंचायत समितीचे अधिकारी एम.एस. पवार, महाराष्ट्र द्राक्ष बागायत संघचे संचालक राजाभाऊ शेळके, हनुमंतराव गवळी, प्रगतीशिल शेतकरी बाळासाहेब मळवदे, नितीन काशीद, विक्रम काकडे यांची तसेच धाराशिव शिवार सारथी शेतकरी उत्पादक कंपनीचे विकास गोडसे आणि अमोल निंबाळकर आदी मान्यवर मंडळींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून रेडिओ किसान दिन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटक तथा एनव्हीपी शुगर प्रा.लि. चेअरमन नानासाहेब पाटील यांनी शेतकरी बांधवांना सेंद्रिय शेतीचे महत्व पटवून देऊन रेडिओ किसान दिनाच्या शुभेच्छा दिल्या, तर जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी प्रमोद राठोड यांनी कृषी विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती या वेळी देऊन सेंद्रीय शेती करणे काळाची गरज का आहे,

याबाबत विस्तृत माहिती दिली. मंजिरी बचत गटाच्या दिपाली थोडसरे यांनी शेतकरी महिला बचत गटाच्या वतीने करण्यात येत असलेल्या सामूहिक सेंद्रिय शेतीचे महत्व यावेळी विशद केले. यावेळी विकास गोडसे यांनी शंभर टक्के रासायनिक होत असलेल्या शेतिमुळे भविष्यातील होणारे दुष्परिणाम सांगताना सेंद्रीय आणि रासायनिक शेती यांचा योग्य समन्वय राखण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक राजेंद्र देशमुख यांनी त्यांच्या द्राक्ष शेतीची यशोगाथा सांगून आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या विविध शेतीविषयक आणि शेतकऱ्यांविषयी प्रसारीत होणाऱ्या कार्यक्रमांचा फायदा त्यांना कसा झाला. त्याबद्दल कथन केले.

तसेच नियोजनबद्ध द्राक्ष शेती केल्यास शेतकऱ्यांची उन्नती देखील कशी होते, याबद्दल यावेळी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत आकाशवाणी धाराशिव केंद्राच्या वतीने कार्यक्रम विभागप्रमुख किशोर पवार आणि जागजी येथील कृष्णाई सेंद्रिय शेती गटाचे अध्यक्ष विक्रमसिंह देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी आकाशवाणी धाराशिव केंद्राच्या किसानवाणी आणि घरशिवार कार्यक्रमाचे निवेदक संजय पाटोळे, दौलत निपाणीकर, पल्लवी निपाणीकर, स्नेहा टेपाळे आणि अनिता तांबे यांचा सन्मान चिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम विभाग प्रमुख किशोर पवार यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदक दौलत निपाणीकर यांनी केले.

उपस्थितांचे आभार कृष्णाई सेंद्रिय शेती गटाचे अध्यक्ष विक्रमसिंह ऊर्फ राजाभाऊ देशमुख यांनी मानले. रेडिओ किसान दिन कार्यक्रमास वषा देशमुख, सुभाष देशमुख, इंद्रसेन देशमुख, रमेश देशमुख आदी प्रगतीशिल शेतकऱ्यांबरोबरच जागजी परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाशवाणी अभियांत्रिकी विभागाचे मधुकर पवार आणि कार्यक्रम विभागातून आशिष लगाडे, शिवलीला शिवपुजे, सुवर्णमाला कांबळे,वैशाली महामुनी, प्रतिक्षा माने, श्वेता माळी, कांचन पाचकुडवे, श्रुती बनसोडे, पृथ्वीराज देशमुख, बालाजी कांबळे, विजय सरपाळे आदींनी परिश्रम घेतले.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## इटकळ केंद्रीय प्राथमिक शाळेत बाल आनंद बाजार संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१६ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील मौजे इटकळ येथे लहानांपासून आबालवृद्धांच्या उत्साहाला उधाण आले. निमित्त होते येथील जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळेतील विध्यार्थ्यांचा आनंद बाजार संपन्न झाला.

दि.१४ फेब्रुवारी रोजी प्रा.शा. इटकळ येथील मैदावरील आनंदबाजराचे आयोजन करण्यात आले. या आनंद बाजारात शाळेतील विध्यार्थ्यांनी पालेभाज्या, फळभाज्या, मिठाई तसेच विविध खाद्यपदार्थ, मनोरंजनात्मक खेळ, शालेय साहित्यांची वेगवेगळी दुकाने मांडली होती.

सरपंच साहेबराव क्षीरसागर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण म ाशाळकर उपाध्यक्ष समीर मुजावर, पो. स्टेशन इनचार्ज मायाचारी, पो. पाटील विनोद सलगरे, श्रीकृष्ण मुळे, फिरोज मुजावर, अम ेल पाटील, दादा भोपळे, दयानंद गायकवाड, हारून शेख, परमेश्वर हन्नूरे, हुसेन मकानदार, रफिक शेख, विजया कट्टे, पत्रकार दिनेश सलगरे, केशव गायकवाड, नामदेव गायकवाड या मान्यवरांच्या हस्ते आनंदबाजाराचे फित कापून उदघाट्न करण्यात आले.

बाल आनंद बाजार यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक तानाजी गायकवाड, बालाजी कदम, नागेश स्वामी, संगीता घुगे, वैशाली देशमाने,जया भोसले राजेश्री बागडे,संजविनी पेठे, आदींनी परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त...



### नवोदय विद्यालयात नुक्कड नाटकाद्वारे तणाव मुक्ती

**तुळजापूर, दि.१६ फेब्रुवारी -**
केंद्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्ड, दिल्ली. (CBSE) यांच्या दहावी व बारावीच्या परीक्षा शनिवार दि.१५ फेब्रुवारीपासून प्रारंभ होत आहे. यानिमित्ताने जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथे शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी नुक्कड नाटकाद्वारे दहावी व बारावी विद्यार्थ्यांच्या मनातील नुक्कड नाटकाद्वारे तणाव दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या नाटकाद्वारा विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे कसे जावे ? आत्मविश्वास कसा वाढवावा? परीक्षा म्हणजे सर्वस्व नसून केवळ गुणांसाठी असते. हे गुण म्हणजे सर्व काही नाही या व्यतिरिक्त मानवता व जीवन कसे महत्वपूर्ण आहे. हे सांगून बोर्डाची परीक्षा आनंदाने द्या. तणावमुक्त द्या. जीवनामध्ये अशा अनेक परीक्षा येत असतात यासाठी अंधश्रद्धाळू न बनता मोठ्या आत्मविश्वासाने व अभ्यासाने परीक्षेला सामोरे जाण्याचा संदेश या नुकड नाटकातून देण्यात आला. या नाटकाचे सादरीकरण वर्ग सातवी मधील सम्यक जाधव, रोहन माळी, आर्यन जगधने, आर्यन कुंभार, विकास ढोले, समर्थ साळुंखे विद्यार्थ्यांनी केले होते. या नाटकाचे मार्गदर्शन शिवकन्या कापरे समुपदेशन) यांनी केले होते. कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य चक्रपाणि गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी जाधव यांनी केले. शेवटी १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू-काश्मीरमधील पुलगाव हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना दोन मिनिटाचे मौन राखून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक वृंद उपस्थित होता.

#### शिरूर अनंतपाळ पोलिसांची धडक कारवाई...

## साकोळ गावात अवैध देशी दारू विक्री प्रकरणी तीन जणांवर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१६ फेब्रुवारी -**
तालुक्यातील साकोळ गावात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवैध देशी दारू विक्रीला आळा घालण्यासाठी शिरूर अनंतपाळ पोलिसांनी धडक कारवाई केली. १४ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून एकूण ९३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत तिघांवर गुन्हे दाखल केले.

साकोळ बिटचे पोहेका गोविंद मलवाडे यांनी ही कारवाई केली. शिरूर अनंतपाळ पोलिस ठाण्यातील पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली. आरोपी मल्लीकार्जुन परमेश्वर स्वामी (रा. साकोळ) याच्या घरासमोर देशी दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी धाड टाकली. त्याच्या ताब्यातून ९६ बाटल्या (एकूण किंमत ६,७२०) जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी पोहेका सचिन चामे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी प्रविण संभाजी सूर्यवंशी (रा. साकोळ) याच्यावरही बेकायदेशीर दारू विक्री प्रकरणी कारवाई करण्यात आली. त्याच्या ताब्यातून २३ बाटल्या (एकूण किंमत १,६१०) हस्तगत करण्यात आल्या. पोहेका गजानन अन्सापूरे यांनी फिर्याद दिली आहे.




आरोपी लक्ष्मण त्र्यंबक मादळे (रा. साकोळ) याच्या किराणा दुकानासमोर देशी दारू विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी धाड टाकली. त्याच्या ताब्यातून १४ बाटल्या (एकूण किंमत ९८०) जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी पोहेका कैलास तुकाराम शिंदे यांनी फिर्याद नोंदवली.

तिन्ही आरोपींवर मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५ (अ) (इ) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास पोहेका. गोविंद मलवाडे करत आहेत.

## मसलगा पाटीवर ट्रकचा भिषण अपघात; दोघांचा जागेवर मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१६ फेब्रुवारी -**
निलंगा तालुक्यातील मसलगा पाटीवर दि.१४ फेब्रुवारी २०२५ रोजी कर्नाटक पासींगची केए-३५ सी-९८४५ या ट्रकच्या भिषण अपघातात प्रशांत काशीनाथ चिंतामणी (वय २९) व अशोक वैजनाथ चिंतामणी (वय ३५, दोघे रा. काळे गल्ली बस्वकल्याण) दोघांचा जागेवर मृत्यू झाला तर एक गंभीर जखमी झाला.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, लातूर जहिराबाद हायवेवर निलंगा तालुक्यातील मसलगा पाटीवर बस्वकल्याणवरून लातुरच्या दिशेने सौर उर्जेचे लोखंडी गज घेऊन जाणाऱ्या ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रक रोडवरून खाली गेल्यामुळे ट्रकमधील लोखंडी गज कॅबीनवर आल्याने केबीनचा चुराडा झाला व केबीन मधील दोघांचा जागेवर मृत्यू झाला.

तर एक गंभीर जखमी झाला. घटना घडताच मसलगा येथील ग्रामस्थांनी जेसीबीच्या सहाय्याने गज बाजूला करून तीघांना बाहेर काढून रूग्नवाहीकेतून रूग्णालयात पाठवले.

यावेळी नागरिकांनी बघण्यासाठी गर्दी केली होती. निलंगा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधीर सुर्यवंशी, पोलीस जमादार सुनील पाटील आदीसह घटनास्थळी येऊन पाहणी करून घटनेची नागरिकांकडून माहिती घेतली.

तसेच रोडवरील वाहतूक सुरळीत केली.

## मतदारसंघातील विविध जलप्रश्नासंबंधी जलसपंदा मंत्र्यांना आ. निलंगेकरांचे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१६ फेब्रुवारी -**
निलंगा मतदारसंघातील बोरसुरी साठवण तलावाचे जलपूजन तसेच जलसंधारणासंबंधीच्या विविध कामांना मान्यता मिळावी, यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची माजी मंत्री आमदार संभाजी पाटील-निलंगेकर यांनी भेट घेऊन निवेदन दिले.

तसेच आपल्या मतदारसंघासह संपूर्ण लातूर जिल्ह्यामध्ये पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना व्हावी यासाठी जिल्ह्यात 'पाणी परिषद' घेण्याचा मानस असून त्यासाठी देखील त्यांनी वेळ द्यावी, अशी विनंती त्यांना केली असून वरील सर्व बाबींना अत्यंत सकारात्मक असा प्रतिसाद मंत्री विखे-पाटील यांनी दिला आहे. मतदारसंघातील बोरसुरी साठवण तलावाचे कंदरभरणीचे काम नुकतेच पूर्ण झाले असून २०२४ च्या पावसाळ्यामध्ये या तलावामध्ये प्रथमच पाणी साठवण्यात आलेले आहे. यामुळे आसपासच्या परिसरातील हजारो एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे.

याचबरोबर मतदारसंघातील मसलगा मध्यम प्रकल्प (निलंगा) व हाडगा लघु पाटबंधारे तलाव (ता. निलंगा) यांचे मातीकाम क्षतीग्रस्त झाल्यामुळे त्यामध्ये पाणी साठवणे अशक्य झालेले आहे.

त्यामुळे मतदारसंघातील सुमारे १० हजार एकर क्षेत्रास सिंचनाच्या पाण्यापासून २ वर्ष झाले वंचित रहावे लागत आहे. या प्रकल्पांना मंत्री महोदयांनी विशेष भेट देवून त्यांची दुरुस्ती करण्याचे दृष्टीने आवश्यक ते मार्गदर्शन जलसंपदा विभागाच्या संबंधीत अधिकाऱ्यायांना करावे.

निलंगा विधानसभा मतदारसंघातील मसलगा मध्यम प्रकल्प निलंगाच्या कालवा व वितरण प्रणालीची विशेष दुरुस्तीची कामे, हाडगा लघु प्रकल्प निलंगाच्या प्रकल्पाची विशेष दुरुस्ती कामे, निम्न तेरणा प्रकल्प निलंगाच्या कालवा व वितरण प्रणालीची विशेष दुरुस्ती अंतर्गत दुरुस्ती कामे, निम्न तेरणा प्रकल्प निलंगा विशेष दुरुस्ती अंतर्गत स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी संबंधीत दुरुस्ती कामे, भोपणी लघु पाटबंधारे तलाव देवणीच्या कालवा व वितरण प्रणालीच्या विशेष दुरुस्तीचे काम, घरणी मध्यम प्रकल्प शिरुर अनंतपाळ च्या कालवा व वितरण प्रणालीचे विशेष दुरुस्तीचे काम, पांढरवाडी लघु पाटबंधारे प्रकल्प शिरुर अनंतपाळ च्या कालवा व वितरण प्रणालीचे विशेष दुरुस्तीचे काम, कवठाळा जवळगा साठवण तलाव देवणीच्या विशेष दुरुस्तीचे काम, वांगदरी साठवण तलाव देवणीच्या विशेष दुरुस्तीचे काम करावे, अशा मागण्या केल्या.

या कामांना गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची मान्यता आवश्यक असून ती देखील देण्याची विनंती आमदार संभाजी पाटील-निलंगेकर यांनी केली आहे.

### उमाकांत मुर्गे यांचे निधन

**औसा, दि.१६ फेब्रुवारी -**
औसा येथील श्री मुक्तेश्वार शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष व ग्रामदैवत श्री मुक्तेश्वर मंदिर समितीचे संचालक उमाकांत गुरुसिद्धप्पा मुरगे (वय ६८) यांचे प्रयागराज येथील कुंभमेळा येथे शाही स्नानानंतर हृदयविकाराने दि.१३ रोजी निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवार दि. १४ रोजी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व नातेवाईक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक विवाहित मुलगी, सुना, नातवंडे भावंडे असा परिवार आहे.



### सुलोचना बोंडगे यांचे निधन

**निलंगा, दि.१६ फेब्रुवारी -**
तालुक्यातील औराद शहाजानी येथील सुलोचना त्र्यंबक बोंडगे (वय ९५) यांचे शनिवारी (दि.१५) रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. रविवारी दि.१६ फेब्रुवारी रोजी दुपारी त्यांच्यावर औराद शहाजानी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सून व नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार दत्ता बोंडगे यांच्या त्या आजी होत.



## सालगडी मालकांच्या तर शेतकरी सालगड्यांच्या शोधात



**तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे**
**औसा, दि.१६ फेब्रुवारी -**
सुरु असलेले साल संपायला अवघे कांही दिवस उरले आहेत. यावर्षी जास्ती जास्त पगार आणि उचल मिळावी. यासाठी सालगडी पैसेवाल्या शेतकरी मालकांच्या शोधात आहेत. तर पुन्हा एकदा नापिकीला गवसणी घातलेल्या शेतीचे शेतकरी शेतीचा डोलारा सांभाळण्यासाठी गेलंसालच्या पगारीत व कमी उच्चल मागणाऱ्या सालगड्याच्या शोधात असल्याचे चित्र औसा तालुक्यात दिसून येत आहे.

यांत्रीकीकरणामुळे बैलजोडीचे काम आता कोळपणीवरच उरले असूनही उन्हाळखरडा, पेरणीपुर्व मशागती, पेरणीत बिबियाणे व रासायनिक खताच्या पोत्यासाठी लागणारे मजुर, पिकांतील कोळपणी आणि फवारणीसाठी ऐणवेळी होणारा मजुरांचा तुटवडा खरिप व रब्बी हंगामात बसू नये.

यासाठी खास करुन सालगड्याची शेतकऱ्यांना आवश्यकता असते.सर्रासपणे दहा बारा एकरावरील शेतकऱ्यांना एक, सव्वा ते दीड लाख रुपयांचा सालगडी गरजेचा असतो. म्हणुन शेतकरी दरवर्षी गुढी पाडव्याच्या महिना दोन महिने अगोदर याची तयारी करतात. आणि अशी तयारी तालुक्यातील प्रत्येक गावातून कमी अधिक प्रमाणात दिसून येत आहे. गुढी पाडवा जसाजसा जवळ येईल. तशा या हालचालीला वेग येतो, गुढी पाडव्यापासून शेतीचे नवे वर्ष सुरु होते. अशी परंपरा गेल्या अनेक पिढ्यानपासून चालत आली आहे. या पाडव्याच्या मुहुर्तावर शेतातील पांडवाची पुजा करुन येणाऱ्या खरिप हंगामासह सालात चांगले उत्पन्न मिळावे. यासाठी शेतकरी मशागतीला सुरुवात करतात. नव्या वर्षातील पहिली मशागत करण्यासाठी नवा सालगडी असावा. असा शेतकऱ्यांचा व्होरा असतो, याप्रमाणे शेतकरी तयारी करतात. यंदाच्या नव्या वर्षाची नवी सुरुवात करण्यासाठी शेतकरी तयारीला लागले आहेत. याचप्रमाणे सालगडीही तयारीत असल्याचे दिसून येत आहे.गेल्या वर्षात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्यामुळे रब्बीच्या हंगामातील पेरणीस थोडा उशीर झाला आहे. यामुळे यंदा काढणीचा मोसम लांबला आहे.काढण्या झाल्यानंतरच सालगड्यांना सुट्टी देण्यात येते. तर कांही शेतकरी काढण्यातच एकमेकांचा निरोप घेतात.

याचा साळासुळा पाहुनच यावर्षी गेल्या वर्षी पेक्षा अधिक पगार या नापिकीच्या सालातही कोणता शेतकरी मालक देईल. याचबरोबर उच्चल जास्ती जास्त कोण देईल. आणि उचलीच्या लाखभर रुपयातून महिन्याला तीन ते चार हजार रुपये व्याज कोणता शेतकरी देईल. अशा शेतकरी मालकांच्या शोधात सालगडी आहेत. तर गेल्या दहा वर्षाच्या नापिकीप्रमाणेच गेलेले वर्ष वाया गेले आहे. येणाऱ्या वर्षात काहीका होईना.

पण यंदाचा सालगडी गेल्या वर्षीच्या पगारीतच मिळावा. यासाठी चाचपणीतून शोध घेत आहेत. याचबरोबर कमी उच्चल मागणाऱ्या व घेणाऱ्या सालगड्यांच्या शोधात आजतरी शेतकरी दिसून येत आहेत.

## शिवनेरी महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती साजरी




**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१६ फेब्रुवारी -**
येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण धालगडे यांच्या हस्ते क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवाद करण्यात आले. याप्रसंगी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पांडूरंग मुठ्ठे, डॉ. अमोल इंगळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांच्या जिवन कार्यावर कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. मुठ्ठे यांनी प्रकाश टाकताना ते म्हणाले, भारतीय समाज सुधारकापैकी शूरवीर लढवय्या, गौर राजवंशी बंजारा प्रख्यात सदगुरू संत सेवालाल महाराज यांचे कार्य अतुलनिय आहे. संत सेवा लाल महाराजांनी जंगल आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यांचा संदेश दिला आहे. त्या बरोबरच माणसा माणसात भेदभाव करू नका, सन्मानाने आयुष्य जगा इतरांशी वाईट बोलू नका, वाईट वागू नका, स्त्रियांचा सन्मान करा, मुलगा व मुलीत भेद करू नका, संकटाला निर्भयाने धैर्याने व आत्म विश्वासाने समोरे जा, पाण्याचे रक्षण करा, पाणी विकू नका ते पाप आहे, तहानलेल्यांना पाणी द्या, व्यसनापासून अंधश्रध्दे पासुन दूर रहा, चोरी लबाडी करू नका अशी शिकवण देऊन क्रांतिकारक समाजसुधारक म्हणून संत सेवालाल महाराज यांचे कार्य अतुलनीय आहे. अशा संताला महाविधालयाच्या वतीने जयंती साजरी करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

## अहमदपूर पोलीस विभागाच्या समस्या; विशेष पोलीस महानिरीक्षकांनी दिले सकारात्मक आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१६ फेब्रुवारी -**
अहमदपूर पोलीस विभागाच्या विविध समस्यांबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांना निवेदन देण्यात आले. युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी पोलीस ठाण्याचे विभाजन, एमआयडीसीतील शासकीय जागेचा ताबा, महामार्ग पोलीस केंद्र शिरूर ताजबंद येथे हलविण्याची मागणी केली.



विशेष पोलीस महानिरीक्षक उमाप यांनी अहमदपूर येथे भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यावेळी सजग नागरिक, व्यापारी आणि पत्रकारांनी त्यांची भेट घेऊन विविध मागण्या मांडल्या. यात नवीन अहमदपूर ग्रामीण पोलीस ठाणे मंजूर करावे, अहमदपूर शहराची लोकसंख्या आणि विस्तार पाहता पोलीस ठाण्याचे विभाजन करून ग्रामीण पोलीस ठाणे मंजूर करण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. शासन स्तरावर यावर सकारात्मक चर्चा सुरू आहे.एमआयडीसी परिसर, हागदळ, गूगदळ, शेनी या भागात मोठ्या प्रमाणात शासकीय जागा उपलब्ध असल्याने ती पोलीस विभागाने ताब्यात घ्यावी आणि नवीन पोलीस ठाणे, कवायत मैदान, पोलीस क्वार्टर्स तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासाठी वापरावी.

चाकूर आणि किनगाव येथे मंजूर असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या पाहता नवीन पोलीस वसाहत बांधणे अत्यंत आवश्यक आहे. अहमदपूर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे बांधकाम अनेक वर्षांपासून अर्धवट स्थितीत आहे, त्यामुळे प्रशासनाला अडचणी येत आहेत. तातडीने निधी मंजूर करून हे बांधकाम पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. लातूर जिल्ह्यातील महामार्ग पोलीस केंद्र सध्या घरणी (ता. चाकूर) येथे स्थलांतरित करण्यात आले आहे, परंतु शिरूर ताजबंद हे राष्ट्रीय आणि आंतरराज्य महामार्गांसाठी मध्यवर्ती ठिकाण असल्याने तेथे हे केंद्र कार्यान्वित करावे. अहमदपूर बसस्थानक परिसरात पोलीस चौकी सुरू करण्याची मागणी स्थानिक व्यापारी आणि नागरिकांनी केली. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक सोमय मूंडे यांच्याशी चर्चा करून वरील सर्व मागण्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीला प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक सागर खर्डे, उपो. अधिकारी मनिष कल्याणकर, पोलिस निरीक्षक बी.डी. भूसनूर तसेच अनेक पोलीस अधिकारी आणि पत्रकार उपस्थित होते.

## शिरूर अनंतपाळ तालुक्याला लांब पल्ल्याच्या बसगाड्यांची प्रतीक्षा : प्रवाशांचे हाल सुरूच!

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१६ फेब्रुवारी -**
शिरूर अनंतपाळला तालुक्याचा दर्जा मिळून २६ वर्षे पूर्ण झाली असली तरी, तालुक्यातील नागरिक अद्यापही मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित आहेत. विशेषतः लांब पल्ल्याच्या बसगाड्या नसल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.

तालुक्याचा दर्जा मिळण्यापूर्वी कच्च्या रस्त्यांवरून निलंगा आगारातून मुखेड, परभणी, वसमत, भोकर या ठिकाणी अनेक एसटी बसगाड्या नियमित धावत होत्या. परंतु, तालुका स्थापन झाल्यानंतर आणि रस्ते पक्के झाल्यानंतर या गाड्या अचानक बंद झाल्या. त्यामुळे नागरिकांना आता पर्यायी मार्गाने, तासन्तास प्रवास करून, मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुखेड, परभणी, वसमत, भोकर या ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सकाळी नांदेड बस गेली की, प्रवाशांना पर्यायी मार्ग शोधावा लागतो. अनेक प्रवासी नळेगाव येथून आष्टा मोड किंवा खासगी वाहनाने चाकूर येथे जाऊन पुढील प्रवास करतात. विद्यार्थ्यांना आणि व्यापाऱ्यांना प्रवासासाठी खूप अडचणी येतात. मुखेड, परभणी, वसमत, भोकर या ठिकाणी जाणाऱ्या एसटी गाड्या पुन्हा सुरू कराव्यात.



शिरूर अनंतपाळ-नळेगाव मार्गे लातूर जाण्यासाठी दोन नवीन बसेस सोडाव्यात. शिरूर अनंतपाळ-पुणे या मार्गावर सकाळी आणि संध्याकाळी दोन बस सुरू कराव्यात. शिरूर अनंतपाळ तालुक्याला २३ जून १९९९ रोजी तालुक्याचा दर्जा मिळाला. हा तालुका मांजरा आणि घरणी नद्यांच्या खोऱ्यात वसलेला असून, निसर्गरम्य ठिकाण म्हणून ओळखला जातो. येथे अनंतपाळ महाराजांचे भव्य पौराणिक मंदिर तसेच येरोळ येथे श्री कालिंकामातेचे प्रसिद्ध मंदिर आहे. पर्यटक मोठ्या संख्येने येथे येतात, पण सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसल्याने त्यांना अडचणींना सामोरे जावे लागते.

शिरूर अनंतपाळ तालुक्याच्या विकासासाठी लांब पल्ल्याच्या बसगाड्या सुरू करणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांची मागणी लक्षात घेऊन आमदार संभाजी पाटील-निलंगेकर यांनी पुढाकार घ्यावा आणि बंद पडलेल्या बसेस पुन्हा सुरू कराव्यात, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

लातूर

# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शिवजयंतीची सर्व मराठा संघटनांकडून जोरदार तयारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -** येत्या बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी सर्व मराठा व सामाजिक संघटना, समूह, ग्रुप, संस्था जोरदार तयारीला लागल्या आहेत. हल्ली बाजारात कपड्यापासून ते बिल्ले, झेंडे विक्री करणारी दुकाने फुलली आहेत.

खरेदीसाठी दुकानांत नागरिकांसह तरूण, तरूणींची मोठी गर्दी होताना दिसत आहे. शिवजयंती दिवशी ग्रामीण भागासह शहरभर मोटारसायकल, चारचाकी वाहनांची देखणी रॅली काढली जाते. शहराच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या रॅल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून नतमस्तक होतात. हे विहंगम चित्र पाहण्यासारखे असते. यात महिला, तरूणी, नागरिक, तरूणांचा सळसळता उत्साह पाहायला मिळतो. शिवाय, शिवजयंतीचे औचित्य साधून सामाजिक उपक्रम राबवले जातात. या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते. त्यामुळे सर्वांना शिवजयंती उत्सवात सहभागी होण्याची संधी मिळते. तसेच व्याख्यान कार्यक्रम, निरनिराळ्या स्पर्धा ठेवल्या जातात. सुट्टी असली तरी सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालयांत शिवजयंती मोठ्या उल्हासात साजरी केली जाते. सध्या शिवजयंती साजरी करण्यासाठी सर्व संस्था, संघटना, ग्रुप, समूह तयारीला लागले आहेत. त्याचे प्रत्यक्ष चित्र आताच पाहायला आणि चर्चेतून ऐकायला मिळत आहे. रॅलीबरोबरच मिरवणूक काढून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाची आठवण करून दिली जाते. हे सर्व दृश्य, चित्र पाहण्यासारखे असते. शहरासह ग्रामीण भागातही शिवजयंती दिवशी असाच उत्साह आणि जल्लोष असतो. रॅल्या, मिरवणुका डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या असतात. याचीच तयारी सध्या जिल्हाभरात जोरदार सुरू आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## श्रीगुरू चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या प्रवचनमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्रीगुरू चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या प्रवचन मालेचे आयोजन दिनांक १९,20 व २१ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले आहे.

सदरील प्रवचनमाला शाममंगल कार्यालय सावेवाडी लातूर येथे दररोज सायंकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे. सदरील प्रवचनमाला श्रीमद्भागवतातील रासक्रीडा या विषयावर असणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीसद्गुरू सेवा समिती व दिवाण परिवार यांनी केले आहे.

## कार्यकारी संचालक पॅनल परिक्षेत सदाशिव बहीर यांचे उज्वल यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शे.स.सा.कारखान्यात १२ वर्ष सहायक अभियंता म्हणून कार्यरत राहीलेले व एका शेतकरी कुटुंबातून येणारे सदाशिव बहीर हे सध्या येडेश्वरी शुगर केज येथे जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत.

महाराष्ट्र राज्य शासनाने घेतलेल्या सहकारी साखर कारखान्याच्या कार्यकारी संचालक पॅनेल परिक्षेत गुणानुक्रमे सहावा क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी आतापर्यंत ३३ वर्ष विवीध साखर कारखान्यात सेवा केली आहे. श्री सदाशिव बहीर यांनी महाराष्ट्रातील नामांकित अशा लातूरच्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शे.स.सा.कारखान्यात १२ वर्ष सहायक अभियंता व ६ वर्ष मुख्य अभियंता या पदावर काम केले आहे. तसेच सिध्दनाथ शुगर सोलापूर येथे मुख्य अभियंता म्हणून ५ वर्ष काम केले आहे.

## उद्योजक घडविण्यासाठी लातुरात आज कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अग्रिकल्चर पुणे व लघु उद्योग भारती लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग यांच्याकरिता गव्हर्नमेंट ई- मार्केट प्लेस पोर्टल आणि लोन अप्लिकेशन प्रक्रिया ही कार्यशाळा लातूर येथे १७ फेब्रुवारी रोजी एमआयडीसी येथील उद्योगमित्र हॉलमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

सायंकाळी ५.३० ते ९:00 या वेळेत कार्यशाळेत पोर्टलची माहिती, नोंदणी, प्रोफाईल तयार करणे, ब्रोशर अपडेट करणे, पोर्टल टेंडर फायलिंग आदी विषयांवर माहिती दिली जाणार आहे. उद्योजक, नवीन उद्योग उभारू इच्छिणाऱ्यांनी कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन उद्योग भारतीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत करवा, सचिव उदय कुलकर्णी, देवेन वाईकर यांनी केले आहे. कार्यशाळेत व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत. मार्केटिंग, ब्रेडिंग, फायनान्स याबाबत माहिती दिली जाणार आहे.

## कोरे गार्डनपासून दुचाकीची चोरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
शहरातील कोरे गार्डन परिसरात नारायणनगरातील श्रीधर श्रीमंत सोनटक्के यांनी एमएच २४, एझेड ५५९९ क्रमांकाची दुचाकी उभी केली होती. अज्ञाताने ती पळविली. दुचाकीची किंमत ३० हजार रुपये आहे. या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राजकुमार गंडले यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -** राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार) छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ॲड. राजकुमार गंडले, तर उपाध्यक्षपदी ॲड. उमाकांत नाईकनवरे यांची निवड शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. यावेळी ॲड. इरफान शेख, ॲड. विनायक शिंदे, अझहर शेख, कल्पना फरकांडे, ॲड. सुनील फावडे, तुकाराम शिवणकर उपस्थित होते.

## रक्तदान करून छत्रपती शिवरायांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती व राजर्षी शाहू महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शिवजंयतीच्या औचित्यावर शनिवारी येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात शेकडो विद्यार्थी व नागरीकांनी रक्तदान करुन शिवरायांना अनोखे अभिवादन केले.११८ पिशव्या रक्तसंकलन झाले

राष्ट्रगीतानंतर छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करुन शिबीरास सुरुवात झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे होते. उदघाटक विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, डॉ. शेखर गरड, अमर देशमुख, प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. हर्षवर्धन राऊत, ॲड. उदय गवारे, हंसराज जाधव, डॉ. अभय कदम, प्रा. डॉ. कल्याण सावंत, प्रमोद साळुंके, वैभव तळेकर, धनंजय शेळके, ॲड. विजय जाधव, डॉ. अविनाश सूर्यवंशी आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी स्वराज्य व प्रजाहित हा छत्रपती शिवरायांचा ध्यास होता व त्यासाठी त्यांनी आपला प्रत्येक श्वास अर्पित केला होता. हे राज्य माझे व हा राजाही माझा असे आंतरीक नाते शिवकालात दृढ झाले होते. सुराज्यासाठी शिवरायांचा विचार जगण्यात उतरवावा लागेल असे झाले तर कोणत्याही माय माऊलीवर अत्याचार होणार नाही.

शिवरायांना लाभलेल्या अल्पायुष्यपेक्षा अधिकची दहा वर्ष मिळाली असती तर अखंड भारतावर हिंदवीस्वराज्य पताका फडकली असती, असा विश्वास प्राचार्य डॉ. गव्हाने यांनी यावेळी व्यक्त केला. अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांनी लोककल्याण हा शिवरायांच्या धोरणांचा कणा होता. राजर्षी शाहू महाविद्यालय व सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती लोकहितेषी कार्यक्रम व उपक्रम राबवून महापुरुषांना अभिप्रेत असलेली मानवसेवाच करीत असल्याचे सांगितले. प्रास्ताविक ॲड उदय गवारे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. कल्याण सावंत यांनी केले. डॉ. अभय कदम यांनी आभार मानले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टी बी मूक्त भारत करण्यासाठी दिलेल्या आवाहनास प्रतिसाद देत या शिबीरात शेकडो विद्यार्थी व उपस्थितीतांनी टीबी मूक्तीसाठी शपथ घेतली. टीबी हरेल देश जिंकेल अशा घोषणाही त्यांनी यावेळी दिल्या.

## सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
शूरवीर क्रांतिकारी सेवालाल महाराज यांची जयंती शहरात विविध ठिकाणी साजरी करण्यात आली. तसेच समाजबांधवांच्या वतीने शहरातून मिरवणूक काढण्यात आली. शनिवारी सकाळी बार्शी रोडवरील संविधान चौकात एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या हस्ते सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी गोविंद राठोड, उत्तम पवार, संजय पवार, नागेश राठोड, अनिल राठोड, गणपती राठोड, सतीश राठोड, किसन राठोड आदीजण उपस्थित होते. सेवालाल चौकात बंजारा समाजबांधवांच्या वतीने जयंती साजरी करण्यात आली. यावेळी गोर शिकवाडीचे सहसंयोजक सुरेश राठोड, गोरसेनेचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक चव्हाण, तानाजी चव्हाण, गोरसेनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. संतोष पवार, जिल्हा संघटक बालाजी राठोड, महादेव जाधव आदींची उपस्थिती होती.

लातूर शहरातील साईनाका, दीपज्योती नगर, भांबरी चौक, गरुड चौक, राजीव गांधी चौक आदी ठिकाणी सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सेवालाल चौकातून दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक भांबरी चौक, साईनाका मार्गे गरुड चौकात गेली. या ठिकाणी मिरवणुकीचा समारोप झाला. यावेळी समाजबांधवांची मोठी उपस्थिती होती.

## विनयभंगप्रकरणी नराधमास दोन वर्षांची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
तालुक्यातील मुरुड येथील मस्जिद रोडवर चार वर्षापूर्वी विवाह समारंभातून घराकडे परतणाऱ्या महिलेचा विनयभंग करण्यात आला होती. ४ वर्षांनंतर याप्रकरणाचा निकाल लागला असून संबंधिताला दोन वर्षे सक्तमजुरी आणि १० हजाराचा दंड ठोठावण्यात आला आहे.

२७ फेब्रवारी २020 रोजी मुरुड येथील मस्जिद रोड जवळून फिर्यादी महिला आपल्या घराकडे जात असताना आरोपी राजहंस अभिमन्यू टिळक (वय ४0, रमाई नगर, लातूर) याने महिलेचा हात पकडला आणि जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. महिलेने आरडाओरड केल्यानंतर नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाची सुनावणी सातवे प्रथम न्यायदंडाधिकारी जी.जी. औटी यांच्याकडे सुरु होती. यादरम्यान पीडित महिला, घटनास्थळी उपस्थित असलेले दोघेजण व पंच साक्षीदार यांची साक्ष महत्त्वाची ठरली.

सरकारी पक्षातर्फे ॲड. व्ही.एम. मांडे व सहाय्यक सरकारी वकील ॲड. महेश जाधव यांनी फिर्यादिची ठाम बाजू मांडली. न्यायालयाने आरोपीला ठोठावलेली दंड रक्कम १२ हजार रुपये ही फिर्यादी महिलेला भरपाई म्हणून देण्याचे आदेश आहेत. विनयभंगप्रकरणी राजहंस टिळक यास दोषी ठरवून दोन वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.

## संविधान चौकात संत सेवालाल जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
शहरातील संविधान चौकात (बार्शी रोड पाण्याची टाकी) संत सेवालाल महाराज यांची २८६वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

संविधान चौकात एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, गणपती राठोड, उत्तम पवार, नागेश पवार यांच्या हस्ते संत सेवालालजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तद्नंतर सेवालाल महाराजांना भोग लावून प्रतिमेचे पूजन करून महाप्रसाद वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन गोविंद राठोड, अर्जुन राठोड, श्रीकांत राठोड, प्रसाद जाधव, अंकुश जाधव, सरस्वती जाधव, मुरलीधर पवार यांनी केले होते. कार्यक्रमास समाज बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## ‘एचएसआरपी’साठी ३१ मार्चची डेडलाईन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
वाहनांची सुरक्षा तसेच चोरी झालेल्या वाहनांची ओळख पटविण्यासाठी आता हाय सेक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट अनिवार्य करण्यात आले आहे. याचे अनेक फायदे वाहनधारकांना असून १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी असलेल्या वाहनांना ३१ मार्चपर्यंत ही नंबर प्लेट बसवणे आवश्यक आहे.

या अद्ययावत नंबर प्लेटची सुविधा जिल्हा तसेच तालुकास्तरावर करण्यात आले आहे. दुचाकी व ट्रॅक्टरसाठी ५३१, तीन चाकी वाहनांसाठी ५९0 व लाईट मोटार वाहन व प्रवासी कार याकरिता ८७९ रुपये मोजावे लागणार आहे. यामुळे चोरी झालेल्या वाहनांची ओळख पटणे, छेडछाड प्रतिरोधक तंत्रज्ञानाने वाहन सुरक्षित राहते. तसेच डुप्लिकेट नंबर प्लेट तयार करणेही कठीण आहे.

वाहनधारकांना वाहन नोंदणी क्रमांक, वाहन मालकाचे नाव, वाहनाचा प्रकार असा तपशील भरून ऑनलाईनद्वारे पेमेंट करता येणार आहे. डेडलाईन न पाळल्यास १0 हजारांचा दंड आकारला जाणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

## लातुरात सेवालाल महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
संत सेवालाल महाराज हे प्रत्येक बंजारा कुटुंबासाठी श्रद्धास्थान आहेत. गोरबंजारा समाजातील प्रसिद्ध संत म्हणून त्यांची ओळख असून शनिवारी जयंती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळी दुचाकी रॅली तसेच चौका-चौकात त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

सेवालाल महाराज यांच्याकडे अध्यामिक गुरु व समाजसुधारक म्हणून पाहिले जाते. शनिवारी (दि. १५) त्यांची २८५ वी जयंती होती. येथील गंजगोलाई, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गांधी चौक या ठिकाणीहून दुचाकी रॅली काढण्यात आली.

## भाषा हा निरंतर चिंतनाचा विषय : डॉ. राणा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
मराठीच्या प्राध्यापकाने मराठी भाषेची निर्मिती कशी झाली, हे शोधून काढले पाहिजे. भाषा हा विषय निरंतर चिंतनाचा असून भाषा विषय म्हणजे बहुजनांच्या शोषणाचे हत्यार बनत आहे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या १९व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष तथा लोकसंस्कृतीचे अभ्यासक डॉ. अशोक राणा यांनी केले.

लोकसेवक संघ, लातूर, जागर समतेचा, अंधश्रध्दा निर्मूलन समिती, लातूर, जी २४ ग्रुप, मराठा लिबरेशन टायगर, लोकशाही उत्सव समिती या प्रागतिक विचारांच्या संघटनांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. राणा यांचा डॉ. नागोराव कुंभार



यांच्या अध्यक्षतेखाली व आंबेडकरी विचाराचे पुरस्कर्ते सदाशिव अभंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. मंचावर माधव बावगे, नरसिंग घोडके, डॉ. हर्षवर्धन कोल्हापुरे, प्रा. सुधीर अनवले उपस्थित होते.

यावेळी डॉ. राणा म्हणाले, मराठीच्या प्राध्यापकाने मराठी भाषेची निर्मिती कशी झाली, हे शोधून काढले पाहिजे. भाषा हा विषय निरंतर चिंतनाचा आहे. मराठमोळी संस्कृती असा उच्चार केला जातो. परंतु, मोळी या शब्दाचा अर्थ गठ्ठा नसून बोली असा असावा. संस्कृत भाषेपासून मराठी भाषेची निर्मिती झाली. संस्कृत म्हणजे संस्कार केलेली भाषा आहे. मग संस्कृत भाषा कोणत्या भाषेपासून तयार झाली? प्राकृत बोली भाषा ही मूळ भाषेच गाभा आहे.

पाली, अर्धमागधी आणि प्राकृत भाषांचा मराठी भाषेच्या संशोधनासाठी काय उपयोग करता येतो, याचा विचार करायला हवा. परंतु, कान, डोळे व तोंड बंद ठेवून प्रत्येकजण दहशतीखाली वावरत असल्याचे दिसून येते. अभिजात मराठी भाषा पुण्याच्या ब्राह्मणांच्या तोंडून निघालेली भाषा आहे, असा समज पसरविण्यात आला. भाषा विषय म्हणजे बहुजनांच्या शोषणाचे हत्यार बनत आहे. जातीबरोबर भाषेचाही शोषणासाठी वापर केला जाऊ लागला असून बुध्द व येशुंनी सर्व अन्याय सहन केले. परंतु, मराठीच्या मानगुटीवर संस्कृतची बसलेली वेलांटी काढून टाकावी लागणार आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ. अशोक नारनवरे यांनी डॉ. राणा यांचा परिचय करून दिला. पंचशील डावकर यांनी सूत्रसंचालन केले. यशस्वीतेसाठी डॉ. अनिल जायभाये, डी. उमाकांत, चंद्रशेखर कत्ते, डॉ. गणेश गोमारे, राहुल लोंढे आदींनी पुढाकार घेतला. यावेळी साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## रसायनशास्त्राची व्याप्ती व्यापकः डॉ. बंडगर




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
रसायनशास्त्र या विषयाची व्याप्ती खूप व्यापक असून संपूर्ण विश्वामध्ये रसायनशास्त्र दडलेले आहे.आकाश,पाताळ आणि पृथ्वी तिन्ही लोकांत केमिस्ट्री आहे. दिनचर्यातील मानवी शरीराच्या हालचाली,जसे जांभई,झोप येणे व मनातील विविधांगी इच्छा-आकांक्षा अशा सर्वांगीण जीवनाला केमिस्ट्री प्रभावित करत असते असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.बी.पी.बंडगर यांनी केले.

मानवी भावभावना,बुद्धी,संपूर्ण सजीव व निर्जीव सृष्टीला कवेत घेण्याचे सामर्थ्य रसायनशास्त्रात आहे.दैनंदिन जीवन जगत असताना आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर प्रेमाची भावना प्रत्येकांच्या हृदयात दाटून येते. मन आणि मेंदूतून ती भावना उंचबळून येते.शरीरामध्ये होणारे हे हार्मोन्समधील बदल यामध्येसुद्धा रसायनशास्त्र आहे. सोसायटी,आरोग्य,उद्योग व फार्मसीसाठी रसायनशास्त्रावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचा विषय सर्वव्यापी आहे. केमिस्ट्री हाच जीवनाचा सार आहे.म्हणूनच केमिस्ट्री ईज लाईफ,लाईफ ईज केमिस्ट्री असे ही ते म्हणाले. येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे आयोजित केलेल्या ' इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन केमिस्ट्री फॉर सोसायटी, हेल्थ, इंडस्ट्रीज ॲन्ड फार्मसी या विषयावरील तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप झाला. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे विश्वस्त सदस्य डॉ. सुरेश भट्टड होते.

याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे,स्वारातीम विद्यापीठ,रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.डी.आर.मुंडे,माजी प्राचार्य डॉ.जे.एस. तुळबा, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,दयानंद फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,रसायनशास्त्र विभाग डॉ.युवराज सारणीकर आदी उपस्थित होते.

## रात्री मित्रानेच डोक्यात दगड घालून केले ठार

### ..अखेर त्या खुनाचा झाला उलगडा!

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१६ फेब्रुवारी -**
आठ दिवसांपूर्वी शहरातील बाभळगाव नाका ते बसवेश्वर चौकाकडे जाणाऱ्या रिंगरोडवरील हॉटेलच्या शटर लगत अज्ञात इसमाने अनोळखी इसमाच्या डोक्यात दगड मारुन ठार केल्याची घटना घडली होती.

मयताची ओळख पटत नसल्याने विवेकानंद पोलीस ठाण्याच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसमोर एक आव्हान होते. अखेर ८ दिवसानंतर या घटनेचा उलगडा झाला असून आपल्याबरोबर दगाफटका होईल या भीतीनेच मित्रानेच मित्राचा काटा काढल्याचे समोर आले आहे.

बाभळगाव नाका ते बसवेश्वर चौकाकडे जाणाऱ्या रिंगरोडवरील हटिलच्या शटर लगत शुक्रवार (दि. ७) एक तरुण रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला होता. डोक्यात दगड घालून त्याला ठार केले होते. मात्र, तीन दिवस त्याची ओळखच पटली नव्हती. गोपनीय बातमीदार नेमून मिळालेल्या माहितीच्या आधारे मयताची ओळख पटली होती. नजीर पाशा सय्यद (रा. नेकनूर जि. बीड) असे त्याचे नाव होते. त्याच्यावर सातारा, फलटण, कोल्हापूर याठिकाणी चोरी दरोडा यासारख्या गुन्ह्यांचीही नोंद होती. पोलिसांनी अधिकचा तपास केला असता. सतीश भिमराव वाघमारे (रा. चाटगाव, ता. धारुर हल्ली मुक्काम विठ्ठल नगर, खणी विभाग लातूर) याचा तो मित्र असल्याचे निष्पन्न झाले होते.

आरोपी सतीश वाघमारे याच्यावरही बीडसह अन्य जिल्ह्यात गुन्हे दाखल होते. मयत नजीर व आरोपी सतीश वाघमारे यांच्यामध्ये पैशाचा व्यवहारही झाला होता. यावरुन त्या दोघांमध्ये वादही होता. खुनाच्या घटनेच्या पूर्वसंध्येला व घटने दिवशी ते दोघे गंजगोलाई तसेच बाभळगाव नाक्यावर दारु पिल्याचेही सीसीटीव्हीमध्ये निष्पन्न झाले होते. शुक्रवार (दि. ७) रोजी ते दिवसभर दारु प्याले आणि संध्याकाळी बाभळगाव नाका ते बसवेश्वर चौकाकडे जाणाऱ्या रिंगरोडवरील हॉटेलजवळ आले व तेथेच झोपले होते. मात्र, व्यवहारावरुन नजीर दगाफटका करेल या भितीने सतीश वाघमारे याने दारुच्या नशेत नजीरच्या डोक्यात दगड घातला व फरार झाला. दुसऱ्या दिवशी घटना समोर आली तेव्हा मयताजवळ कोणतेही ओळखपत्र नव्हते की मोबाईल शिवाय तो लातूर जिल्ह्यातील नसल्याने ओळख पटने मुश्किल झाले होते. मात्र, विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व त्यांच्या पथकाने अथक परीश्रम घेऊन मयताची ओळख तर पटवलीच शिवाय आरोपीलाही जेरबंद केले आहे. घटनेनंतर पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या आदेशान्वेय पथकाची नेमणूक करण्यात आली होती.

अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी पथकाची नेमणूक केली होती.

पोलीस ठाणे विवेकानंदचे सपोनि पंकज शिनगारे, वसंत मुळे, पोउपनि अनिल कांबळे, दगडु बुक्कारे, पथकामधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, यशपाल कांबळे, रवी गोंदकर आदिंनी गुन्हा उकल करण्या कामी परिश्रम घेतले.